पुणे, सोमवार, १७ फेब्रुवारी २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 82 • वर्ष ४ थे, अंक ८२ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News

## शेकडो काँग्रेस कार्यकर्त्यांचे तीव्र आंदोलन



P४

• चौकशी समितीची स्थापना • दोन गाड्या रद्द झाल्यामुळे दुर्दैवी घटना

# चेंगराचेंगरीचे

## रेल्वे स्थानकावरील दुर्घटना १८ बळी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** दिल्ली रेल्वे स्थानकावर चेंगराचेंगरी होऊन १८ जणांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. या घटनेत १० जण जखमी आहेत. मृत्यूमुखी पडलेल्यामध्ये तीन लहान मुलांचा समावेश असल्याची माहिती समोर आली आहे. ही दुर्दैवी घटना शनिवारी (दि. १५) रात्री १० च्या दरम्यान घडली. घटनेची माहिती मिळताच रेल्वे प्रशासन आणि सुरक्षा कर्मचारी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी प्रयत्न करत आहेत. घटनेची चौकशी करण्याचे आदेश सरकारकडून देण्यात आले आहेत. रेल्वे संरक्षण दलाचे महासंचालकही घटनास्थळी दाखल झाले आहेत.

चेंगराचेंगरीच्या घटनेनंतर जखमींना एलएनजेपी रुग्णालयात तातडीने दाखल करण्यात आले. मात्र जखमींमधील १८ जणांचा रुग्णालयात मृत्यू झाला. ज्यामध्ये ११ महिला, दोन पुरूष व २ लहान मुलांचा समावेश आहे. जखमींमधील काहींना लेडी हार्डिंग रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेनंतर रेल्वे स्थानकाचा हा परिसर बॅरिकेड्स लावून बंद करण्यात आला आहे. ही दुर्दैवी घटना नवी दिल्ली रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक १४ आणि १५ वर घडली. रात्री १० च्या सुमारास या घटनेची माहिती मिळाल्यानंतर रेल्वे प्रशासन, सुरक्षा कर्मचारी व चार अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रयागराजला जाणाऱ्या दोन गाड्या रद्द झाल्यामुळे स्टेशनवर मोठी गर्दी झाली होती. अचानक रेल्वे रद्द झाल्याची घोषणा झाल्यानंतर प्रवाशांचा गोंधळ उडाला. व ही दुर्दैवी घटना घडली.

» पान ७ वर




नवी दिल्ली **अनास्थेचे बळी:** कुंभमेळ्याला जाणारी रेल्वे प्लॅटफॉर्म क्रमांक १४ वर होती. यावेळी तिथे आधीच मोठी गर्दी होती आणि इतर प्रवासीही तिथे पोहोचण्याचा प्रयत्न करत होते. रेल्वेने अचानक प्लॅटफॉर्म क्रमांक १६ वरून विशेष ट्रेनची घोषणा केली. त्यामुळे गोंधळ उडाला. गर्दी नियंत्रणाबाहेर गेली आणि लोक एकमेकांवर पडून जखमी झाले.

## राजीनाम्याबाबत धनंजय मुंडे यांनीच निर्णय घ्यावा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बीड :** माझ्यावर सिंचन घोटाळ्याचे आरोप झाले तेव्हा नैतिक जबाबदारी स्वीकारून मी राजीनामा दिला होता. आता या सगळ्या प्रकरणात राजीनामा द्यायचा की नाही, हे धनंजय मुंडे यांनीच ठरवावे, असे विधान अजित पवार यांनी केले. पुरावा नसेल म्हणून धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिला नसेल, पण मी आरोप झाल्यावर २०१०-११ मध्ये राजीनामा दिला होता. माझ्या सद्विवेक बुद्धीला आरोप झाले, ते पटले नव्हते. शेवटी ज्याचा त्याचा निर्णय ज्याने त्याने घ्यायचा असतो, असे अजित पवार यांनी म्हटले आहे.

**अजित पवार यांचे विधान**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणावरून राज्यातील राजकीय वातावरण तापले असून, सत्ताधारी आणि विरोधक यावरून आरोप-प्रत्यारोप करत आहे. विरोधकांनी पहिल्या दिवसापासून धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची

» पान ७ वर

## न्यू इंडिया बँकेचा १२२ कोटींचा घोटाळा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई:** टोरेस कंपनीनं गुंतवणूकदारांना चुना लावल्याची घटना ताजी असताना, आता गेल्या आठवड्यात न्यू इंडिया को-ऑपरेटीव्ह बँकेत गैरव्यवहार झाल्याचं उघड झालं. बँकेनं रिझर्व बँक ऑफ इंडियाचे कोणतेही नियम आणि निकष पालन न करता नियमबाह्य पद्धतीनं कर्ज वाटप केलं. मोठ्या प्रमाणात व्याजदर लावल्याचं प्रकरण समोर आलं. न्यू इंडिया को-ऑपरेटीव्ह बँकेत १२२ कोटी रुपयांचा घोटाळा केल्या प्रकरणी आरोपी हितेश मेहताला पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेनं अटक केली. पोलिसांनी किल्ला कोर्टात

» पान ७ वर

## डॉ. प्रदीप कुरुलकर विरोधात आरोप निश्चित

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणेला संरक्षणविषयक गोपनीय माहिती पुरविल्याप्रकरणी कारागृहात असलेला लष्कराच्या संशोधन आणि विकास संस्थेचा माजी संचालक, वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. प्रदीप कुरुलकर याच्याविरुद्ध आरोप निश्चितीचा मसुदा विशेष न्यायालयात सादर करण्यात आला. त्यामुळे आता या खटल्याच्या प्रत्यक्ष सुनावणीस लवकरच सुरुवात होणार आहे.

**मसुदा विशेष न्यायालयात**

विशेष सरकारी वकील उज्ज्वला पवार यांनी विशेष न्यायाधीश व्ही. आर. कचरे यांच्या न्यायालयात आरोप निश्चितीचा मसुदा सादर केला. कुरुलकरविरुद्ध राज्य दहशतवादविरोधी पथकाकडून (एटीएस) २०२३ मध्ये दोन हजार पानांचे आरोपपत्र सादर केले. त्याच्याविरुद्ध आरोप निश्चित केल्यानंतर खटल्याची सुनावणी सुरू करण्यासाठी आता सरकार पक्षाकडून प्रयत्न

» पान ७ वर

## लाडकी बहिणीच्या अपात्रतेला प्राप्तीकराची 'चाळण'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क


**मुंबई:** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना विधानसभा निवडणुकीत महायुती सरकारसाठी गेमचेंजर ठरली होती. मात्र निवडणुकीनंतर ही योजना नियमांच्या कचाट्यात अडकलेली पाहायला मिळत आहे. सरकारने नियमावलीत वाढ करत अर्जदार महिलांची पडताळणी करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच काही अपात्र महिलांची नावे वगळण्याची प्रक्रिया देखील सुरू झाली आहे. यानंतर आता प्राप्तिकर विभागाची मदत घेतली जाणार असल्याची माहिती समोर येत आहे.

लोकसभा निवडणुकीतील पराभवानंतर महायुती सरकारने राज्यातील महिलांसाठी जुलैमध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना जाहीर केली. आतापर्यंत योजनेचे ७ हप्ते वितरीत करण्यात आले आहेत. राज्यातील २ कोटी ४१ लाखांहून अधिक महिलांना या योजनेचा लाभ मिळत आहे. मात्र विधानसभा निवडणुकीनंतर अवघ्या २ महिन्यांतच महिला आणि बालविकास विभागाने लाडकी बहीण योजनेतील तब्बल ५ लाख अपात्र बहिणींना वगळले आहे.

या निर्णयामुळे राज्य सरकारचे महिन्याला ७५ कोटी रुपये वाचणार आहेत. यानंतर आता लाडकी बहीण योजनेच्या उधळपट्टीला लगाम घालण्यासाठी प्राप्तिकर विभागाची मदत घेतली जाणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत दरमहा ३ हजार ८८५ कोटी रुपये सरकारी तिजोरीतून द्यावे लागतात. यामध्ये अशा काही महिला लाभार्थी

» पान ७ वर















# नवले पूल ते रावेत होणार रस्ता ?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

## वाहतूक कोंडीला नव्या रस्त्याचा प्लॅन

**पुणे :** नऱ्हे ते रावेत एक नव्या रस्ता चा प्लॅन मुळे वाहतूक कोंडीला चाप बडणार आहे. नऱ्हे, नवले पूल, वारजे, चांदणी चौक व रावेत या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहनांची होणारी कोंडी व नऱ्हे, नवले पुलाच्या परिसरात अपघाताचे प्रमाण लक्षात घेता राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण या परिसरातून जाणाऱ्या मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूला सेवा रस्ता तयार करणार आहे. एका बाजूच्या सेवा रस्त्यावर दोन मार्गिका असणार आहेत. त्यामुळे वाहनधारकांची मोठी सोय होणार आहे.

पुणे शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी व अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी खेड शिवापूर ते रावेत दरम्यान ३२.४ किलोमीटर लांबीचा नवीन सेवा रस्ता तयार होणार आहे. दोन मार्गिका असणारा हा रस्ता असून यासाठी ६०४ कोटींचा खर्च अपेक्षित आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या मुख्यालयाने याला मंजुरी दिली आहे. मार्च २०२५ पासून रस्त्याचा कामाला सुरवात होईल. पिंपरी-चिंचवड महापालिकेने यासाठी ९० टक्के भू-संपादनाचे काम पूर्ण केले आहे, तर उर्वरित १० टक्के पुणे महापालिका भू-संपादन करीत आहे.






भू-संपादनाचे काम अंतिम टप्प्यात असून, लवकरच याची टेंडर प्रक्रिया पूर्ण केली जाईल. मार्च महिन्यापासून प्रत्यक्षात कामाला सुरवात होईल. दोन वर्षांत काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे.

**— सुभाष घंटे, वरिष्ठ अभियंता, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, पुणे**

### वेळेची बचत

- सध्या या रस्त्यावरून रोज सुमारे दोन लाख १० हजार वाहनांची वाहतूक होते. या सेवा रस्त्यामुळे वाहनधारकांची सोय होणार आहे. खेड शिवापूर ते रावेत असा प्रवास करण्यासाठी सध्या ४५ मिनिटे ते १ तास वेळ लागतो. सेवा रस्त्यामुळे वेळेत बचत होण्यास मदत होईल.

या नव्या रस्त्यांमुळे प्रवासाचा वेळ २० मिनिटांनी कमी होणार आहे.

### तीन टप्प्यांत होणार काम

- खेड शिवापूर ते कात्रज नवीन बोगदा
- वारजे ते बालेवाडी
- वाकड ते रावेत



### असा असेल रस्ता

- खेड शिवापूर ते रावेत दरम्यान मुख्य रस्त्याच्या बाजूने ३२.४ किलोमीटर लांबीचा सेवा रस्ता
- दोन्ही बाजूने दोन मार्गिका
- एक मार्गिका ३.५ मीटरची असणार
- रोज किमान एक लाख वाहनांना याचा थेट फायदा

### असा होणार फायदा

- मुख्य मार्गावरील वाहतूक कमी होईल, परिणामी वाहतूक कोंडी टळेल
- लहान वाहनांसाठी व स्थानिक रहिवाशांसाठी हा रस्ता महत्त्वाचा ठरणार
- अपघाताचे प्रमाण कमी होईल
- प्रवासाचा वेळ किमान १५ ते २० मिनिटांनी वाचेल
- इंधनात बचत
- वाहतूक जलद होण्यास मदत

# कर्मयोगिनी पुरस्कार हा आईचा आशीर्वादच : मीरा शिंदे



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आई क्षणोक्षणी आपल्या भोवतीच असते. ती शरीर रूपाने आपल्या जवळ नसली तरी तिचे अस्तित्व आपल्याभोवती धुक्यासारखे लपेटलेले असते. सागरासारखी व्याप्ती असलेल्या आईच्या मनाचा तळ शोधणे सोपे नाही. आईचे आईपण आपल्यात ओतप्रोत भरून घेतल्यानंतर आपल्याला आई कळते, असे प्रतिपादन ज्येष्ठ कवयित्री, लेखिका मीरा शिंदे यांनी केले. आईच्या आठवांचा जागर पुरस्कार रूपाने करणे ही मोलाची गोष्ट आहे. कर्मयोगिनी पुरस्कार म्हणजे आईचा आशीर्वाद होय, असेही त्या म्हणाल्या. कै. सौ. तिलोत्तमा प्रकाश निफाडकर यांच्या स्मरणार्थ यंदाच्या कर्मयोगिनी पुरस्काराने मीरा शिंदे यांचा रविवारी (दि. 16) गौरव करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना त्या बोलत होत्या. पुरस्काराचे वितरण कवयित्री मृणालिनी कानिटकर-जोशी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित कार्यक्रमात करण्यात आले. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्यवाह अ‍ॅड. प्रमोद आडकर यांची प्रमुख उपस्थिती होती. भारतीय विचार साधना सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कवयित्री तनुजा चव्हाण यांच्या आईंच्या स्मृतिप्रित्यर्थ दिल्या जाणाऱ्या पुरस्काराचे यंदाचे सहावे वर्ष आहे. नितीन चव्हाण या वेळी मंचावर होते. ज्येष्ठ विचारवंत, महाराष्ट्र राज्य विश्वकोष मंडळाचे अध्यक्ष राजा दीक्षित, ज्येष्ठ कवयित्री अंजली कुलकर्णी आदी उपस्थित होते.

# भाजपच्या मंत्र्यांमधील विसंवादाचा फटका पाणीपुरवठ्यावर : जोशी



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहराची वाढती मागणी लक्षात घेता जलसंपदा खात्याने २१ टीएमसी पाण्याचा कोटा तातडीने मंजूर करायला हवा. भाजप सरकार यात टाळाटाळ का करत आहे? त्याचा भुर्दंड पुणेकरांना सोसावा लागत आहे, आता तरी मंत्रीमहोदय चंद्रकांत पाटील हे आपले सहकारी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना पाण्याच्या कोट्याबाबत समज देतील काय? असा सवाल माजी आमदार मोहन जोशी यांनी केला आहे.

पुणे महापालिकेला १४ टीएमसी पाणी कोटा जलसंपदा खात्याने मंजूर केला. परंतु वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन हा कोटा वाढविण्याची गरज आहे. ही वाढीव मागणी मंजूर न करता जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणतात की, 'महापालिकेला जादा पाणी वापराबद्दल दंड ठोकू', हे त्यांचे म्हणणे अन्यायकारक आहे. पुणे शहर हे महानगर म्हणून आकार घेत आहे. गेल्या काही वर्षात पुण्याची लोकसंख्या ५० लाखांहून अधिक झाली आहे. याची कल्पना जलसंपदा खात्याच्या मंत्र्यांना नसावी, याचे आश्चर्य वाटते. महापालिकेला दंड ठोकण्याची भाषा करणाऱ्या जलसंपदा मंत्र्यांना कोथरूडचे आमदार आणि राज्याचे मंत्री चंद्रकांत पाटील आणि पालकमंत्री अजित पवार हे ही त्यांना माहिती का देत नाहीत? याचेही कोडे आहे. भाजपच्या मंत्र्यांमध्ये विसंवाद आहे. त्याचा परिणाम पुण्याच्या पाणीपुरवठ्यावर होत आहे, अशी टीका मोहन जोशी यांनी केली आहे.

महायुती सरकारमधील या मंत्र्यांनी परस्परांमधील श्रेय वाद, शह-काटशह ही स्पर्धा बंद करून, पुणेकरांच्या प्रश्नांमध्ये लक्ष घालावे, असे मोहन जोशी यांनी पत्रकात म्हटले आहे.

> **महापालिकेला जादा पाणी वापराबद्दल दंड ठोकू', हे त्यांचे म्हणणे अन्यायकारक आहे. पुणे शहर हे महानगर म्हणून आकार घेत आहे. गेल्या काही वर्षात पुण्याची लोकसंख्या ५० लाखांहून अधिक झाली आहे, याची कल्पना जलसंपदा खात्याच्या मंत्र्यांना नसावी"**
>
> **— मोहन जोशी**

# पोलिसांचा वावर जाणवला पाहिजे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्य सरकारच्यावतीने पोलीस दलाकरीता नवीन कार्यालये, वाहने, सीसीटिव्ही,अत्याधुनिक तंत्रज्ञान अशा प्रकारच्या पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. पोलिसांनी गेल्या काही वर्षांमध्ये अतिशय नेत्रदीपक अशा प्रकारची कामगिरी केलेली असून येत्या काळातही सामान्य नागरिकांना दिलासा देण्याचे काम राज्यातील पोलीस दल करेल, अशी अपेक्षा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली.

पुणे शहर पोलीस आयुक्तालयातर्फे शिवाजीनगर येथील पोलीस मुख्यालयात आयोजित 'तरंग-२०२५' कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, खासदार सुनेत्रा पवार, सुनील तटकरे, आमदार अमित गोरखे, योगेश टिळेकर, उद्योजक पुनीत बालन आदी उपस्थित होते.

### विशेष कामगिरीचा सन्मान

- मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते कॉप-२४ उपक्रमाअंतर्गत दुचाकी व चारचाकी वाहनांना हिरवी झेंडी दाखवून लोकार्पण करण्यात आले. तसेच कार्यक्रमात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या पोलीस अधिकारी, कर्मचारी व त्यांचे पाल्यांचा सन्मान करण्यात आला.



पुणे हे महाराष्ट्रातील अत्यंत महत्त्वाचे शहर असून ते राज्याचे उत्पादन व तंत्रज्ञानाचे हब आहे; शहरात आंतरराष्ट्रीय पातळीवरील विविध नागरिक याठिकाणी येत असतात. त्यामुळे शहरातील कायदा व सुव्यवस्था सुस्थितीत राखण्यासोबत वाहतूकीच्या नियमांचे पालन झाले पाहिजे. पुण्यासारख्या शहरांमध्ये अधिकाधिक घटनेच्या अनुषंगाने पोलिसांचा प्रतिसादाचा वेळ कमीत कमी असला पाहिजे. पोलिसांचा वावर नागरिकांना जाणवला पाहिजे.

**— मुख्यमंत्री, देवेंद्र फडणवीस**



राज्यात कायदा व सुव्यवस्था सुस्थितीत राहिले पाहिजे, जातीय सलोखा राहिला पाहिजे, शहरातील वाहतूक कोंडी सुटली पाहिजे, नागरिकांना होणारा त्रास टाळण्यासाठी 'कॉप-२४' या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. कायदा व सुव्यवस्था सुस्थितीत ठेवण्याकरीता पोलीस दलाला पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत असून यापुढेही राज्य सरकार कमी पडणार नाही. नागरिकांनीही आपली जबाबदारी नीटपणे पार पाडावी,

**— उपमुख्यमंत्री अजित पवार**

# अंध विद्यार्थी आंतर महाविद्यालयीन स्पर्धेला चांगला प्रतिसाद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** नुकत्याच झालेल्या अंध विद्यार्थी आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व, प्रश्न मंजुषा व गीत गायन स्पर्धा २०२५ बक्षीस वितरण समारंभ कोहिनूर मंगल सभागृह कर्वे रोड पुणे येथे उत्साहात संपन्न झाला .

या समारंभाच्या वेळी गरवारे कॉलेजचे प्राचार्य डॉ.विलास उगले (प्रमुख पाहुणे), स्वामी विवेकानंद जीवनज्योत संस्थेचे अध्यक्ष मधुकर देशपांडे,गणेश कुलकर्णी (उपाध्यक्ष) श्रीकांत कुलकर्णी (सचिव), सतीश टंकसाळे (खजिनदार), डॉ.आश्विन देशपांडे ,जयंत पेशवे, सतीश ब्रम्हे, विवेकानंद कुलकर्णी, प्रकाश जगताप, प्रा. योगिता काळे, राहुल शहा, प्रा. दीपक कर्वे, नंदिनी सातारकर, वीणा कामतकर व महाविद्यालयीन अंध विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ही वक्तृत्व, प्रश्न मंजुषा व गीत गायन स्पर्धा स्वामी विवेकानंद जीवनज्योत संस्था, पुणे ह्यांनी दिव्यझेप, स.प.महाविद्यालय व मॉर्डन कॉलेज यांच्या सहकार्यातून संपन्न झाली.

## पुण्यात काय घडतंय...

### दादा कोंडके समाजभूषण पुरस्कार




- **विषय** : दादा कोंडके मेमोरिअल फौंडेशनतर्फे दादा कोंडके समाजभूषण पुरस्कार प्रदान सोहळा २०२५ आयोजित करण्यात आला आहे.
- **दिनांक** - सोमवार दिनांक १७ फेब्रुवारी २०२५
- **पुरस्कारार्थी** - प्रसिद्ध तालगुरू आणि तबला वादक पं. सुरेश सामंत, प्रसिद्ध गायक आणि व्हॉईस ऑफ किशोर कुमार जितेंद्र भुरक आणि अष्टांग आयुर्वेद महाविद्यालयाचे माजी प्राचार्य तसेच समाजसेवक डॉ. भिम गायकवाड यांना दादा कोंडके समाजभूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.
- **प्रमुख उपस्थिती** - अध्यक्षस्थान ज्येष्ठ साहित्यिक आणि माजी संमेलनाध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस भूषविणार असून प्रमुख पाहुणे म्हणून महावितरण, पुणेचे मुख्य अभियंता राजेंद्र पवार उपस्थित राहणार आहेत.
- **वेळ : संध्याकाळी ५**
- **स्थळ** - माधवराव पटवर्धन सभागृह, टिळक रस्ता

### हेल्थ हिरोज अ‍ॅवार्ड'व'हेल्थ आयकॉन अवार्ड'

- **विषय :** हेल्थ हिरोज अ‍ॅवार्ड' व 'हेल्थ आयकॉन अवार्ड' प्रदान समारंभाचे आयोजन. हृदयमित्र प्रतिष्ठान तर्फे आरोग्य क्षेत्रात वैशिष्ठ्यपूर्ण कामगिरी करणाऱ्यांना 'हेल्थ हिरोज अ‍ॅवार्ड' देउन गौरविण्यात येते.
- **दिनांक :** सोमवार १७ फेब्रुवारी २०२५
- **पुरस्कारार्थी** - 'हेल्थ हिरोज अ‍ॅवार्ड' पुरस्कारांसाठी डॉ. मिलिंद भोई अध्यक्षः भोई प्रतिष्ठान विश्वस्तः विघ्नहर्ता न्यास पुणे, चंदन शांतीलाल सुरतवाला संचालक आचार्य आनंद ऋषी ब्लड बँक, विनय खटावकर विश्वस्त व केंद्र प्रमुखः भारत विकास परिषद विकलांग केंद्र, उमेश चव्हाण संस्थापक अध्यक्षः रुग्ण हक्क परिषद, महाराष्ट्र राज्य यांची निवड करण्यात आली आहे व पहिल्या 'हेल्थ आयकॉन अ‍ॅवार्ड' पुरस्कारासाठी जुगल राठी (पुणे सायकल प्रतिष्ठान, मॅरेथॉन रनर व ट्रेकर) यांची निवड झाली.
- **प्रमुख उपस्थिती** - माजी IAS अधिकारी लक्ष्मीकांत देशमुख, अध्यक्ष म्हणून प्रसिध्द बँन्कींग तज्ञ विद्याधर अनास्कर
- **वेळ : सायं. ६ वा.**
- **स्थळ -** एस. एम. जोशी फाउंडेशन सेमिनार हॉल, पुणे

# ४०० हून अधिक विद्यार्थ्यांकडून पर्यावरण संवर्धन संदेश



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पर्यावरण विषयक गाणी, कविता, चित्रकलेतून पर्यावरण रक्षणाचा संदेश आणि प्रभावी नाट्य सादरीकरणातून पर्यावरण संवर्धनाचा जागर यातून पुण्यातील शालेय विद्यार्थ्यांनी त्यांची पर्यावरण रक्षणाप्रती असलेली जागरूकता दाखवून दिली. निमित्त होते, वनराई संस्थेचे संस्थापक, माजी केंद्रीय मंत्री, पद्मविभूषण डॉ. मोहन धारिया यांच्या जन्मशताब्दी वर्षांच्या पार्श्वभूमीवर आयोजित वनराई इको क्लब पर्यावरण शिक्षण उपक्रमाचे. या उपक्रमात ५० शाळांमधील ४०० विद्यार्थी सहभागी झाले होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून लिट्ल चॅम्प फेम गायिका अंजली गायकवाड, वनराई चे विश्वस्त डॉ. रोहिदास मोरे, सागर धारिया, वनराईचे सचिव अमित वाडेकर, बबनराव कानकिरड आदी उपस्थित होते.

> **वातावरणातील बदलामुळे गेल्या काही वर्षांपासून पावसाचे चक्र बदलले आहे. आपण हे बदलेल चक्र ठीक करण्यासाठी आपापल्या परीने प्रयत्न केले पाहिजेत. किमान आपल्या घरात येणाऱ्या पाण्याची बचत जरी केली तरी खूप मदत होईल. कारण छोट्या छोट्या गोष्टीच मोठे बदल घडवू शकतात."**
>
> **— सागर धारिया**

## Selected

# नकली पिस्तुल डोक्याला लावून लुटणाऱ्या २ गुन्हेगारांना अटक



**कोंढवा :** हॉटेलमधील काम संपवून पहाटे घरी जाणाऱ्या एका शेफच्या डोक्याला नकली पिस्तुल लावून त्याच्याकडील मोबाईल हिसकावून नेणाऱ्या दोघा सराईत गुन्हेगारांना कोंढवा पोलिसांनी अटक केली आहे. तबरेज ऊर्फ परवेज मुनीर शेख (रा. जे के पार्क, कोंढवा) आणि रमजान अब्बास पटेल( वय २४, रा. शिवनेरीनगर, कोंढवा) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. याबाबत मोहम्मद यासीन निहार मन्सुरी (वय २२, रा. एचडीएफसी बँकेजवळ, साळुंके विहार रोड) यांनी कोंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ही घटना मौर्य सोसायटीच्या समोरील डांबरी रोडवर १५ फेब्रुवारी रोजी पहाटे चार वाजता घडली होती.

# पालिकेकडून प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींवर बंदी ...

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महानगरपालिकेने प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तीसंदर्भात मोठा निर्णय घेतला आहे. पुण्यात प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती बनविणे अथवा विसर्जित करण्यावर बंदी घातली आहे. गणपती किंवा इतर कोणत्याही सणांच्या पार्श्वभूमीवर पीओपीच्या मूर्ती बनवल्यास कारवाई करण्यात येणार आहे. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती करण्याऐवजी नैसर्गिक आणि पर्यावरणपूरक जैविक घटक पदार्थांपासून तयार करण्यात आलेल्या मूर्ती तयार कराव्या, असे पुणे महानगरपालिकेने म्हटले आहे.



तसेच सर्व मूर्तीचे विसर्जन कृत्रिम तलावातच / रहिवासी संकुलातील टाकीमध्ये अथवा मूर्ती स्वीकृती केंद्रामध्ये करणे बंधनकारक करण्यात आले आहे. मूर्तीकारांनी मूर्ती रंगवण्यासाठी हळद, चंदन आणि गेरूचा वापर करण्याचे निर्देश दिले आहेत. फुले, कपडे आणि इतर पूजा साहित्य पर्यावरणपूरक असावे, असेही म्हटले आहे.

दरम्यान मूर्तीकर संघटनांनी पीओपी मूर्ती बंदीच्या निर्णयास विरोध केला आहे. यामुळे लाखो लोकांच्या रोजगारावर परिणाम होणार आहे, असे मूर्तीकर संघटनेचे पदाधिकारी हितेश जाधव यांनी सांगितले.

## ग्राहक-केंद्रित उपाय प्रदान करण्यावर मार्व्हल रिअल्टर्स चे लक्ष

# पुण्यातील लक्झरी राहणीमानाचे भविष्य बदलणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** नाविन्यपूर्ण आर्किटेक्चरल डिझाईनच्या माध्यमातून लक्झरी जीवनशैलीचा नवा अर्थ मांडणाऱ्या मार्व्हल रिअल्टर्सची ओळख पुण्यातील लक्झरी रिअल इस्टेट क्षेत्रातील अग्रणी म्हणून आहे. पुण्याच्या विकसित होत असलेल्या बाजारपेठेसाठी कंपनीने महत्त्वाकांक्षी योजना आखली असून पुढील तीन ते चार वर्षांत १,८०० पेक्षा अधिक युनिट्स वितरित करण्याची मार्व्हल रिअल्टर्सचे नियोजन आहे.

मार्व्हल रिअल्टर्स यांची कोरेगाव पार्क, बोट क्लब रोड, विमान नगर, खराडी, हडपसर, मगरपट्टा, बावधन आणि वाघोली येथे सुरु असलेल्या प्रीमियम निवासी आणि व्यावसायिक प्रकल्पांमुळे उच्च दर्जाच्या राहणीमानात नवीन मापदंड स्थापित होणार आहे. भव्य लेआउटसह घरे, पूर्णपणे सुसज्ज लक्झरी अपार्टमेंट आणि उत्कृष्ट सुविधा ही या प्रकल्पाची वैशिष्ठे आहे. तसेच लक्झरी रिअल इस्टेट मार्केटमध्ये त्यांचे नेतृत्व आणखी मजबूत होईल.

मार्व्हल रिअल्टर्स केवळ घरे बांधत नाहीयेत तर पुण्यातील लक्झरी राहणीमानाचे भविष्य घडवत आहेत. उत्कृष्ट इतिहास, दर्जाशी कोणतीही तडजोड न कऱणे आणि दूरदर्शी दृष्टिकोन यामुळे कंपनी रिअल इस्टेट उद्योगात आघाडीवर आहे. आपल्या वाढीच्या पुढच्या टप्प्यात प्रवेश करत असताना, परिवर्तनकारी अनुभव, अपवादात्मक गुणवत्ता आणि ग्राहक-केंद्रित उपाय प्रदान करण्यावर मार्व्हल रिअल्टर्स लक्ष केंद्रित करत आहे.

### पुण्यात सुविधांनी युक्त निवासी प्रकल्प

- बाजारपेठेतील वाढती मागणी पूर्ण करण्याच्या दृष्टीने पूर्णपणे सुसज्ज स्टुडिओ अपार्टमेंट्स आणि प्रीमियम टचसह रेडी-टू-मूव्ह-इन युनिट्स सादर करण्याची मार्व्हल रिअल्टर्सची योजना आहे.
- इन-हाऊस स्पा, सलून, गॉरमेट शेफ आणि वॉलेट सेवांसह अन्य विशेष सेवाही असतील. त्यामुळे लक्झरी आणि सोयींचा अनोखा मिलाफ होणार आहे.
- चोखंदळ घरमालकांच्या बदलत्या गरजा पूर्ण करणारे कालातीत, डिझाइन-चालित प्रकल्प



## At a Glance

### बावधनमध्ये 'बॉम्बे हाय बार/बॉम्बे बिस्ट्रो' बारवर कारवाई!



**पुणे :** पिंपरी-चिंचवड झोन २ चे उप आयुक्त विशाल गायकवाड यांना बावधन पोलीस ठाण्याच्या हद्दीतील 'बॉम्बे हाय बार/बॉम्बे बिस्ट्रो' हे बार नियमानुसार ठरवलेल्या वेळेच्या पुढेही सुरू असल्याची माहिती मिळाली. त्यांच्या सूचनेनुसार वाकड पोलीस ठाण्याचे एपीआय गज्जेवार आणि बावधन पोलीस ठाण्याच्या महिला पीएसआय जाधव यांनी त्यांच्या पथकासह घटनास्थळी छापा टाकला. रात्री पावणेतीन वाजता छापा टाकल्यानंतर बारमध्ये सुमारे १५० ते २०० ग्राहक उपस्थित असल्याचे आढळले.

कारवाईदरम्यान कंप्युटर सेटअप, म्युझिक सिस्टम, सोफा सेट व कुशन, टेबल आणि खुर्च्या, CCTV DVR, हुक्का पॉट्स साहित्य जप्त करण्यात आले. जप्त केलेल्या सामानाची एकूण किंमत ₹9,92,700 इतकी आहे. या प्रकरणात बार व्यवस्थापक प्रतीक कांबळे आणि मालक सागर गायकवाड व सुमित चौधरी यांच्यावर महाराष्ट्र पोलीस कायद्याच्या नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शेकडो काँग्रेस कार्यकर्त्यांचे 'तीव्र आंदोलन'

## बेरोजगारी आणि वाढत्या नशेखोरीच्या विरोधात पुण्यात हल्लाबोल





■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** महाराष्ट्रात वाढती बेरोजगारी आणि त्यामुळे वाढणारे गुन्हे यावर केंद्र सरकार आणि महाराष्ट्र सरकारचे लक्ष केंद्रीत करण्यासाठी युवक काँग्रेसच्या वतीने हल्लाबोल आंदोलन करण्यात आले. यावेळी हजारोच्या संख्येने युवक सहभागी झाले होते.

यावेळी बोलताना उदय भानु चिब म्हणाले , "आज आपण इथे उपस्थित राहून हे दर्शवले आहे कि भारत मातेच्या भविष्यासाठी हे आंदोलन किती महत्त्वचे आहे. या 10 वर्षात बेरोजगारी, नशा खोरी, ड्रग्ज रॅकेट याचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. या व्यसनामुळे केवळ तो व्यसन करणारा युवक बरबाद होतं नाही तर त्याचे संपूर्ण कुटुंब बरबाद होते. आज या मोदी सरकारने भारताची प्रतिमा खराब केली आहे. हे सरकार झोपेचे सोंग घेऊन बसले आहे, असा आरोप ही यावेळी त्यांनी केला. तसेच बेरोजगारी आणि नशेखोरी थांबवण्यासाठी मोदी सरकार ने प्रयत्न करावे अशी मागणी ही केली.

भारतीय युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष उदय भानु चिब व महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे कार्याध्यक्ष शिवराज मोरे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाला राष्ट्रीय युवक काँग्रेस प्रभारी कृष्णा अल्लावरू, महाराष्ट्र अध्यक्ष कुणाल राऊत, महाराष्ट्र प्रभारी अजय चिकारा , कार्यअध्यक्ष शिवराज मोरे , महाराष्ट्र युवक काँग्रेस सह प्रभारी एहसान भाई खान, पुणे शहर युवक काँग्रेस शहराअध्यक्ष सौरभ आमराळे, प्रदेश प्रभारी अजय चीकारा, अध्यक्ष कुणाल राऊत, रोहित कुमार, मीडिया विभागाचे अध्यक्ष अक्षय जैन, उमेश पवार, कौस्तुभ नवले, अजित सिंग, वैष्णवी किराड, दीपाली ससाणे, प्रथमेश आबनावे, प्रविण बिरादार, श्रीनिवास नालमवार, तारीक बागवान, गणेश उबाळे, आदी कार्यकर्ते आंदोलनात सहभागी झाले होते. आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

एहसान भाई खान म्हणाले ," आज या आंदोलनात तरुणांचा जोश दिसत आहे. यावरून आपल्याला कळते कि आज देशात बेरोजगारीचे प्रमाण किती वाढले आहे. आज केंद्र सरकार, महाराष्ट्र सरकार या गोष्टीकडे डोळेझाक करत आहे. अशा या सरकारचे आपल्याला या आंदोलनातून डोळे उघडणी करायची आहे." सौरभ अमराळे म्हणाले , "आधी पुण्याची ओळख ही विद्येचे माहेर घर म्हणून होती मात्र आता ड्रॅगचे माहेर घर म्हणून ओळखली जात आहे. आज पुण्यात सर्वात जास्त व्यसनाच्या आधीन गेलेले तरुण पाहायला मिळत आहे".

### नारे आणि आक्रोश

● **"नोकरी द्या नशा नको" अशा घोषणा देत काँग्रेस भवन येथून पदयात्रा करीत हल्लाबोल आंदोलन सुरु करण्यात आले. पुढे बालगंधर्व चौकात आंदोलन कर्त्यांना अडविण्यात आले. तर पोलिसांकडून काही आंदोलन करणाऱ्या युवकांना पोलिसांनी ताब्यात घेतले.**



"आपला महाराष्ट्र पुरोगामी विचारांचा महाराष्ट्र आहे. महाराष्ट्राला मिळणारे उद्योग, रोजगार आज गुजरातला पळवण्याचे काम मोदी, शहा करत आहेत. तर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री डोळे झाकून बसले आहेत. बेरोजगारीमुळे आज महाराष्ट्र काय संपूर्ण देशातले तरुण देशोधडीला लागले आहेत. वाढत्या बेरोजगारीमुळे अनेक तरुणांनी परदेशात पळ काढला आहे. आज महाराष्ट्र उडता पंजाब झाला आहे. एवढेच काय तर आज बीडचा बिहार झाला आहे. आज महाराष्ट्राची प्रतिमा घसरत चाली आहे. या वाढत्या बेरोजगारीमुळे युवकांचे आत्महत्या करण्याचे प्रमाण वाढले आहे. ही आजची लढाई निवडणुकी पुरता नाही तर युवकांना जोपर्यंत रोजगार मिळत नाही तोपर्यंत ही लढाई चालू राहणार आहे. ड्रग्सचे रॅकेट महाराष्ट्रात थांबवल्या शिवाय आम्ही ही लढाई थांबवणार नाही".

**— शिवराज मोरे**

# शिवजयंती निमित्त जागरुकतेसाठी आयोजन

## २० हजार विद्यार्थ्यांची पदयात्रा

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** राष्ट्रभावना, सामाजिक सलोखा, युवांच्या संकल्पना जाणून घेणे, कला, संस्कृती व परंपरा जतन करणे, स्वच्छता, पर्यावरण याबाबत जागृकता, राष्ट्र निर्माणात मोलाचे योगदान देणा-या व्यक्तिमत्वाच्या कार्याचे आदर्श युवा पिढी पर्यत पोहचविण्याच्या उद्देशाने शिवजयंती दिनी " जय शिवाजी, जय भारत" पदयात्रेचे सकाळी ९.३० वा. ते १२.३० या वेळेत आयोजन करण्यात आले आहे.

सांस्कृतिक वारसा जतन करणे यासाठी केंद्र शासनाच्या युवा कल्याण व खेळ मंत्रालय व राज्य शासनाच्या निर्देशानुसार ही पदयात्रा आयोजित करण्यात आली आहे. राष्ट्र व राज्याच्या शाश्वत विकासात युवांचे मोलाचे योगदान आहे. युवांमध्ये नेतृत्व गुण, व्यक्तिमत्व विकास, सामाजिक सेवा भाव, शासकीय उपक्रमांबाबत माहिती व सहयोग यांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. त्यामुळे या पदयात्रेत युवा व क्रीडा पुरस्कारार्थी तसेच शहरातील सुमारे १५००० ते २०००० विद्यार्थी व युवा सहभागी होणार आहेत. या पदयात्रेला राज्याचे मुख्यमंत्री, नागरी विमान वाहतूक आणि सहकार केंद्रीय राज्यमंत्री, राज्याचे उपमुख्यमंत्री, क्रीडा व युवक कल्याण व अन्य मंत्री सहभागी होणार आहेत.



पदयात्रेचा सकाळी ९.३० वाजता सी.ओ.ई.पी तंत्रनिकेतन विद्यापीठ, शिवाजीनगर पुणे येथील क्रीडांगणावरुन प्रारंभ करण्यात येणार आहे. पदयात्रेचा मार्ग सी.ओ.ई.पी. होस्टेल गाऊंड, शिवाजीनगर ते फर्ग्युसन महाविद्यालय असा राहील. सी.ओ.ई.पी. होस्टेल ग्राऊंड, डावीकडे वळून स.गो. बर्वे चौक, डावीकडे वळून एआयएसएसपीएमएस कॉलेज, छ. शिवाजी महाराज पुतळा अभिवादन (हॉल्ट नं. १) उजवीकडे वळून कोर्टासमोरील गेटमधून उजवीकडे वळून छ. शिवाजी महाराज पुतळा चौक, उजवीकडे वळून स.गो. बर्वे चौक, डावीकडे वळून जंगली महाराज रोडने झाशीचीराणी चौक (हॉल्ट नं. २) छ. संभाजी महाराज पुतळा, खंडोजी बाबा चौक यु टर्न करून गुडलक चौक, फर्ग्युसन कॉलेज गेट डावीकडे वळून फर्ग्युसन कॉलेज असा मार्ग निश्चित करण्यात आलेला आहे.

विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विभागाचे अधिकारी यांचेमार्फत कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. पदयात्रेमध्ये शहरातील युवा, युवतींनी, नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन क्रीडा व युवक सेवा विभागाचे उपसंचालक युवराज नाईक यांनी केले आहे.

# कात्रज घाट मोडकळीस; सुरक्षेकडे दुर्लक्षच



■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**कात्रज :** कात्रज बोगद्यात विजेची सोय नसल्याने रात्रीच्या वेळी अपघाताची शक्यता आहे. अनेक ठिकाणी रस्त्यावर भक्कम संरक्षक कठड्यांची गरज आहे. घाटात अनेक ठिकाणी कमी उंचीचे तसेच रस्त्यालाच समांतर संरक्षक कठडे आहेत. कात्रज घाट पर्यटन स्थळ म्हणूनही परिचित होत आहे. त्यामुळे येथे थांबून पावसाळ्यात निसर्गाचा आनंद घेण्यासाठी येथे अनेक पर्यटक येतात. याशिवाय येथे अपघात झाल्यास वाहन थेट दरीत कोसळण्याची शक्यता आहे.

जुन्या कात्रज घाट रस्त्याच्या सुरक्षेला प्रशासनाकडून घाट दाखविण्यात येत आहे. सुरक्षेसाठी असलेले कठडेही मोडकळीस आले आहेत. अनेक ठिकाणी संरक्षण कठड्यांची दुरवस्था झाली आहे. त्याकडे प्रशासनाने लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे.

अनेक दिशादर्शक फलकांची दुरवस्था झाल्याने नव्याने दिशादर्शक आणि सूचनांचे फलक लावावेत. रस्त्यावरील पांढऱ्यापट्या तसेच रिफ्लेक्टरचीही नियमित देखभाल दुरुस्ती व्हावी. काही ठिकाणी रम्बलर गतिरोधक बसवण्यात यावेत अशी मागणीही होत आहे.

### त्वरित दुरुस्ती हवी

● बोपदेव घाटातील घटना तसेच घाटात वैद्यकीय कचरा/ राडारोडा टाकण्याच्या घटना घडतात. त्यामुळे घाटातील मोडकळीस आलेल्या पोलिस चौकीची दुरुस्ती करून पोलिसांनी रात्रीच्या वेळी पेट्रोलिंग करावे. भिलारेवाडी हद्दीत पावसाळी गटारे उघडीच असून ती दुरुस्त करण्याची गरज असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

### धोका वाढला

● अनेकवेळा माती निसटून डोंगरावरील दगड रस्त्यावर पडण्याचा धोकाही वाढला आहे. मोठ्या पावसात अशा घटना वारंवार घडतात. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने आणि महापालिकेने याबाबत लवकरात लवकर उपाययोजना कराव्यात अशी मागणी स्थानिक नागरिक आणि प्रवाशांकडून केली जात आहे.

# ए. आय. नोकऱ्या घालविणारे नव्हे तर देणारे माध्यम : दीपक शिकारपूर



■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (ए. आय.) वापरामुळे बेरोजगारी वाढण्याची भीती नाही. कृत्रिम बुद्धिमत्तेचा सकारात्मक वापर करून शैक्षणिक क्षेत्र, मार्केट रिसर्च, अभियांत्रिकी, माहिती संकलन, शेती आदी कार्य क्षेत्रांमध्ये अनेक संधी उपलब्ध होऊ शकतात, असे प्रतिपादन माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील अग्रणी, प्रसिद्ध संगणकतज्ज्ञ दीपक शिकारपूर यांनी केले. ए. आय. तंत्रज्ञानाला स्पर्धक समजू नका तर त्याचा मदतनीस म्हणून वापर करा, सजक वापरकर्ते व्हा, असा सल्लाही त्यांनी दिला.

'ए आय आणि संधी' या विषयावर वाचन कट्टा या उपक्रमाअंतर्गत पुणे नगर वाचन मंदिरातर्फे शिकारपूर यांचे आज (दि. 16) व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्या वेळी ते बोलत होते. सहकार्यवाह प्रसाद जोशी, वाचक कट्टाचे प्रमुख, कार्यकारिणी सदस्य विनायक माने उपस्थित होते. पुणे नगर वाचन मंदिरात व्याख्यान झाले.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात नवीन संधी उपलब्ध होतील, असे सांगून शिकारपूर पुढे म्हणाले, आजच्या युगात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर माहिती, संवाद आणि इमेज प्रोसेसिंग या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर केला जात आहे. वापरकर्ता हाच माहितीचा वाहक असल्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर सजगतेने होणे आवश्यक आहे. अयोग्य माहिती देणे नीतिमत्तेचे प्रश्न निर्माण करू शकते. या तंत्रज्ञानाचा अतिरेकी वापर करू नये. म्हणूनच मर्यादित डिजिटल प्रेझेन्स आवश्यक आहे. सोशल मीडियाचा अतिरेकी वापर, माहितीचा अयोग्य वापर यातून सायबर गुन्हे वाढू शकतात. म्हणूनच युवा पिढीला सायबर संस्कार देणे ही काळाची गरज आहे. सायबर सिक्युरिटीविषयी कायद्याचे मुलभूत ज्ञान प्रत्येकाला असणे आवश्यक आहे.

कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर कितीही मोठ्या प्रमाणात झाला तरी मानवी मेंदूत असलेल्या नॉन डिजिटल अनुभवांपुढे कृत्रिम बुद्धिमत्तेचे सामर्थ्य नेहमीच कमी राहणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेविषयक अंधविश्वास न ठेवणे, भावनिक गुंतवणूक न करणे, सततचा वापर योग्य नसून आज डिजिटल उपासाची समाजाला गरज आहे.

**— डॉ दीपक शिकारपूर**

# उपमुख्यमंत्री अजित पवारांचा चिकन खाणाऱ्यांसाठी सल्ला

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** महाराष्ट्रात गिलेन-बॅरे सिंड्रोम (GBS) च्या वाढत्या प्रकरणांमुळे लोक खूप घाबरले आहेत. दरम्यान, वाढत्या प्रकरणांच्या संख्येच्या पार्श्वभूमीवर, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जनतेला सावधगिरी बाळगण्याचे आणि कमी शिजवलेले चिकन खाणे टाळण्याचे आवाहन केले आहे. ते म्हणाले की, या आजाराच्या वाढत्या घटना लक्षात घेता, लोकांनी त्यांचे अन्न, विशेषतः चिकन, पूर्णपणे शिजवावे. सध्या या आजाराचे प्रमाण दिवसेंदिवस पसरत चालले असून पुण्यात सुरू झालेले हे प्रकरण आता महाराष्ट्राच्या विविध भागात पोहचले आहे आणि म्हणूनच आधीपासून काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी यासाठीच महत्त्वाची सूचना केली आहे.

"डॉक्टर असेही सल्ला देतात की अन्न नीट शिजवले पाहिजे. सध्या, जीबीएसची परिस्थिती नियंत्रणात आहे आणि घाबरून जाण्याची गरज नाही. सरकार आणि आरोग्य विभाग या आजारावर सतत लक्ष ठेवून आहेत आणि संसर्ग रोखण्यासाठी आवश्यक ती पावले उचलत आहेत. या आजारावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रत्येकाने स्वतःची काळजी घेणेही तितकीच आवश्यक आहे, असा सल्ला उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जनतेला दिला आहे.



या आजाराबाबत कुक्कुटपालनाशी संबंधित चिंता दूर केल्या पाहिजेत आणि कोंबड्यांना मारण्याची गरज नाही. अलीकडेच खडकवासला धरण परिसरात (पुणे) जीबीएसचे रुग्ण आढळले आहेत. काही तज्ज्ञांनी याचा संबंध पाण्याच्या दूषिततेशी जोडला, तर काहींनी हा आजार चिकन खाल्ल्याने झाल्याचे म्हटले. सखोल तपासणीनंतर, असा निष्कर्ष काढण्यात आला की कोंबड्यांना मारण्याची गरज नाही."

**— अजित पवार** उपमुख्यमंत्री,

# डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजनेचे प्रस्ताव २२ फेब्रुवारीपर्यंत सादर करा

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** राज्यातील नोंदणीकृत मदरशाच्या आधुनिकीकरणासाठी डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजनेचे २०२४-२५ साठीचे प्रस्ताव २२ फेब्रुवारी २०२५ पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या योजने अंतर्गत पात्र मदरशांची शासनास अनुदानासाठी शिफारस करण्यात येणार आहे. त्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असून, या योजने अंतर्गत सन २०२४-२५ या वर्षासाठी अनुदान मिळवू इच्छिणा-या मदरशांनी त्याचे प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठवावेत. जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या समितीमार्फत अल्पसंख्यांक विकास विभागाच्या ११ ऑक्टोबर २०१३ च्या शासन निर्णयामध्ये विहीत केलेल्या निकषानुसार तपासणी करुन पात्र मदरशांची शासनास शिफारस करण्यासाठी प्रस्ताव पाठवण्यात येतील.

तसेच राज्यातील नोंदणीकृत शाळांच्या आधुनिकीकरणासाठी धार्मिक अल्पसंख्यांक विद्यार्थी बहुल शासनमान्य खाजगी अनुदानित, विना अनुदानित, कायम विना अनुदानित शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नगरपरिषद व अपंग शाळांमध्ये पायाभूत सोयी सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना सन 2024-25 मंत्रिमंडळाच्या मान्यतेनुसार शासन निर्णय ७ ऑक्टोबर २०१५ अन्वये या योजने अंतर्गत पात्र शाळांची शासनास अनुदानासाठी शिफारस करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. ७ ऑक्टोबर २०२४ अन्वये सदर योजनेअंतर्गत पायाभूत सोयीसुविधेसाठी देण्यात येणाऱ्या अनुदानाची रक्कम २ लाखा वरून वाढवून १० लाख करण्यात आली आहे.शासन निर्णयामध्ये विहीत केलेल्या निकषानुसार तपासणी करुन पात्र शाळांची शासनास शिफारस करण्यासाठी इच्छुक शाळांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे २२ फेब्रुवारी २०२५ पर्यंत प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन प्रसिद्धी पत्रकान्वये करण्यात आले आहे.

# हाय सिक्युरिटी नंबर प्लेटचे कामकाज होणार वेगाने

### सुरक्षा

**राज्य शासनाने एचएसआरपीचे काम वेगाने व्हावे, याकरिता राज्यात तीन झोनमध्ये वर्गीकरण केले आहे. त्या झोनअंतर्गत एचएसआरपी बसवण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. पुणे झोन एकमध्ये येत असून, याकरिता रोझ मार्टा सेफ्टी सिस्टीम म्हणून वेंडर आहेत. त्याची सर्व माहिती आणि एचएसआरपीसाठीची अर्ज प्रक्रिया 'ट्रान्सपोर्ट. जीओव्ही.इन' या संकेतस्थळावरून करता येईल.**

**- स्वप्निल भोसले,** उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट (एचएसआरपी) बसवण्याचा कारभार सुलभ आणि वेगवान व्हावा, याकरिता परिवहन विभागाकडून राज्यात तीन झोन (विभाग) तयार करण्यात आले आहेत. त्या झोनमध्ये राज्यातील आरटीओ कार्यालयांची विभागणी करण्यात आली असून, यामुळे हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसवण्याचे कामकाज वेगाने होणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे. राज्यभरात एचएसआरपी (हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट) बसवण्यासाठी



परिवहन विभागामार्फत तीन झोन तयार करण्यात आले आहेत. त्या झोनअंतर्गत (विभाग) एचएसआरपी बसवण्याची नियोजन सुरू करण्यात आले आहे.

प्रत्येक झोन अंतर्गत प्रादेशिक परिवहन कार्यालयांची नियुक्ती करण्यात आली आहे. झोन एक अंतर्गत बारा, झोन दोन अंतर्गत 18, तर झोन तीन अंतर्गत 27 आरटीओ कार्यालयांचा समावेश करण्यात आला आहे. यामुळे राज्यभरात असलेल्या वाहनांना हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसवण्याचे कामकाज सुलभ पद्धतीने व वेगाने होणार आहे. 31 मार्च 2025 पूर्वी राज्यातील 2019 पूर्वीच्या जुन्या वाहनांना एचएसआरपी बसवणे बंधनकारक आहे, त्यानुसार ही कार्यवाही परिवहन विभागाकडून सुरू आहे.

### झोन 1 मधील आरटीओ कार्यालये

बोरिवली, ठाणे, पनवेल, कोल्हापूर, पुणे, नांदेड, अमरावती, वाशिम, यवतमाळ, नागपूर (ईस्ट), नागपूर (यू), इचलकरंजी

### झोन 2 मधील आरटीओ कार्यालये

मुंबई सेंट्रल, मुंबई (ईस्ट), वसई, कल्याण, पेण (रायगड), रत्नागिरी, मालेगाव, नंदुरबार, सातारा, फलटण, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, वैजापूर, वर्धा, नागपूर (रुरल), गोंदिया, गडचिरोली

### झोन 3 मधील आरटीओ कार्यालये

मुंबई (वेस्ट), वाशी (नवी मुंबई), सिंधुदुर्ग, अहिल्यानगर, नाशिक, श्रीरामपूर, धुळे, जळगाव, भाडगाव, चाळीसगाव, सांगली, कराड, अकलूज, बारामती,

## At a Glance

### स्वच्छ, सुंदर शहरासाठी इंदूर पॅटर्न

**धायरी :** सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने कचरा व्यवस्थापनासाठी नव्हे येथे 'इंदूर पॅटर्न' राबविण्यात येत आहे. वेताळबाबा चौकात या अभियानाला नुकतीच सुरुवात करण्यात आली. महापालिकेचे घनकचरा व्यवस्थापन विभागाचे प्रमुख संदीप कदम यांनी देशात सलग सातवेळा स्वच्छ सर्वेक्षणामध्ये प्रथम क्रमांक पटकाविलेल्या मध्य प्रदेशमधील इंदूर शहरातील घनकचरा व्यवस्थापनाचा अभ्यास करण्यासाठी ११० अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे पथक पाठविले होते.

'इंदूर पॅटर्न'नुसार पुणे शहरात कचरा व्यवस्थापन करण्याच्या सूचना महापालिका प्रशासनाने सर्व क्षेत्रीय कार्यालयांना दिल्या होत्या. त्यानुसार सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने नव्हे गावातून या पॅटर्नची सुरुवात करण्यात आली. याअंतर्गत सार्वजनिक ठिकाणी व्यवसाय करणारे दुकानदार, पथारी व्यावसायिक, भाजीविक्रेते यांना कचरा साठविण्यासाठी स्वतंत्र बकेट ठेवणे सक्तीचे करण्यात आले आहे. स्वच्छ संस्थेचे कर्मचारी घरोघरी जाऊन कचऱ्याचे संकलन करत आहेत. त्यांच्याकडे कचरा न देणाऱ्या नागरिकांना नोटीस व दंड करण्याच्या सूचना या वेळी देण्यात आल्या.

'माझे पुणे, स्वच्छ पुणे', 'सुंदर पुणे, हरित पुणे' ही संकल्पना प्रत्यक्षात उतरविण्यासाठी नागरिकांनी आपल्या घराचा परिसर, रस्ते, सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ ठेवून महापालिका प्रशासनाला सहकार्य केले पाहिजे — **नामदेव बजबळकरडू** सहायक आयुक्त

# आता ड्रोनची ४०० फूट झेप

## परवानगीची नाही गरज : शासनाकडून नियम शिथिल

**राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** फोटोग्राफी, शेती, वितरण सेवा आणि पाळत ठेवणे यासारख्या विविध क्षेत्रांमध्ये त्यांच्या बहुमुखी वापरामुळे अलिकडच्या काळात ड्रोनना प्रचंड लोकप्रियता मिळाली आहे. तथापि, ड्रोनच्या वापरात वाढ झाल्यामुळे, सुरक्षितता, गोपनीयता आणि सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी नियमांची आवश्यकता वाढत आहे. भारतात, नागरी विमान वाहतूक महासंचालनालय (DGCA) ड्रोनच्या वापराचे नियमन करते.


पण आता विनापरवानगी सुमारे ४०० फूट उंचीपर्यंत ड्रोन उडवता येणार आहे. केंद्र शासनाने हे नियम शिथिल केले असून, लवकरच नवे ड्रोन धोरण लागू होणार आहे. आधी कोठेही ड्रोन उडवायचा म्हटले तर प्रशासनाची परवानगी लागत असे. हे धोरण केंद्रीय नागरी उड्डाण मंत्रालयाच्या वतीने राबवले जाणार आहे.

केंद्रीय नागरी उड्डाण मंत्रालयाने या बाबतचे नवे धोरण तयार केले असून भविष्यात ड्रोन हे आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनणार आहे. शेतीपासून सीमेवर रक्षण करणाऱ्या सैनिकांपर्यंत ड्रोनची मदत घ्यावी लागणार आहे. सध्या देशात २९ हजार ५०० इतके नोंदणीकृत ड्रोन आहेत.

मात्र शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थी आणि हौशी छायाचित्रकारांना ती किती उंचीवर उडवावित याबाबत स्पष्ट नियमावली नाही. शहरी भागात ड्रोन उडवताना प्रशासनाची परवानी असेल तर तो उडवता येतो अन्यथा त्याचा माग काढून कारवाई होते.

देशात विविध ठिकाणी ड्रोन उत्पादनाची ठिकाणे निवडून त्याठिकाणी ड्रोन हब तयार केले जाणार आहेत. विदेशातून ड्रोन आयातीला बंदी घालून ते देशांतर्गत तयार करण्यावर सरकारचा भर आहे. त्यामुळे भारतीय बनावटीच्या ड्रोनचीच खरेदी-विक्री यापुढे होईल. भारतात जागतिक दर्जाचे ड्रोन तयार करून ते मोठ्या प्रमाणावर निर्यात केले जाणार आहेत.





### नियामक चौकट

- अलिकडच्या वर्षांत ड्रोनची लोकप्रियता वाढली आहे, ज्यामुळे नियामक संस्थांना सुरक्षितता आणि जबाबदार वापर सुनिश्चित करण्यासाठी नियम आणि मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यास प्रवृत्त केले आहे. देशानुसार आणि अगदी स्थानिकतेनुसार नियम बदलत असले तरी, जगभरातील ड्रोन उड्डाणांना लागू होणारे काही सामान्य मार्गदर्शक तत्त्वे आहेत.

### ड्रोन धोरणातील आयाम

- **सुमारे ९० टक्के हवाई क्षेत्र हे हरित क्षेत्र म्हणून अधिसूचित केले आहे. त्यामुळे ४०० फूट उंचीपर्यंत ड्रोन उडवण्यासाठी परवानगीची आवश्यकता नाही.**
- **ड्रोन (सुधारणा) नियम ११ फेब्रुवारी २०२२ रोजी अधिसूचित करण्यात आले, ज्यामध्ये ड्रोन पायलट परवान्याची आवश्यकता रद्द करण्यात आली.**
- **ड्रोन स्कूलने जारी केलेले रिमोट पायलट प्रमाणपत्र ड्रोन चालविण्यासाठी पुरेसे असेल.**
- **२५० ग्रॅमपेक्षा कमी वजनाचे सर्व ड्रोन चालविण्यासाठी पायलट प्रमाणपत्रांची आवश्यकता रद्द करण्यात आली.**
- **भारतीय हवाई क्षेत्र हिरवे, पिवळे आणि लाल अशा तीन झोनमध्ये विभागण्यात आले आहे.**
- **पिवळ्या झोनचे अंतर ४५ कि.मी. वरून १२ कि.मी. पर्यंत कमी करण्यात आले आहे.**
- **ड्रोनचे संशोधन, डिझाइन आणि चाचणी क्षेत्र पूर्णपणे खुले करण्यात आले असून, नियमांमध्ये ड्रोन टॅक्सीसह ५०० किलो वजनाच्या ड्रोनचा समावेश आहे.**



भारताला ड्रोन उत्पादनाचे हब बनविण्याचा निर्धार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला आहे. त्या माध्यमातून केंद्रीय नागरी उड्डाण मंत्रालय त्याची तयारी करीत आहे. २०३० पर्यंत आपण जागतिक ड्रोन हब होऊ शकतो. कारण ड्रोननिर्मित करून जगाला पुरवण्याची क्षमता आपल्या देशात आहे. त्यासाठीच नवे धोरण आखले आखले आहे.
— **राममोहन नायडू** केंद्रीय नागरी उड्डाणमंत्री.

# मेट्रोच्या संभाजी उद्यान स्टेशन पार्किंगचा मार्ग मोकळा

**राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** मेट्रोचे संभाजी उद्यान येथील स्टेशन सुरू झाले आहे. त्यामुळे जंगली महाराज रस्त्यावरील मेकॅनिकल वाहनतळ मेट्रोच्या उपयोगी ठरणार आहे. याचा प्रस्ताव वर्षभरापासून प्रलंबित होता. यासंदर्भात एक बैठक झाली असून, त्यात हे वाहनतळ मेट्रोला देण्याचा निर्णय झाला आहे.

डेक्कन, जंगली महाराज रस्त्यावर पार्किंगची सुविधा करण्यासाठी पुणे महापालिकेने अनेक वर्षांपूर्वी छत्रपती संभाजी उद्यानासमोर मेकॅनिकल वाहनतळ उभे केले. पण ते वाहनतळ यशस्वीपणे चालविता आले नाही. आता हे वाहनतळ महामेट्रोला चालविण्यासाठी देणार आहे. खर्च जाऊन मिळणाऱ्या उत्पन्नातून महापालिकेला ८० टक्के रक्कम मिळणार आहे.

महामेट्रोने वनाज ते रामवाडी आणि स्वारगेट ते पिंपरी या मार्गांवर मेट्रोसेवा सुरू केली आहे. पण मेट्रो स्टेशनच्या परिसरात पुरेशी पार्किंग सुविधा नसल्याने नागरिकांची अडचण होत आहे. मेट्रोने प्रवास करण्यापूर्वी दुचाकी, चारचाकी लावायची कोठे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. महापालिकेने महामेट्रोला काही जागा हस्तांतर केली आहे. पण तेथे पार्किंगची सुविधा सुरू झालेली नाही.

### वाहनतळाविषयी

- १) अनेक वर्षांपासून हे वाहनतळ बंद पडलेले आहे.
- २) यंत्रसामुग्रीची देखभाल व दुरुस्ती नियमीत झालेली नाही.
- ३) या वाहनतळाच्या दुरुस्तीसाठी मोठा खर्च येण्याची शक्यता आहे.
- ४) हा खर्च पुणे महापालिका करणार की महामेट्रो, हे अद्याप निश्चित झालेले नाही.

मेकॅनिकल वाहनतळ महामेट्रोच्या ताब्यात देण्यास महापालिकेच्या भाडे व सुरक्षा ठेव निर्धारण समितीत मान्यता देण्यात आली. या वाहनतळातून जे उत्पन्न मिळणार आहे, त्यातील ८० टक्के पालिकेला तर २० टक्के उत्पन्न महामेट्रोस दिले जाणार आहे. यासंदर्भातील प्रस्ताव महापालिका आयुक्तांकडे पाठविला आहे.
— **संदीप पाटील** अभियंता,

# आता शहरात चार आठवडेबाजार

**राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** महापालिकेच्या हद्दीतील ॲमेनीटी स्पेस लोहगाव, बाणेर, पाषाण, बावधन व बालेवाडी या ठिकाणची जागा शेतकरी आठवडे बाजारासाठी निवड करण्यात आली आहे. तसेच, पुढील दोन महिन्यांत हे सर्व बाजार सुरू करण्याचे महापालिका प्रशासनाचे नियोजन आहे. जागतिक बँक आणि राज्य शासनाच्या माध्यमातून पुणेकरांना थेट शेतकऱ्यांच्या शेतातून सेंद्रीय भाजीपाला आणि फळे उपलब्ध करून देण्यासाठी महापालिकेकडून शहरात चार आठवडे बाजार सुरू केले जाणार आहेत अशी माहिती महापालिका अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी.पी. यांनी दिली.



शासनाच्या माध्यमातून संत शिरोमणी सावतामाळी रयत बाजार अभियान राबविले जात आहे. त्या अंतर्गत जागतिक बँकेच्या मदतीतून बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट) राबविण्यात येत आहे. या अंतर्गत हे आठवडे बाजार उभारले जाणार आहेत. शेतकरी आठवडे बाजारांच्या दर्जा मध्ये सुधारणा करून, शहरी भागातील ग्राहकांना विषमुक्त आणि ताजी फळे व भाजीपाला वाजवी दरात उपलब्ध व्हावा व शेतकऱ्यांच्या शेतमालाला चांगला दर मिळावा, तसेच वाहतूक कोंडी कमी व्हावी हा उद्देशही असल्याचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी.पी. यांनी स्पष्ट केले.

शासनाच्या कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणातर्फे (आत्मा) निवड केलेल्या समुदाय आधारित संस्थाना व शेतकरी उत्पादक कंपनी यांना या बाजारात विक्रीसाठी संधी देण्यात येणार आहे.

शहरातील नागरिकांचा अन्न पोषणाचा स्तर उंचावणे, शाश्वत अन्न व्यवस्था- शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला शेतीमाल व उत्पादने थेट शेतकरी ते ग्राहक विक्री व्यवस्था निर्माण करणे तसेच शहरी भागातील नागरिकांना स्वच्छ, ताजे, गुणवत्तापूर्ण पोषणयुक्त फळे, भाजीपाला, मांस उपलब्ध करून देण्यासाठी हे बाजार महत्वाची भूमिका बजावणार आहेत.
— **पृथ्वीराव बी.पी.**
अतिरिक्त आयुक्त. पुणे मनपा

## तरुणीची ३५ लाखांची फसवणूक

**राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** विवाहाचे आमिष दाखवून संगणक अभियंता तरुणीची ३५ लाख रुपयांची फसवणूक केल्याची घटना बाणेर परिसरात घडली. या प्रकरणी बाणेर पोलिसांनी एका तरुणाला मुंबईतून अटक केली आहे. साईश विनोद जाधव (वय २५, रा. शेल कॉलनी रस्ता, चेंबूर, मुंबई) असे अटक केलेल्या तरुणाचे नाव आहे. याबाबत एका २९ वर्षीय तरुणीने बाणेर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी या तरुणावर भारतीय न्याय संहितानुसार गुन्हा दाखल केला आहे. तरुणी बाणेरमधील मुलींच्या वसतिगृहात राहत असून, एका आयटी कंपनीत अभियंता आहे. या तरुणीने २०२३ मध्ये एका विवाहविषयक संकेतस्थळावर नोंदणी केली होती.

# पाणी चोरीचा मामला !

## महापालिकेचा महत्वाचा निर्णय

**राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** शहरातील ज्या भागांमध्ये महापालिकेच्या वतीने टँकरद्वारे पाणी पुरविले जाते, त्या टँकरवर लक्ष ठेवण्याची जबाबदारी महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागातील कर्मचाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे. पाण्याचा टँकर अन्य ठिकाणी गेल्यास त्याची जबाबदारी संबधित कर्मचाऱ्यांवर येणार असल्याने, आता तरी टँकरमधून होणाऱ्या पाणीचोरीच्या प्रकारांना आळा बसेल, अशी महापालिकेला आशा आहे.

शहरातील ज्या भागांना महापालिकेच्या वतीने पाणी दिले जात नाही, अशा ठिकाणी पाणीपुरवठा विभागाच्या वतीने पाण्याचे टँकर दिले जातात. या टँकरना 'ग्लोबल पोझिशनिंग सिस्टीम' (जीपीएस) बसविण्यात आली आहे. या यंत्रणेद्वारे टँकरवर नियंत्रण ठेवले जाते. यासाठीचा लॉग-इन आणि पासवर्ड पाणीपुरवठा विभागाच्या काही वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे होता. या अधिकाऱ्यांकडे या कामाव्यतिरिक्त अन्य अनेक कामे असल्याने त्यांना हे काम प्राधान्याने करणे शक्य होत नव्हते. टँकरवर लावण्यात आलेल्या जीपीएस यंत्रणेचा वापर होत नसल्याने महापालिकेचे पाण्याचे टँकर नक्की कोठे जातात, याचा उलगडा पाणीपुरवठा विभागाला होत नव्हता.



ठेकेदारामार्फत दिले जाणारे पाणी योग्य ठिकाणी जाते की नाही, हे समजणे आवश्यक आहे. टँकर पॉइंटवरील कर्मचाऱ्यांवर ही जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी केली होती. यामुळे पाण्याचे टँकर इतर ठिकाणी जात असतील, तर त्याला आळा बसेल.
— **विवेक वेलणकर**
अध्यक्ष, सजग नागरिक मंच.

# वाचन संस्कृती रुजविण्यात गणेश मंडळांचे योगदान : रमेश परदेशी

**राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** पुण्यातील गणेश मंडळांचे कार्य केवळ गणेशोत्सवापुरते मर्यादित नाही. विधायक कार्यामुळे पुण्यातील गणेश मंडळांची ख्याती महाराष्ट्रातच नव्हे तर देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचली आहे. वाचन संस्कृती टिकावी, वाढावी यासाठी मंडळे सातत्याने प्रयत्नशील असतात, असे गौरवोद्गार प्रसिद्ध अभिनेते रमेश परदेशी यांनी काढले.



पुस्तक हंडी, वाचनालये, पुस्तक भिशी, पुस्तकांचा महानैवेद्य असे समाजोपयोगी उपक्रम राबविणाऱ्या पुण्यातील ३५ गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. त्या वेळी परदेशी बोलत होते. दिल्ली येथे होत असलेल्या ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने कृतज्ञता सन्मान सोहळा महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या माधवराव पटवर्धन सभागृहात आयोजित करण्यात आला होता. ज्येष्ठ साहित्यिक चंद्रकांतद वानखेडे, लेखक व उद्योजक शरद तांदळे, सरहद, पुणेचे विश्वस्त शैलेश वाडेकर, अनुज नहार, वैभव वाघ, पियूष शहा, मयूर मसुरकर, शिरीष मोहीते व्यासपीठावर होते.

गणेश मंडळातील कार्यकर्ते हे समाजाचा आरसा आहेत. कुठे काही समस्या उद्भवली की आधी गणेश मंडळांचे कार्यकर्ते मदतीसाठी धावून जातात हे मी स्वत: पाहिले आहे, असे रमेश परदेशी म्हणाले.

सरहद, पुणेच्या कार्याची माहिती सांगून शैलेश वाडेकर म्हणाले, सामाजिक क्षेत्रात योगदान देणाऱ्या मंडळांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा सोहळा आयोजित करण्यात आला आहे. दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या ९८व्या साहित्य संमेलनानिमित्त अनेक साहित्यिक, सामाजिक उपक्रम राबविले जात आहेत. संमेलनास मिळालेला प्रतिसाद पाहता हे संमेलन सर्वसामान्यांचा आवाज झाला आहे. संमेलन चार दिवसांचा सोहळा न राहता संमेलनातून काही तरी निष्पत्ती व्हावी यासाठी प्रयत्न करीत आहोत.

गणेश मंडळांच्या कार्याची माहिती सांगताना पियूष शहा म्हणाले, गणेशोत्सवापुरते गणेश मंडळांचे कार्य सिमित नाही. पुण्यातील अनेक मंडळे वर्षभर सामाजिक उपक्रम राबवून समाजासाठी झटत असतात.

गणेश मंडळांच्या विधायक कार्यावरून त्यांची ताकद किती मोठी आहे, हे समजून येते. गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला आहे, हे दिसून येते.
— **चंद्रकांत वानखेडे**

# रेल्वेत 'मराठी साहित्ययात्री संमेलन'

**राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** दिल्लीमध्ये होत असलेल्या ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी खास धावणाऱ्या पुणे-दिल्ली रेल्वेच्या प्रवासादरम्यान 'मराठी साहित्ययात्री संमेलन' भरणार आहे. साहित्यरसिकांना पुण्यातून घेऊन जाणाऱ्या या रेल्वेला महान सेनानी महादजी शिंदे यांचे नाव देण्यात येणार असून, प्रत्येक बोगीला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गडकिल्ल्यांची नावे दिली जाणार आहेत.

राज्याचे मराठी भाषामंत्री उदय सामंत या 'मराठी साहित्ययात्री संमेलना'चे स्वागताध्यक्ष असून, तेही 'मराठी साहित्ययात्री संमेलनात' सहभागी होऊन, रेल्वेतून प्रवास करणार आहेत. साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका डॉ. संगीता बर्वे यांची या संमेलनाला प्रमुख उपस्थिती असणार आहे. रेल्वेमध्ये होणारे हे पहिलेच मराठी संमेलन ठरणार आहे, अशी माहिती सरहद, पुणेचे विश्वस्त डॉ. शैलेश पगारिया, अध्यक्ष संजय नहार, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत दिली. लेखक शरद तांदळे, वंदेमातरम् संघटनेचे अध्यक्ष वैभव वाघ, शरद गोरे उपस्थित होते.

# पुण्यात प्लायवूड गोदामाला भीषण आग

**राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** पुण्यातील खेड तालुक्यातील आसखेड येथील प्लायवूड गोदामाला आग लागल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.



डोंगराला लागलेल्या वनव्याची आग थेट प्लायवूडच्या गोदामावर आली असून या आगीत प्लायवूडचे गोदाम आगीत जळून खाक झाल्याचे समोर आले. आग लागल्यानंतर परिसरात आगीसह धुराचे लोट दिसत होते.

**धक्कादायक**

प्लायवूड गोदामाच्या जवळील घरांना देखील आगीचा धोका असल्याचे यानिमित्ताने समोर आले. आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी कुठलीही यंत्रणा नसल्याने आगीने रुद्ररुप धारण केले आणि परिस्थिती भयंकर झाली. डोंगर माळरानावर लागणाऱ्या वणव्याच्या घटनांकडे दुर्लक्ष केले जात असल्याने डोंगराचा वणवा थेट लोकवस्तीलगत येऊन अशा दुर्दैवी घटना घडत आहे.

# मोफत ई रिक्षा सेवा वाहतूक कोंडीवर उपाय

## समस्या

**मोफत ऑटो रिक्षा करण्यासाठी पुणे महानगरपालिकेने ऑटो रिक्षाचे मीटर प्रमाणे दर ठरवून त्यांची महानगरपालिकेच्या माध्यमातून नेमणूक करावी. जेणेकरून रिक्षा चालकांना देखील मारलेल्या फेऱ्या प्रमाणे योग्य मोबदला महिन्याकाठी मिळू शकेल व रोजगाराची संधी उपलब्ध होईल, तसेच नागरिकांना देखील चांगला प्रवास मिळाल्याने शहरातील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल.**
**- आम आदमी पक्षाचे उपाध्यक्ष चेंथिल अय्यर**

**राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** जुन्या महापालिका हद्दीत नित्याने होणारी वाहतूक कोंडी आणि वायू व ध्वनी प्रदूषण कमी करायचे असेल तर महापालिकेने बॅटरीवरील छोट्या रिक्षा ,बस मोफत उपलब्ध करून द्याव्यात आणि खाजगी वाहनांना या परिसरात NO ENTRY करावी असा पर्याय आम आदमी पक्षाने सुचविला आहे. महापालिकेला आणि लाडक्या बहिणीला २१०० रुपये देणाऱ्या राज्य सरकारला हे अवघड नाही असेही म्हटले जाते आहे.

- **वाहतूक कोंडी गंभीर प्रश्न**



पुणे शहराची लोकसंख्या ही झपाट्याने वाढत असून त्याबरोबर वाहनांची संख्या देखील लक्षणीय प्रमाणात वाढत आहे आणि या सर्व प्रकारामुळे वाहतूक कोंडीचा प्रश्न गंभीर झाला आहे. शहराच्या मध्यवस्तीत अनेक बाजारपेठा असल्याने शहराच्या उपनगरातून अनेक नागरिक खरेदी करता आपले वैयक्तिक वाहन घेऊन शहराच्या मध्यवर्ती भागात येत असतात, त्यामुळे शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या अरुंद रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते व त्यातून वायु प्रदूषण, ध्वनी प्रदूषण, पार्किंगची दुरावस्था यासारख्या समस्या निर्माण होत आहेत. पुणे महानगरपालिकेला सध्या तरी या समस्यांवर नियंत्रण मिळवणे शक्य झालेले नसून भविष्यात देखील या सर्व समस्यांवर नियंत्रण मिळवणे शक्य होईल का? असा मोठा प्रश्न उपस्थित झाला आहे.

- **काय आहे उपाय ?**

वाहतूक कोंडीवर तोडगा काढण्यासाठी आम आदमी पक्षाच्या वतीने शहराच्या मध्यवर्ती भागातील रस्त्यांवर जास्तीत जास्त प्रमाणात सार्वजनिक वाहतूक व्यवस्था वापरली जावी ज्यात छोट्या बस तसेच ऑटो रिक्षा यांचा समावेश केला जावा अशी मागणी करण्यात आली आहे. महापालिकेच्या माध्यमातून नागरिकांना ऑटोरिक्षा मोफत उपलब्ध करून दिल्यास अनेक नागरिक पी एम पी एम एल ने प्रवास करून मध्यवर्ती भागापर्यंत येऊ शकतात व मध्यवर्ती भागातील प्रवास हा महापालिकेच्या माध्यमातून चालवल्या जाणाऱ्या ऑटो रिक्षाने करू शकतात

१) ज्या ठिकाणी बस जाऊ शकणार नाही अशा ठिकाणी मोफत रिक्षा उपलब्ध करून दिल्यास नागरिकांना मोठ्या प्रमाणात फायदा होणार

२) सदर सुविधा ही नागरिकांना प्रायोगिक तत्त्वावर शहरातील काही भागात उपलब्ध करून दिल्यास त्याला मिळणारा प्रतिसाद पाहून शहराच्या इतर भागात देखील हा प्रकल्प राबवता येऊ शकतो.

३) सर्व सेवांसाठी महापालिकेने एक ॲप केल्यास ज्याच्या अनुषंगाने प्रत्येक ट्रीप ची माहिती महापालिकेपर्यंत पोहोचली जाऊ शकेल.

Selected

## 'होंडा'चा ईव्ही सेगमेंटमध्ये दबदबा निर्माण करण्यावर भर



**मुंबई :** 'होंडा'ने यापूर्वीच इलेक्ट्रिक सेगमेंटमध्ये प्रवेश केला आहे. कंपनीच्या इलेक्ट्रिक वाहनालाही बरीच लोकप्रियता मिळाली आहे. ॲक्टिव्हा इलेक्ट्रिक बाजारात दाखल होण्यापूर्वी होंडाने इलेक्ट्रिक टू-व्हीलर सेगमेंटमध्ये प्रवेश केला होता. होंडाने यंदाच्या ऑटो एक्स्पो 2025 मध्ये दोन नवीन दुचाकी लाँच केल्या आहेत. होंडा ॲक्टिव्हा इलेक्ट्रिक आणि क्यूसी 1 या दोन्ही गाड्या बाजारात आल्या आहेत.

'होंडा' भारतात ईव्ही मॅन्युफॅक्चरिंग प्लांट उभारण्याची योजना आखत आहे. तो 2028 मध्ये सुरू होऊ शकतो. होंडाने पुढील पाच वर्षांची तयारी केली आहे. येत्या पाच वर्षांत कंपनी इलेक्ट्रिक सेगमेंटमध्ये आपली पकड मजबूत करणार आहे. होंडा भारतात 10 नवीन इलेक्ट्रिक वाहने लाँच करण्याची शक्यता आहे. यापैकी चार वाहने येत्या दोन वर्षांत लाँच केली जाऊ शकतात. होंडा आपल्या वाहनांच्या निर्मितीसाठी भारतात प्लांट उभारणार आहे.

भारतात इलेक्ट्रिक वाहनांची वाढती मागणी पाहून कंपनीने हा निर्णय घेतला आहे. येत्या काही वर्षांत भारत ईव्ही हब बनू शकतो, असा कंपनीचा विश्वास आहे. त्यामुळे भविष्यात कंपनीने मोठे लक्ष्य ठेवल्याचे दिसत आहे.

**• 'हे' होंडाचे टार्गेट?**

कंपनी दरवर्षी चार मॉडेल्स बाजारात लाँच करू शकते. यामुळे तीन लाख युनिट्सच्या विक्रीचे उद्दिष्ट ठेवले जाऊ शकते. होंडाचे लक्ष्य नवीन वाहनांच्या विक्रीशी संबंधित असू शकते.

होंडाची इलेक्ट्रिक स्कूटर्स

होंडाने ॲक्टिव्हा इलेक्ट्रिक आणि क्यूसी 1 बाजारात आणून आपल्या भव्य योजनेची सुरुवात केली आहे. कंपनीने ही मॉडेल्स मर्यादित फीचर्ससह आणली आहेत; पण आगामी नवीन मॉडेल्स ॲडव्हान्स फीचर्ससह येऊ शकतात.

**• दहा नवी वाहने**

भारतात दहा नवीन इलेक्ट्रिक वाहने लाँच करण्याची शक्यता आहे. 'होंडा' येत्या 5 वर्षांत कंपनी इलेक्ट्रिक सेगमेंटमध्ये आपली पकड मजबूत करणार आहे. होंडा यापैकी चार वाहने येत्या दोन वर्षांत लाँच केली जाऊ शकतात. कंपनी दरवर्षी चार मॉडेल्स बाजारात लाँच करू शकते. यामुळे तीन लाख युनिट्सच्या विक्रीचे उद्दिष्ट ठेवले जाऊ शकते.

## सिम्बायोसिस विद्यापीठासोबत तुळजाभवानी मंदिर समितीचा करार

येत्या काळात धाराशिव जिल्ह्यात अपारंपारिक ऊर्जा, टेक्निकल टेक्स्टाईल उत्पादन, कृषिपूरक उद्योग त्यासोबतच पर्यटन वाढीला मोठा वाव मिळणार आहे. स्थानिक युवकांना जिल्ह्यातच हक्काच्या रोजगार संधी उपलब्ध व्हाव्या यासाठी आपण तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालयात कौशल्य विकास विद्यापीठ सुरू करण्याचा निर्णय घेतला होता. पुणे येथील जगप्रसिद्ध सिम्बायोसिस कौशल्य आणि व्यवसायिक विद्यापीठाकडून त्यासाठी तांत्रिक सहकार्य घेण्याचे निश्चित करण्यात आले होते. त्यानुसार तुळजाभवानी मंदिर समितीने बुधवार, १२ फेब्रुवारी रोजी सिम्बायोसिस कौशल्य विकास विद्यापीठासोबत तांत्रिक सहकार्य कराराची प्रक्रिया पूर्ण केली आहे. स्थानिक युवकांना आधुनिक, एकात्मिक आणि व्यापक असे कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देऊन कौशल्यधारीत शिक्षणाद्वारे रोजगारक्षम बनविण्यासाठी तुळजापुरात कौशल्य विकास विद्यापीठाची स्थापना करण्याची हीसंकल्पना होती.

## 'व्हीआय'वापरकर्त्यांना मिळणार आता फाईव्ह जी सेवा

कंपनी प्रीपेड आणि पोस्टपेड वापरकर्त्यांसाठी फाईव्ह जी लाँच करण्याच्या तयारीत आहे. कंपनीने आपला तिमाही अहवाल सादर करताना याबाबत माहिती दिली आहे. 'व्हीआय' वापरकर्ते लवकरच 'फाईव्ह जी' चा आनंद घेतील. 'व्होडाफोन आयडिया' ने म्हटले आहे, की ते आपल्या ग्राहकांसाठी मार्च २०२५ मध्ये फाईव्ह जी सेवा सुरू करणार आहे. या आठवड्याच्या सुरुवातीस तिचा क्यू तीन २०२४ अहवाल जाहीर करताना, 'व्हीआय' ने पुढील महिन्यात मुंबईतून आपली फाईव्ह जी सेवा सुरू करणार असल्याचे सांगितले. यानंतर एप्रिल २०२५ पर्यंत दिल्ली, बेंगळुरू, पाटणा आणि चेन्नईच्या वापरकर्त्यांसाठी फाईव्ह जी सेवा उपलब्ध होईल. 'व्हीआय'ने डिसेंबर २०२४ मध्ये देशातील सर्व १७ मंडळांमधील विशिष्ट ठिकाणी ५ सेवेसाठी चाचणी सुरू केली.

# 'इन्फोसिस'चा सातशे फ्रेशर्सना धक्का

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बेंगळुरू :** अलिकडच्या काळात अनेक 'आयटी' कंपन्यांमध्ये नोकरकपात केली जात आहे. याचा मोठा फटका कर्मचाऱ्यांना बसत आहे. अशातच आता 'इन्फोसिस'ने म्हैसूर कॅम्पसमधून सुमारे ७०० फ्रेशर्सना काढून टाकले आहे. 'आयटी कर्मचारी युनियन नॅसेंट इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी एम्प्लॉईज सिनेट' (नाईट्स) ने युक्तिवाद केला, की या फ्रेशर्सना कंपनीत रुजू झाल्यानंतर अवघ्या काही महिन्यांतच काढून टाकले आहे.



**• अवघ्या सहा महिन्यात गमावली नोकरी**

पदवीनंतर दोन वर्षांची प्रदीर्घ प्रतीक्षा आणि शेवटी सप्टेंबर २०२४ मध्ये 'इन्फोसिस'सोबत काम करण्याची संधी मिळली; पण केवळ सहा महिन्यांत ती नोकरी गमवावी लागली आहे. त्यामुळे हा कंपनीत काम करत असलेल्या फ्रेशर्ससाठी मोठा धक्का आहे. हे धक्कादायक आणि अनैतिक असल्याची माहिती काही कर्मचाऱ्यांनी दिली आहे. 'इन्फोसिस'ने काही महिन्यांपूर्वीच सुमारे ७०० कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. अखेर आज हा निर्णय घेतला आहे.

**• चौकशीची मागणी**

दरम्यान, याच मुद्द्यावर 'निटीज' चे अध्यक्ष हरप्रीत सिंग सलुजा यांनी कामगार मंत्र्यांना पत्र लिहून तीन मागण्या केल्या आहेत. औद्योगिक विवाद कायदा, १९४७ चे उल्लंघन केल्यामुळे, 'इन्फोसिस'वर कठोर दंडात्मक कारवाई करण्यात यावी आणि प्रकरणाची अधिक चौकशी करण्यात यावी, कायदेशीर तपास पूर्ण होईपर्यंत पुढील टाळेबंदी रोखण्यात यावी, काढून टाकलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना भरपाईसह पुन्हा कामावर घेण्याची मागणी करण्यात आली आहे.

**• 'इन्फोसिस'वर आरोप**

'निटीज'ने आरोप केला आहे, की कंपनीने टर्मिनेशन प्रक्रियेदरम्यान कर्मचाऱ्यांना धमकवण्यासाठी बाउन्सर आणि सुरक्षा रक्षकदेखील तैनात केले आहेत. 'ट्वीटर'वर एकाने आपला राग व्यक्त केला. 'इन्फोसिस'कडून ऑफर लेटर मिळाल्यानंतर, या फ्रेशर्सनी २ ते २.५ वर्षे वाट पाहिली आणि शेवटी सप्टेंबर २०२४ मध्ये कंपनीत रुजू झाले. होते. आता अवघ्या सहा महिन्यांनंतर यातील ७०० लोकांना कंपनीतून काढून टाकण्यात आले आहे.

**• टेक कंपन्यांत नोकऱ्यांवर कुऱ्हाड**

टेक कंपन्यांमध्ये नोकरकपात सुरूच आहे. २०२४ मध्येसुद्धा मोठ्या प्रमाणात कर्मचाऱ्यांना काढून टाकण्यात आले होते. इंटेल, टेस्ला, मायक्रोसॉफ्टसारख्या अनेक मोठ्या कंपन्यांनी मिळून जवळपास एक लाख ४९ हजार कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकले आहे. टेस्ला ते इंटेल आणि सिस्को ते मायक्रोसॉफ्टपर्यंत, अनेक कंपन्यांनी पैशांची बचत करण्यासाठी, त्यांच्या व्यवसायांची पुनर्रचना करण्यासाठी, बदलत्या बाजाराच्या परिस्थितीशी जुळवून घेण्यासाठी त्यांच्या कामगारांची संख्या कमी केल्याचे सांगितले जात आहे.




# बुर्ज खलिफा लिफ्टचा वेग रॉकेटइतका!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**दुबईः :** दुबई म्हटले, की सगळ्याच बाबतीत आकर्षण. अगदी इमारतींपासून ते तेथील लाईफस्टाईलपर्यंत. त्यात दुबईतील बुर्ज खलिफा ही इमारत म्हणजे दुबईची खरी ओळख म्हले, तर चुकीचे ठरणार नाही. बुर्ज खलिफा ही जगातील सगळ्यात उंच इमारत आहे. तसेच बुर्ज खलिफा ही जगातील सर्वात महागडी इमारत म्हणूनही ओळखली जाते. १६३ मजल्यांची बुर्ज खलिफा ही थेट आकाशाला भिडणारी आहे.

बुर्ज खलिफाची उंची एवढी आहे, की ती नव्वद किलोमीटर अंतरावरूनही इमारत दिसते. जगात फक्त या इमारतीचीच नाही तर या इमारतीमधील लिफ्टचीही तेवढीच चर्चा आहे. कारण बुर्ज खलिफामधील लिफ्ट ही जगातील सर्वात वेगवान लिफ्ट मानली जाते. बुर्ज खलिफामधील लिफ्टची खासियत म्हणजे या लिफ्टचा स्पीड. ही लिफ्ट रॉकेटच्या स्पीडने वर जाते, म्हणजे ही लिफ्ट 59 सेकंदात १२४ थेट माळ्यावर पोहचते. हे जाणून कोणालाही आश्चर्य वाटेल.



**लिफ्टचा नेमका स्पीड**

बुर्ज खलिफामध्ये ५८ लिफ्ट आहे. बुर्ज खलिफामधील लिफ्ट दहा मीटर प्रति सेकंद वेगाने हलते. ताशी ३६ किलोमीटर वेगाने ही लिफ्ट वर जाते. या लिफ्टला इमारतीच्या १२४ व्या मजल्यावर असलेल्या 'ॲट द टॉप' या डेकवर पोहोचण्यासाठी फक्त दोन मिनिटे लागतात. 'ॲट द टॉप' या डेकवरुन दुबई शहराचे डोळे दिपवणारे दृश्य पाहायला मिळते.

**लिफ्टची क्षमता**

ओटिस कंपनीने बुर्ज खलिफामध्ये लिफ्ट बनवल्या आहेत. या लिफ्टमध्ये एकाच वेळी १२ ते १४ लोक जाऊ शकतात. इमारत सेवा तसेच अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांसाठी बसवण्यात आलेली लिफ्ट एका वेळी ५५०० किलो सामान वाहून नेऊ शकते. ही जगातील सर्वात उंच सर्व्हिस लिफ्ट आहे. यासह बुर्ज खलिफामधील ही जगातील तिसऱ्या क्रमाकांची वेगवान लिफ्ट आहे.

जगातील दोन वेगवान लिफ्ट जगात आणखी अशा दोन इमारती आहेत ज्यांचा लिफ्टचा वेग बुर्ज खलिफापेक्षा जास्त आहे. तैवानमध्ये तैपेई नावाची एक इमारत आहे, जिथे जगातील सर्वात वेगवान लिफ्ट आहे. ही इमारत ५०९ मीटर उंच आहे. त्यामध्ये बसवलेल्या लिफ्टचा वेग १०१० मीटर/मिनिट आहे. याचा अर्थ या लिफ्टचा वेग ताशी ६०.६ किलोमीटर आहे. दुसऱ्या क्रमांकावर योकोहोमा लँडमार्क टॉवर येतो. ही इमारत २९६ मीटर उंच आहे. त्यामध्ये बसवलेल्या लिफ्टचा वेग ७५० प्रति मिनिट आहे. म्हणजेच या लिफ्टचा स्पीड ताशी ४५ किमी इतका आहे.

**बुर्ज खलिफा पर्यटकांचे ड्रीम डेस्टिनेशन**

बुर्ज खलिफा इमारत इस्लामिक स्थापत्यकलेचा एक उत्कृष्ट नमुना आहे. बुर्ज खलिफामध्ये २९५७ पार्किंग स्पेस आणि ९०० अपार्टमेंट आणि ३०४ हॉटेल्स आहे. त्यामुळे तुम्ही कधी दुबईला गेलात, तर बुर्ज खलिफा इमारतीच्या सुंदरतेचा आणि या इमारतीमधील लिफ्टचा थ्रीलिंग अनुभव घ्यायला विसरू नका.

# 'एआय' कंपन्या तंत्रज्ञांच्या शोधात




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' (एआय) हे आजच्या युगातील सर्वात फायदेशीर करिअरपैकी एक आहे. 'एआय' द्वारे, लोक तासभर लागणारे काम काही मिनिटांत पूर्ण करू शकतात. अशा परिस्थितीत, आज मोठ्या कंपन्या 'एआय' ची समज आणि तंत्रज्ञान असलेल्या लोकांच्या शोधात आहेत. त्यामुळे या क्षेत्रात अभ्यास असणाऱ्यांना नोकरीच्या मोठ्या संधी आहेत.

जेव्हा एखादे यंत्र मनुष्यासारखा विचार करून कोणतेही काम करू लागते, तेव्हा त्याला 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' म्हणतात. या विषयावर टर्मिनेटर, ब्लेड रनर, स्टार वॉर, मॅट्रिक्स, आय रोबोट असे अनेक हॉलीवूडपट बनले आहेत. या तंत्रज्ञानात यंत्र माणसाचे काम सोपे करते. ही गुणवत्ता जगभरातील अनेक कंपन्यांना आकर्षित करत आहे.

'एआय' चा वापर समस्यांचे निराकरण, नवीन योजना, नवीन कल्पना शोधण्यासाठी केला जाऊ शकतो. सध्या आर्टिफिशियल इंटेलिजन्सवर आधारित चॅटबॉट, चॅटजीपीटीचा वापर चर्चेत आहे.

**पात्रता काय?**

'आर्टिफिशियल इंटेलिजन्स'चा अभ्यास करण्यासाठी १२ वीमध्ये भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित या विषयांसोबतच कॉम्प्युटर सायन्स, आयटी आणि इलेक्ट्रॉनिक्स या विषयांची पदवी असणे आवश्यक आहे.

**कशी कराल करिअरची सुरुवात?**

'एआय' क्षेत्रात उत्तम करिअर करण्यासाठी संगणक विज्ञान आणि गणिताचे ज्ञान आवश्यक आहे. अभियांत्रिकीची पदवी घेतल्यानंतर या क्षेत्रात करिअर करू शकता. ही पदवी कॉम्प्युटर सायन्स, सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी, मॅथ्स, इलेक्ट्रॉनिक्स आणि इलेक्ट्रिकल्स या विषयांमध्ये असावी. काही संस्थांमध्ये, 'एआय' अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी प्रवेश परीक्षादेखील घेतल्या जातात. पात्रता असणे आवश्यक आहे. संगणक विज्ञान पदवीधर उमेदवारदेखील या क्षेत्रात काम करू शकतात.

**वाढीला चांगला वाव**

बी. टेक., एम. टेक, बीसीए, एमसीएस, बी. एस्सी. (आयटी), एम. एस्सी (आयटी), सॉफ्टवेअर अभियंता/डेव्हलपर्स/ वास्तुविशारददेखील आर्टिफिशियल इंटेलिजन्स कोर्स करू शकतात. जर उमेदवाराला ग्रॅज्युएशन दरम्यान सांख्यिकी, संभाव्यता सिद्धांत, रेखीय बीजगणित यासारखे मूलभूत ज्ञान तसेच युनिक्स साधने आणि प्रगत सिग्नल प्रक्रिया तंत्रांची चांगली माहिती असल्यास, तो या क्षेत्रात उच्च स्तरावर पोहोचू शकतो. या क्षेत्रातील शक्यता आणि करिअर वाढीला मर्यादा नाही.

**कुठे कराल 'एआय'चा कोर्स ?**

- इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी चंदीगड विद्यापीठ, चंदीगड
- एसआरएम ईश्वरी अभियांत्रिकी महाविद्यालय, चेन्नई
- किंग्ज कॉर्नरस्टोन इंटरनॅशनल कॉलेज, चेन्नई
- सविता अभियांत्रिकी महाविद्यालय, चेन्नई
- इंद्रप्रस्थ इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी (आयआयआयटी), नवी दिल्ली

**लाखो रुपये मिळणार पगार**

नोकरीव्यतिरिक्त 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स'चा अभ्यास करण्याचा सर्वात मोठा फायदा पगाराच्या बाबतीत होतो. अभियांत्रिकीच्या इतर शाखांपेक्षा जास्त पगार हे या क्षेत्राचे आकर्षण आहे. भविष्यात प्रत्येक क्षेत्रात 'एआय'तज्ज्ञ दिसतील. 'एआय'चा वापर सर्वत्र उद्योग, डिझायनिंग, अवकाश, अभियांत्रिकी, वैद्यकीय इत्यादी सर्वत्र केला जाईल. 'एआय'मध्ये शिक्षण घेतल्यानंतर, सुरुवातीचे पॅकेज ७० हजार ते १ लाख रुपये प्रति महिना असू शकते, तर पाच ते दहा वर्षांच्या अनुभवानंतर ते दरमहा सुमारे ४ ते ५ लाख रुपयांपर्यंत पोहोचू शकते.

# मुलीच्या लग्नात साडेपाचशे कोटी उडवणारा झाला रंक!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लंडन :** काळ खूप बलवान असतो.... राजाचा रंक अन्? रंकाचा राजा कधी होईल हे कुणालाच कळत नाही. सुख-दुःख, विजय-पराजय, श्रीमंती-गरिबीं, उदय-पतन अशा भरती ओहोटीसारख्या अनेक घटना मनुष्याच्या आयुष्यात घडत असतात. असेच काहीसे प्रसिद्ध उद्योगपती प्रमोद मित्तल यांच्यासोबत घडले आहे. लेकीच्या लग्नात ५५० कोटी उधणारे प्रमोद मित्तल आता देशोधडीला लागले आहेत. त्यांचे सर्व साम्राज्य धुळीस मिळाले आहे. जगातील सर्वात श्रीमंत व्यक्तींच्या यादीत प्रमोद मित्तल यांचे नाव घेतले जात होते. आता त्यांचे अब्जावधींचे साम्राज्य संपुष्टात आले आहे. २०२० मध्ये मित्तल हे दिवाळखोर झाले. त्यानंतर लंडन न्यायालयाने त्यांना दिवाळखोर म्हणून घोषित केले.






**कोण आहेत मित्तल**

प्रमोद मित्तल हे प्रसिद्ध उद्योगपती लक्ष्मी मित्तल यांचे बंधू आहेत. प्रमोद मित्तल स्टील इंडस्ट्रीज लिमिटेडचे म्हणजेच आत्ताची जेएसडब्ल्यू स्टील कंपनीचे ते अध्यक्ष राहिले होते. एकेकाळी त्यांची गणना जगातील सर्वात श्रीमंत व्यक्तींमध्ये केली जायची.

**आलिशान लाईफस्टाईल**

आलिशान लाईफस्टाईल आणि खर्चिक सवयींसाठी ते ओळखले जायचे. त्यांचा मुलीच्या लग्न सोहळ्याची आजही चर्चा होते. २०१३ मध्ये त्यांच्या मुलीचा शाही विवाह सोहळा पार पडला. मुलगी सृष्टीच्या हिच्या लग्नात मित्तल यांनी जवळपास ५५० कोटी रुपये खर्च केले होते. जगभरात हा लग्न सोहळा चर्चेचा विषय बनला होता.

**कसे बनले दिवाळखोर ?**

दिवाळखोरीनंतर त्यांची आर्थिक परिस्थिती इतकी ढासळली की दैनंदिन खर्चासाठी त्यांना कुटुंबावर अवलंबून राहावे लागले. त्यांच्यावर १३० दशलक्ष पौंडांपेक्षा जास्त कर्ज होते. दिल्लीत त्यांची केवळ 45 पौंड संपत्ती शिल्लक होती. त्यांच्या दिवाळखोरीची कहाणी 'जीआयकेआयएल' या बोस्नियाच्या कोक कंपनीशी जोडलेली आहे.

# एका ट्रेनमधून अख्खं गाव करू शकेल प्रवास!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** भारतातील पहिली सर्वात 'सुपर स्पेशल ट्रेन लाँच' होणार आहे. ही ट्रेन वंदे भारत ट्रेनचे सुपर मॉडेल असणार आहे. ही ट्रेन १६ किंवा १८ नाही तर तब्बल २४ डब्यांची असणार आहे. म्हणजेच एक संपूर्ण गाव या ट्रेनमधून प्रवास करू शकेल.

**सुविधा**

या स्लीपर ट्रेनमध्ये प्रवाशांना जबरदस्त सोई सुविधा मिळणार आहेत. विशेष म्हणेज भारतातील अनेक महत्वाच्या आणि अतिजलद रेल्वे मार्गावर ही २४ डब्यांची वंदे भारत स्लीपर ट्रेन धावणार आहे.

सध्या वंदे भारत ही भारातातील सर्वात जलद आणि आलिशान ट्रेन आहे. भारतीय रेल्वे लवकरच वंदे भारत स्लीपर ट्रेन सुरू करणार आहे. काही दिवसांपूर्वीच मुंबई-अहमदाबाद मार्गावर या ट्रेनची यशस्वी चाचणी घेण्यात आली आहे.

**चाचणी यशस्वी**

पहिल्या १६ डब्यांच्या 'वंदे भारत स्लीपर ट्रेन'ने १५ जानेवारी रोजी' रिसर्च डिझाईन अँड स्टँडर्ड्स ऑर्गनायझेशन' (आरडीएसओ) कडून घेण्यात आलेली कठोर चाचणी यशस्वीरीत्या पूर्ण केली. यानंतर आता रेल्वे थेट २४ डब्यांची स्लीपर वंदे भारत ट्रेन सुरू करण्यासाठी जोरदार प्रयत्न करत आहे. २४ डब्यांची स्लीपर वंदे भारत ट्रेन ही भारतातील शाही ट्रेन असेल. १६ कोचच्या स्लीपर वंदे भारतमध्ये तीन वर्ग आहेत. एसी फर्स्ट, एसी सेकंड आणि एसी थर्ड. आठ कोच जोडल्याने त्याची प्रवासी क्षमता 1692 इतकी होईल. आतापर्यंत कोणत्याही लक्झरी ट्रेनमध्ये इतकी प्रवासी क्षमता नाही.

**आणखी आधुनिक**

ही ट्रेन सध्याच्या 'वंदे भारत'पेक्षा अधिक आधुनिक असणार आहे. ट्रेनमध्ये एअर कर्टन, क्रॅश बफर, फायर बॅरियर वॉल, पॅडेड बर्थ आणि ऑनबोर्ड वायफाय सारख्या सुविधा मिळणार आहेत. भारतीय रेल्वेने १७ डिसेंबर २०२४ रोजी २४ डब्यांच्या 'वंदे भारत स्लीपर ट्रेन सेट'च्या ५०रेकसाठी 'प्रोपल्शन इलेक्ट्रिक'ची मोठी ऑर्डर दिली आहे. ही ऑर्डर दोन आघाडीच्या भारतीय उत्पादकांना देण्यात आली आहे.

# अहवाल जाहीर : भ्रष्टाचारात भारत ९६ व्या स्थानावर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** 'ट्रांसपेरेंसी इंटरनॅशनल'ने २०२४ या संपूर्ण वर्षाचा 'करप्शन परसेप्शन इंडेक्स' (सीपीआय) जाहीर केला आहे. या अहवालात १८० देशांमध्ये भ्रष्टाचाराचा स्तर तपासून त्यांची रँकिंग करण्यात आली आहे. या यादीत भारत ९६ व्या स्थानावर, तर पाकिस्तान १३५व्या स्थानावर घसरला आहे. अनेक देशांमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होतो. भारतातदेखील अनेक ठिकाणी अधिकाराचा दुरुपयोग करून आर्थिक फायदा मिळवण्यासाठी भ्रष्टाचार होतो, तर कित्येक जण सत्तेचा दुरुपयोग करतात. भ्रष्टाचार हा एक अप्रामाणिकपणा किंवा फौजदारी गुन्हा आहे. 'करप्शन परसेप्शन इंडेक्स' (सीपीआय) हा एक जागतिक अहवाल आहे, जो प्रत्येक देशातील सार्वजनिक क्षेत्रातील भ्रष्टाचाराच्या पातळीचे मोजमाप करतो.

**कसे केले जाते मोजमाप ?**

देशांना ०ते १०० या दरम्यान गुण दिले जातात. १०० गुण असलेला देश सर्वात स्वच्छ आणि पारदर्शक, तर ० गुण असलेला देश सर्वात भ्रष्ट मानला जातो. या वर्षीच्या अहवालात असे आढळले, की जगभरातील भ्रष्टाचाराची समस्या गंभीर आहे. अनेक देशांचे ५० पेक्षा कमी गुण आहेत. जवळपास ६.८ अब्ज लोक असे देशात राहतात, जिथे भ्रष्टाचाराचा स्तर जास्त आहे.



**डेन्मार्कमध्ये सर्वांत कमी भ्रष्टाचार**

सर्वात कमी भ्रष्टाचार असलेले देश डेन्मार्क असून सलग सातव्या वर्षी सर्वात कमी भ्रष्टाचार असलेला देश ठरला असून त्याला ९० गुण मिळाले आहेत. त्यानंतर फिनलंड (८८), सिंगापूर (८४), न्यूझीलंड (८३), लक्झेंबर्ग (८१), नॉर्वे (८१) आणि स्वित्झर्लंड (८१) हे देश अव्वल स्थानांवर आहेत.

**सर्वात भ्रष्ट देश कोणते?**

या यादीत दक्षिण सुदान (८ गुण) हा सर्वात भ्रष्ट देश ठरला असून तो १८० व्या स्थानावर आहे. त्यानंतर सोमालिया (१७९), व्हेनेझुएला (१७८), सीरिया (१७७) आणि येमेन, लिबिया, एरिट्रिया आणि इक्वेटोरियल गिनी (१७३) आहेत. चीन ७६ व्या स्थानावर, भारत ९६ व्या स्थानावर, श्रीलंका १२१व्या स्थानावर, पाकिस्तान: १३५ व्या स्थानावर, बांग लादेश १५१ व्या स्थानावर, तर अफगाणिस्तान १६५ व्या स्थानावर आहे.

**भारताची स्थिती सुधारण्याची गरज**

भारताची रँकिंग पाकिस्तानपेक्षा खूप चांगली असली तरी भ्रष्टाचार कमी करण्यासाठी अधिक प्रयत्नांची गरज आहे. शासनाने आणि नागरिकांनी मिळून पारदर्शकता आणि प्रामाणिक कारभारावर भर द्यायला हवा

संपादकीय विशेष

# साखर उद्योगाला हवा आधार

देशांतर्गत साखरेचे अर्थकारण बदलत आहे. साखर हा रोजच्या वापरातला महत्वाचा पदार्थ असल्यामुळे या बदलांची दखल घेणे महत्वाचे आहे. केंद्र सरकारने देशातील दहा लाख टन साखर निर्यात करण्यासाठी अलीकडेच हिरवा कंदील दाखवला. या निर्णयामुळे देशातील साखरसाठा कमी होणे, पर्यायाने साखरेच्या दरात वाढ होणे, जागतिक बाजारातील चढ्या दरांचा फायदा मिळणे आणि शेतकऱ्यांची ऊस देयके देण्यासाठी पैसै उपलब्ध होणे असे लाभ साखर उद्योगाला होणार आहेत. भारतात साखर उद्योगावर लाखो लोकांचे आयुष्य अवलंबून आहे. देशातील ऊसगाळप हंगाम मध्यावर आला असताना, गेल्या वर्षीच्या तुलनेत देशांतर्गत साखर उत्पादनात तब्बल २० लाख टनांची घट झाली आहे. हंगामाअखेरीस ही घट ४० लाख टन होईल, असा ताजा अंदाज आहे. राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाच्या आकडेवारीनुसार, मकरसंक्रांतीपर्यंत देशातील साखर उत्पादन १३० लाख टनांवर आले आहे. गेल्या वर्षी ते १५१ लाख टन होते. त्यामुळे कारखान्यांच्या तोट्यात वाढ होणार आहे. मागील वर्षी ५२४ कारखान्यांनी ऊस गाळप केले होते. यंदा ही संख्या ५०७ पर्यंत घसरली आहे. साखरेचा सरासरी उतारा ९.३७ टक्क्यांवरून ८.८१ टक्क्यांपर्यंत उतरला आहे.

गेल्या वर्षी या कालावधीत १६१२ लाख टन ऊसगाळप झाले. या वर्षी ते १४८२ लाख टन इतकेच झाले आहे. महाराष्ट्रात शंभर लाख टन गाळप कमी झाले आहे. आता केंद्र सरकारने सी हेवी मोलॅसिस किंवा मळीपासून तयार होणाऱ्या इथेनॉलचा दर प्रति लिटर ५६.५८ रुपयावरून ५७.९७ रुपये केला आहे. उसाचा रस आणि बी हेवी मोलॅसिसपासून उत्पादित होणाऱ्या इथेनॉलचे दर मात्र पूर्वीइतकेच ठेवले आहेत. साखर उत्पादनात घट झाल्यामुळे नफा कमी होणार आहे. त्यामुळे या उद्योगाला आर्थिक आधार देणे, हा केंद्राचा हेतू आहे. परंतु मुळात सी हेवी मोलॅसिसपासून फारसे इथेनॉल तयारच होत नाही. शिवाय फक्त १. ३९ रुपये इतकी अल्पस्वल्प वाढ झाल्याकारणाने शेतकरी आणि साखर कारखाने यांचा कितीसा फायदा होणार आहे? पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील आर्थिक व्यवहारविषयक केंद्रीय मंत्रिमंडळ समितीने इथेनॉलमिश्रित पेट्रोल कार्यक्रमांतर्गत १ नोव्हेंबर २०२४ ते ३१ ऑक्टोबर २०२५ या इथेनॉल पुरवठावर्षासाठी दरवाढीचा निर्णय घेतला आहे. तो सार्वजनिक क्षेत्रातील तेल विपणन कंपन्यांना लागू आहे. म्हणजे या कंपन्या अधिक दराने इथेनॉल खरेदी करणार आहेत. केंद्राने २०२५-२६ या पुरवठावर्षात पेट्रोलमधील इथेनॉल मिश्रणपातळी २० टक्क्यांवर नेण्याची घोषणा केली आहे. सध्या १८ टकक्यांपर्यंत मिश्रण केले जाते. देशातील साखर कारखान्यांमधून चालू वर्षात ६५० कोटी लिटर इथेनॉल उत्पादन होण्याची शक्यता आहे. यात उसाचा रस आणि बी हेवी मोलॅसिसपासून उत्पादित इथेनॉलचा वाटा ९० टक्क्यांपर्यंत आहे.

शेतकऱ्यांचे खरे हित साधायचे असेल, तर उसाचा रस, साखर किंवा साखरेच्या पाकापासून निर्माण केल्या जाणाऱ्या इथेनॉलचा खरेदीदर हा ६८.१३ रुपयांवरुन ७३.१४ रुपये करायला हवा. बी हेवी मोलॅसिसपासून उत्पादित इथेनॉलचा ६०.७३ रुपये हा दर ६७.७० रुपये करावा आणि सी हेवी मोलॅसिसपासून उत्पादित इथेनॉलला ५६.२८ रुपयांऐवजी ६१.२० इतका दर द्यावा, अशी साखर उद्योगाची मागणी होती. परंतु सरकारने फक्त सी हेवी मोलॅसिसचा दर, तोही फार कमी प्रमाणात वाढवला आहे. खरे तर, इथेनॉलचा दर आणि साखरेच्या किमान विक्री मूल्याचीही उसाच्या फेअर अँड रेम्युनरेटिव्ह प्राइस, म्हणजेच एफआरपीशी सांगड घालायला हवी. एफआरपी वाढवताना इथेनॉल आणि साखरेचे दरही वाढवावेत, अशी राज्य सहकारी साखर महासंघाची मागणी होती. पण दुर्दैवाने ती पूर्ण झालेली नाही. देशातील अतिरिक्त साखर उत्पादनामुळे गेल्या काही वर्षांमध्ये साखर उद्योग अडचणीत आला. यावर मार्ग म्हणून केंद्र सरकारने उसापासून इथेनॉल निर्मितीला प्रोत्साहन दिले. त्यासाठी कारखान्यांना अल्प व्याजदराने अर्थसाह्य केले. खेरीज इथेनॉल पुरवठा केल्यानंतर, त्याची देयके २१ दिवसांमध्ये मिळू लागल्याने कारखान्यांवरील आर्थिक बोजा काही अंशी हलका झाला. पण इंधनाची मागणी वाढण्यासाठी त्याचे इंधनात २० टक्के मिश्रण करण्याचे धोरण अद्याप शंभर टक्के राबवले जात नव्हते. ते राबवले जावे, अशी मागणी साखर उद्योगाकडून होत होती.

आता इंधनात २० टक्के इथेनॉल मिश्रणाचे उद्दिष्ट भारत येत्या तीन महिन्यांमध्ये साध्य करेल, अशी घोषणा केंद्रीय रस्ते व वाहतूक आणि महामार्गमंत्री नितीन गडकरी यांनी नुकतीच केली. या घोषणेचे साखर उद्योगाने जोरदार स्वागत केले होते.

मात्र त्याच वेळी इथेनॉल खरेदीदर समाधानकारक असणे आवश्यक आहे, याचे भान केंद्राने ठेवले पाहिजे. मुळात पर्यावरणपूरक इंधन असलेल्या इथेनॉलच्या उत्पादनामुळे कच्च्या तेलाच्या आयातीमध्ये घट झाली आहे. दोन वर्षांपूर्वी देशात ५०२ कोटी लिटर इथेनॉलची निर्मिती होऊन २४ हजार कोटी रुपयांच्या परदेशी चलनाची बचत झाली होती. दहा वर्षांपूर्वी असलेले इथेनॉल मिश्रणाचे दीड टक्के प्रमाण २०२४ पर्यंत १५ टक्क्यांवर गेले. २०२५ मध्ये भारतात १७०० कोटी लिटर इथेनॉल बनणार आहे. यापूर्वी इथेनॉलच्या विक्रीतून कारखान्यांचा नफा वाढला. त्यातून कारखान्यांना उसाची थकबाकी भागवता आली. गेल्या दहा वर्षांमध्ये इथेनॉल विक्रीतून कारखान्यांनी ९४ हजार कोटी रुपयांहून अधिक महसूल मिळवला. मात्र गेल्या वर्षी हंगाम सुरू झाल्यावर इथेनॉल निर्मितीवर निर्बंध लादण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर साखर निर्यातीचा महाराष्ट्राला सर्वाधिक, म्हणजे पावणेचार लाख टन कोटा मिळाला आहे.

केंद्र सरकारने गेल्या वीस वर्षांमध्ये टप्प्याटप्प्याने इंधनात इथेनॉल मिश्रणाचे प्रमाण वाढवत नेले, तरी प्रत्यक्षात अपेक्षित उद्दिष्ट गाठता आले नाही. उत्पादन करूनही इथेनॉल उचलले जात नव्हते. त्यामुळे काही वर्षांपूर्वी कारखान्यांनी उत्पादन थांबवले होते. आता इथेनॉलचे उत्पादन कंपन्या उचलतात आणि त्याचे पैसेही वेळेवर देतात, हे चांगले आहे. ब्राझीलमध्ये शंभर टक्के इथेनॉलवर चालणारी वाहने आहेत. ब्राझीलने तसा निर्णय वीस वर्षांपूर्वीच घेतला. भारतात मात्र अजूनही इथेनॉलमिश्रित इंधनावरच भागवले जाते. इथेनॉलचे इंधनातील प्रमाण वाढवण्याला वाहन उद्योगातील काहींचा मोठा विरोध असतो. एकीकडे इंधन आयातीवर लाखो कोटी रुपये खर्च करायचे, डॉलरची गंगाजळी वापरायची आणि दुसरीकडे इथेनॉल निर्मितीबाबत धरसोड निर्णय घ्यायचा, हे कुठे तरी थांबले पाहिजे.

# बांगलादेशविरोधात भारताची संयमाची भूमिका

**बांगलादेशमधील हसीना यांचे सरकार आंदोलकांनी घालवले. त्यानंतर तिथे मोहंमद युनूस यांचे हंगामी सरकार सत्तेत आले. या सरकारविरोधातही आता आंदोलक रस्त्यावर उतरले आहेत. 'बांगलादेश नॅशनॅलिस्ट पक्ष' (बीएनपी) ने युनूस यांना पाठिंबा दिला होता; परंतु आता हा पक्ष युनूस यांच्याबद्दल नाराजी व्यक्त करत आहे. दुसरीकडे भारताने बांगलादेशविरोधात संयमी भूमिका घेतली आहे.**



विश्वसंचार



डॉ. विजयकुमार पोटे

बांगलादेशमधून शेख हसीना यांची हकालपट्टी झाल्यानंतरही विद्यार्थ्यांचा संताप कमी झालेला नाही. 'जुलै उठाव'चे आंदोलक अलिकडेच आपल्या मागण्या घेऊन बांगलादेशच्या अंतरिम सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस यांच्या निवासस्थानाबाहेर पोहोचले. विद्यार्थी आंदोलनात जखमी झालेल्या आंदोलकांना योग्य उपचार, पुनर्वसन आणि अधिकृत मान्यता मिळावी, अशी आंदोलकांची मागणी आहे. आंदोलकांनी मुख्य सल्लागार मोहम्मद युनूस यांचे निवासस्थान असलेल्या जमुना या स्टेट गेस्ट हाऊसजवळ जाऊन आपल्या मागण्या मांडल्या. सुरक्षा दलांनी मार्गात बॅरिकेड्स लावून त्यांना अडवले. आंदोलक तेथेच संपावर बसले. नंतर ते बॅरिकेड तोडून मोहम्मद युनूस यांच्या निवासस्थानी पोहोचले. सरकारच्या आश्वासनानंतर आंदोलकांनी आंदोलन संपवले. 'बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टी' (बीएनपी)च्या नेत्यांची यूनूस यांनी सुटका केली. त्यानंतर देशभरात युनूस लवकरच निवडणुका घेतील, अशी अपेक्षा होती; परंतु निवडणूक घेण्याची कोणतीही हालचाल होत नसल्याने 'बीएनपी' आता त्यांच्यावर नाराज आहे. आपल्या मागण्यांबाबत सरकारकडून लेखी आश्वासन मिळाल्याशिवाय मागे हटणार नाही, असा निर्धार आंदोलकांनी यापूर्वीच केला होता; मात्र मुख्य सल्लागाराच्या प्रतिनिधीला भेटण्याची मागणीही त्यांनी केली होती. 'बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी'चे (बीएनपी) प्रभारी अध्यक्ष तारिक रहमान यांनी म्हटले आहे की सुधारणांवरील चर्चा ठप्प राहिल्यास हुकूमशहांना संधी मिळेल. सुधारणांबाबतची चर्चा रखडली तर देश गंभीर संकटात जाईल.

'बीएनपी'चे तारिक रहमान अलिकडेच एका कार्यक्रमामध्ये मोहम्मद युनूस यांचे नाव न घेता म्हणाले, सुधारणांची जबाबदारी असणाऱ्यांनी ती सुरू करावी. कोणताही सुधारणा प्रस्ताव लागू करण्यापूर्वी निवडणुका होणे आवश्यक आहे. जनतेने देश चालवण्याची संधी दिल्यास बीएनपी सुधारणांबाबत दिलेली आश्वासने पूर्ण करण्याचा प्रयत्न करणार आहे. काही दिवसांपूर्वी मोहम्मद युनूस यांनी बांगलादेशामधील परिस्थितीबाबत दावोस येथील 'वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम'च्या निमित्ताने अनेक माध्यम समूहांशी संवाद साधला होता. ते म्हणाले की देशातील सर्व सुधारणा तातडीने लागू करता येणार नाहीत आणि विद्यार्थी स्वतःचा राजकीय पक्ष काढतील. अंतरिम सरकारने 15 वेगवेगळ्या सुधारणांसाठी आयोग स्थापन केले आहेत. या सुधारणांमध्ये निवडणूक प्रक्रिया सुधारणादेखील आहे. या आयोगांचे अहवाल प्राप्त झाल्यानंतर आणि त्यावर सहमती झाल्यानंतरच या सुधारणा लागू केल्या जाऊ शकतात. निवडणूक प्रक्रियेपूर्वी सर्व सुधारणा राबवता येणार नसून त्या अमलात आणायच्या असतील तर आणखी सहा महिने लागतील.

युनूस यांनी या वर्षाच्या अखेरीस निवडणुका होणार असून आपण देशाच्या एकात्मतेचे रक्षण करत असल्याचे सांगितले. याशिवाय जुलैमधील आंदोलनात सहभागी होणारे विद्यार्थी पक्ष काढू शकतात, असे संकेतही त्यांनी दिले आहेत. कदाचित पक्ष स्थापन करताना त्यांच्यात फूट पडू शकते. शेख हसीना यांच्या पंतप्रधानपदाच्या कार्यकाळात भारताचे बांगलादेशाशी अतिशय घनिष्ट संबंध होते. बांगलादेशचे अंतरिम सरकार स्थापन झाल्यानंतर दोन्ही देशांमधील संबंध चढ-उतारांनी भरले आहेत. पंतप्रधानपदाचा राजीनामा देऊन शेख हसीना भारतात आल्या आणि आजही येथे राहत आहेत. बांगलादेशच्या अंतरिम सरकारला शेख हसीना यांच्यावर गुन्हा दाखल करायचा आहे. मुलाखतीदरम्यान इस्लामिक कट्टरपंथी त्यांच्या देशाचा ताबा घेऊ शकतात आणि भारतासोबतचे संबंध अतिशय नाजूक टप्प्यावर आहेत, अशी भीती आहे का, असे विचारण्यात आले तेव्हा मोहम्मद युनूस म्हणाले, 'मला अशी कोणतीही चिन्हे दिसत नाहीत. तरुणांचा राजकीय करिअर करण्याचा कोणताही हेतू किंवा वैयक्तिक स्वार्थ नाही. ते राजकीय पक्ष बनवत आहेत. त्यांनी आपल्या रक्ताने देश वाचवला असल्याने याची गरज निर्माण झाली आहे. अन्यथा, पूर्वीच्या कारकीर्दीची पुनरावृत्ती करण्याची संधी शोधणाऱ्यांनी त्यांना दूर केले असते.' पश्चिम बंगालला लागून असलेल्या भारत आणि बांगलादेशच्या सीमेवर तणाव आहे. अनेकदा दोन्ही बाजूचे ग्रामस्थ आमनेसामने येत आहेत. कधी-कधी सीमेवर तैनात असलेले सुरक्षा दल समोरासमोर येत आहेत. त्यामुळे सीमेजवळ राहणारे ग्रामस्थ भयभीत झाले आहेत.

बांगलादेशच्या अंतरिम सरकारमधले लोक भारताबाबत अतिशय आक्रमक विधाने करत आहेत; पण भारत सरकारकडून मिळणारा प्रतिसाद अतिशय संतुलित आहे. हे स्पष्ट करणारी घटना पश्चिम बंगालमधील मालदा जिल्ह्यातील सुखदेवपूर ग्रामपंचायतीमध्ये घडली. बांगलादेशच्या सीमेला लागून असलेल्या सुखदेवपूर येथील बकराबाद गावात राहणारे ग्रामस्थ नेहमीप्रमाणे आपल्या शेतात कामासाठी गेले होते. त्यांचे शेत बांगलादेश सीमेच्या 'शून्य रेषेच्या' 150 मीटर आत आहेत. येथे काटेरी कुंपण आहे; मात्र एक किलोमीटरचा परिसर असा आहे, की जिथे काटेरी कुंपण नाही. अनेक शेतात गव्हाचे पीक आलेले ग्रामस्थांनी पाहिले. येथे आंब्याची मोठी बागही आहे. त्यात सुमारे ९०० झाडे आहेत. यापैकी अनेक झाडे तोडल्याचेही आढळून आले. गावकऱ्यांनी 'झिरो लाइन'जवळ तैनात असलेल्या 'बांगलादेश बॉर्डर गार्डस' (बीजीबी) च्या जवानांना ही माहिती दिली; पण काही वेळातच सीमेच्या पलीकडे लोकांचा जमाव जमला. भारतीय बाजूचे ग्रामस्थही तेथे जमले. सीमेपलीकडे जमलेल्या जमावाने त्यांच्यावर हल्ला केल्याचा आरोप सुखदेवपूरच्या ग्रामस्थांनी केला. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाण्यापूर्वी सीमा सुरक्षा दल (बीएसएफ) आणि 'बीजीबी'च्या जवानांनी नियंत्रणात आणली.

या घटनेपूर्वी सहा जानेवारीला 'बीएसएफ' आणि 'बीजीबी' जवानांमध्ये तणाव निर्माण झाला होता. त्या वेळी भारताच्या बाजूने काटेरी कुंपण उभारण्याचे काम सुरू करण्यात आले होते. ही घटनाही त्याच ठिकाणी घडली, ज्या ठिकाणी काटेरी तारा लावण्याचे काम सुरू आहे. ती जागा 'झिरो लाइन' पासून १५० मीटरपेक्षा कमी त्रिज्येत आहे, असे सांगत 'बीजीबी'ने आक्षेप घेतला होता. यानंतर दोन्ही दलांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची 'फ्लॅग मीटिंग' बोलावण्यात आली. वायरिंगचे काम सध्या रखडले आहे. भारत आणि बांगलादेशदरम्यानच्या पश्चिम बंगालच्या सीमेवर अशी अनेक ठिकाणे आहेत, जिथे गेल्या दोन महिन्यांमध्ये दोन्ही देशांच्या सुरक्षा दलांमध्ये तणावाच्या अशाच घटना घडल्या आहेत. सततच्या तणावामुळे गेल्या काही दिवसांपासून दोन्ही देशांच्या सीमेवर तैनात असलेल्या सुरक्षा दलांच्या अधिकाऱ्यांच्या नियमित बैठकाही होत आहेत. पश्चिम बंगालच्या बांगलादेश सीमेवर जवळपास प्रत्येक सीमा चेक पोस्टवर अशाच प्रकारच्या 'फ्लेग मीटिंग' आयोजित केल्या जात आहेत, जेणेकरून तणाव संपुष्टात यावा. 'बीजीबी'प्रमुख मेजर जनरल अशरफुज्जा सिद्दीकी १७ ते २० फेब्रुवारीदरम्यान भारत दौऱ्यावर येत आहेत. यादरम्यान ते सीमा सुरक्षा दलाचे महासंचालक दलजित सिंग चौधरी आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेणार आहेत. दोन्ही देशांमधील सीमेवरून निर्माण झालेल्या वादावरही चर्चा होणार आहे.

सुखदेवपूरचे बकराबाद हे गाव मालदा जिल्ह्याच्या मुख्यालयापासून ४५ किलोमीटर अंतरावर आहे. सीमाभागातून जाणाऱ्या रस्त्यावरून जाण्यास सध्या बंदी आहे. दुसरा मार्ग कालियाचक मार्गे जातो. सध्या काटेरी तार नसलेल्या भागाकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. हा परिसर दुकानापासून फक्त ४०० मीटर अंतरावर आहे. सुखदेवपूरसह मालदा जिल्ह्यातील इतर भागात बांगलादेशच्या सीमेवर घडणाऱ्या घटनांमुळे स्थानिक लोक खूप चिंतेत आहेत. अशा वाढत्या घटनांदरम्यान नुकतेच मालदा दौऱ्यात राज्याच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी सीमेजवळ राहणाऱ्या गावकऱ्यांना आंतरराष्ट्रीय सीमेपासून अंतर राखण्याचा सल्ला दिला होता. वाढत्या वादांच्या पार्श्वभूमीवर सीमा सुरक्षा दलाने सीमेवरील तस्करांविरुद्ध मोहीम तीव्र करण्याचा दावा केला आहे. दक्षिण पश्चिम बंगालमधील विविध ठिकाणांहून सुरक्षा दलांनी विशेष मोहीम राबवून मोठ्या प्रमाणात अमली पदार्थ जप्त केल्याचे 'बीएसएफ'चे म्हणणे आहे. बांगलादेशवर दीर्घकाळ नजर ठेवणाऱ्या तज्ज्ञांना वाटते की भारत सरकार या वेळी संयमाने वागत आहे. अंतरिम सरकार सार्वत्रिक निवडणुका घेण्यास नाखूश आहे. निवडणुकांच्या मागणीवरून लोकांचे लक्ष दुसरीकडे वळवता यावे यासाठी भारताच्या सीमेवर आक्रमक भूमिका दाखवत असल्याचे त्यांचे मत आहे. सीमेवर संघर्ष वाढला आणि भारताने प्रत्युत्तर देण्यास सुरुवात केली, तर बांगलादेशाच्या अंतरिम सरकारला हवे आहे ते होईल. भारताने आत्तापर्यंत घेतलेली भूमिका हे स्पष्टपणे दर्शवते की तो बांगलादेश सरकारच्या या फंदात पडणार नाही.

गुंतवणूक टीप्स

## अधिक परताव्याचा मोह नको

गुंतवणुकीच्या विविध पर्यायांचा विचार करताना अनेकजण शेअर्सकडे आकर्षित होतात. पण यावेळी मनात शंकाकुशंका असतातच. पैसा बुडेल की काय अशी भीती वाटत राहते. ही भीती घालवण्यासाठी शेअर बाजारातल्या गुंतवणुकीचे काही फंडे जाणून घ्या. ✻ चांगल्या कंपनीचे शेअर्स योग्य किंमतीत मिळत असतील तर लगेच विकत घ्या. ✻ इतरांच्या पावलावर पाउल टाकू नका. स्वत:चे निर्णय स्वत: घ्या. ✻ शेअर्सच्या किंमतीपेक्षा त्यांचं मूल्य बघा. अनेकदा ५० ते १०० रुपये किंमतीच्या शेअर्सचं मूल्य जास्त असू शकतं. शेअर्समध्ये गुंतवणूक करण्याआधी संबंधित कंपनीची कामगिरी बघा. ✻ नियमित डिव्हिडंड देणाऱ्या कंपन्यांवर भर द्या. ✻ कर्जाचा बोजा कमी असणाऱ्या कंपन्यांमध्ये गुंतवणूक करा. ✻ शेअर्समध्ये एकदम सगळी रक्कम गुंतवू नका. टप्प्याटप्प्याने पुढे जा. ✻ वास्तववादी अपेक्षा ठेवा. सुरक्षित गुंतवणूक मानल्या जाणाऱ्या कंपन्यांच्या शेअर्समधून कमी वेळात भरपूर कमाई होऊ शकत नाही. पण दीर्घकालीन गुंतवणूक असेल तर तुम्हाला चांगला परतावा मिळतो. ✻ शेअर बाजारातल्या अफवांवर विश्वास ठेवू नका. अधिक परताव्याचा मोह ठेवू नका.



खेचाखेची


## किती वेळ?

जन्मानंतर डोळे उघडण्यास साधारण किती वेळ लागतो?

गाय : लगेच...
शेळी : २ तासानंतर...
मांजर : ६ दिवसानंतर...
कुत्रा : १० दिवसानंतर...
.
.
.
.
माणूस : लग्न झाल्यानंतर...

वेगळे काही

ही काही वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. चीनमधील शांघायमधून उत्तर कॅलिफोर्नियातील सॅन फ्रॅन्सिस्कोला जाणारी युनायटेड एअरलाईन्सची युए ८९० ही फ्लाईट २०१७ मध्ये उड्डाण करती झाली आणि अकरा तास पाच मिनिटांचा प्रवास करुन ३१ डिसेंबर २०१६ रोजी सॅन फ्रॅन्सिस्कोला पोहोचली. दोन्ही ठिकाणांदरम्यानचं हे मोठं अंतर आणि त्यामुळे वेळेत पडणारं अंतर याचा हा करिश्मा होतो. जागतिक वेळेनुसार शांघाय शहर सॅन फ्रॅन्सिस्कोच्या १६ तास पुढे आहे. म्हणूनच फ्लाईटने १ जानेवारी २०१७ ला प्रवास सुरु केला तो सॅन फ्रॅन्सिस्कोतील ३१ डिसेंबर २०१६ ला पूर्ण झाला...




राशीभविष्य

- **मेष** : नोकरीत मानसन्मान लाभेल. राशीतील गुरूभ्रमण फलदायी ठरेल. गैरसमजातून वाद होऊ शकतात.
- **वृषभ** : दैनंदिन कामात अडचणी येतील. व्यवसायात नव्या संधींचा लाभ घ्यावा. स्पर्धांमध्ये यश मिळेल.
- **मिथुन** : कलाकारांना उत्तम संधी लाभतील. कायदेशीर बाबतीत विचारानं रहावं. प्रवासात त्रास संभवतो.
- **कर्क** : व्यवसायात प्राप्ती वाढेल. सरकारी कामं मार्गी लागतील. यंत्र, उपकरणांच्या वापरात काळजी घ्यावी.
- **सिंह** : आर्थिक लाभाचे गणित जमेल. तुमच्या आवडी पूर्ण करू शकाल. कौटुंबिक वाद-विवाद संभवतात.
- **कन्या** : मित्रमंडळींकडून लाभ होईल. प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. आर्थिक प्रश्न सुटतील.
- **तूळ** : विवाहाचे प्रयत्न फलद्रुप होतील. व्यवसायात नव्या संधी लाभतील. जुनी येणी वसूल होणार आहेत.
- **वृश्चिक** : कर्जाची परतफेड करू शकाल. कामाचं वरिष्ठांकडून कौतुक होईल. आप्तेष्टांची नाराजी राहू शकते.
- **धनु** : सुवार्ता कानी येईल. महत्त्वाच्या भेटीतून लाभ होईल. स्थापत्य, कला या क्षेत्रात अनुकूलता राहील.
- **मकर** : खेळाडू, कलावंतांना संधी लाभतील. सहलीचा आनंद घेता येईल. अनपेक्षित धनलाभ संभवतो.
- **कुंभ** : गुंतवणूक विचारानं करावी. कामासाठी प्रवास लाभदायक ठरेल. अनपेक्षित घटना दिलासा देतील.
- **मीन** : विरोधकांचा विरोध मावळेल. तुमच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव राहील. मानसिक स्वास्थ लाभेल.

दिनविशेष

## १७ फेब्रुवारी

१८८३ : आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांचा मृत्यू.
१९४३ : ओट्टो स्टर्न यांना पदार्थविज्ञानातील नोबेल पुरस्कार मिळाला.
२०१३ : ऑस्ट्रेलियाने सहाव्यांदा महिला क्रिकेटमधील विश्वकरंडक जिंकला.
२०१४ : सर्वोच्च न्यायालयाने गोव्यातील खाणकामावरील बंदी उठवण्यास नकार दिला.
२०१८ : पीएनबी गैरव्यवहारप्रकरणी बँकेच्या दोन अधिकाऱ्यांसह नीरव मोदीच्या एका कंपनी अधिकाऱ्याला सीबीआयकडून अटक.

आरोग्यमंत्र

## सर्वोत्तम मातीची भांडी

सध्या सर्रास अॅल्युमिनिअम अथवा अन्य धातूंची निर्लेप भांडी वापरली जातात. मात्र अशा भांड्यामधील अन्न शरीरासाठी अत्यंत हानिकारक ठरु शकतं हे आपण लक्षात घ्यायला हवं. आधुनिक जीवनशैलीमुळे मातीची भांडी हळूहळू हद्दपार होत असली तरी जुनी जाणती मंडळी आजदेखील मातीच्या भांड्यात स्वयंपाक करणं पसंत करताना दिसतात. आगीवर हळूहळू अन्न शिजणं शरीरासाठी हितकारक असल्याचं तज्ज्ञ सांगतात. म्हणूनच आपणही स्वयंपाकासाठी मातीच्या भांड्यांचा वापर करायला हवा.



असं म्हटलं जातं की मातीच्या तव्यावर पोळी भाजल्यानं त्यामधील एकही पोषकतत्व नष्ट होत नाही. याउलट अॅल्युमिनियमच्या भांड्यात पदार्थ बनवल्यानं त्यातील ८७ टक्के पोषकतत्वं कमी होतात. पितळेच्या भांड्यात पदार्थ बनवल्यानं सात टक्के पोषकतत्वं कमी होतात. (पितळेचे भांडे कल्हई केलेले असावे.) केवळ मातीच्या भांड्यात बनवलेल्या पदार्थांमध्ये १०० टक्के पोषकतत्वं कायम राहतात. मातीच्या भांड्यात वरण जवळपास २५ मिनिटांमध्ये मंद आचेवर शिजतं. म्हणूनच वरण नेहमी मातीच्या भांड्यात शिजायला ठेवून तोपर्यंत बाकीची काम करून घ्यावी. एक वेळा मातीच्या भांड्यात शिजलेलं वरण खाल्लं तर ते एवढं स्वादिष्ट आणि पौष्टिक असतं की कोणीच त्याची चव विसरू शकत नाही. याच प्रमाणे मातीच्या तव्यावर भाजलेली पोळी अत्यंत रुचकर लागते.

महत्त्वपूर्ण काही...

## गाजराचे सेवन गरजेचे

गेले काही दिवस बाजारात दिसत असणाऱ्या रसरशीत भाज्यांचे ढीग आता हळूहळू दिसेनासे होऊ लागतील. उन्हे तापू लागली की हा भरही ओसरेल. पण आणखी काही दिवस बाजारात उत्तम प्रतीचे गाजर मात्र बघायला मिळेल. तेव्हा जमेल तेवढे गाजर खाण्याचा प्रयत्न करा. कारण त्यांच्यापासून मिळणारे पौष्टिक घटक अत्यंत उपयुक्त असतात. गाजरांमध्ये लोहाचं प्रमाण भरपूर असतं. म्हणूनच रक्तात लोहाची कमतरता असेल गाजराच्या सेवनाने ती भरून निघते. गाजरामध्ये बीटा कॅरोटीन नावाचं एक उपयुक्त तत्त्व असतं. ते शरीरात व्हिटॅमिन ए मध्ये परावर्तित होतं. म्हणजेच गाजराच्या सेवनाने व्हिटॅमिन ए ची कमतरताही भरुन निघते. गाजरामध्ये एक खास प्रकारचं फायबर असतं. या फायबरमुळे शरीरातील विषारी घटक दूर होण्यास मदत होते. शिवाय रक्तप्रवाहही सुरळीत सुरु राहतो. तेव्हा मंडळी, आता गाजर खाण्याचा कंटाळा करु नका. गाजराची कोशिंबीर बनवा. हलवा खा. गाजराचा रसही घेऊ शकता.

सल्ला मोलाचा

## आकर्षक लूकसाठी....

थंडी काढता पाय घेत असली तरी आणखी काही दिवस सकाळी वा रात्री तिचा अंमल जाणवणार आहे. तेव्हा थंड वाऱ्यांपासून संरक्षण मिळवण्यासाठी जॅकेट, स्वेटशर्ट, हुडस, लाँग कोट अथवा शॉर्ट कोट, पुल ओव्हर, शॉल आदी जामानिमा ठेवून देण्याची घाई करु नका. टेंडी लूक हवा असेल तर तुम्ही फ्लोरल पॅटर्नचे फंकी लूक असणारे स्वेटर जीन्सवर घाला आणि स्टायलिश लूक मिळवा. तुम्ही फ्लेयर्ड स्लीवही विणून घेऊ शकता. जीन्सवर लूज फिटींगचा आणि दोन-तीन रंगाच्या विणलेला स्वेटर सध्या महिलांच्या पसंतीस उतरतो आहे. घरात सुस्थितीतला जुना स्वेटर असेल तर त्यावर पॉम पॉम फ्लॉवर लावून तो तुम्ही उरलेले काही दिवस वापरु शकता. विशेष म्हणजे पॉम पॉमची ही फॅशन ट्रॅडिशनल आऊटफिट्स बरोबरच वेस्टर्न आउटफिट्सवरही शोभून दिसते. पॉम पॉम हे लोकरीपासून बनवलेलं एक फुल असतं. ही लोकरीची फुलं स्वेटरबरोबरच हँडबॅग्ज, फूटवेअर, हेड कॅप, दुपट्टा अथवा शालीवरही शोभून दिसतात. पॉम पॉममुळे त्यांचा नखराच बदलून जातो.

पंचांग

**सोमवार, १७ फेब्रुवारी २०२५**
क्रोधीनाम संवत्सर, शके १९४६,
माघ कृ. ५, नक्षत्र : चित्रा,
चंद्रराशी : कन्या, शूल योग,
सूर्योदय : ७.०८, सूर्यास्त १८.०१

फॉरवर्डस

**डोळ्यातील अश्रू ही प्रेमाची निशाणी असू शकते का?**

एक कतरा ही सही आँख में पानी तो रहे
ऐ मोहब्बत, तेरे होने की निशानी तो रहे...

वाचा तर खरं

आपली ई-मेल वाचली का, हे पाहण्यासाठी क्रोममध्ये जाऊन तीन बिंदूंवर क्लिक करुन 'मोअर टूल्स'मध्ये जा. एक्सटेन्शन्समध्ये जाऊन 'गेट मोअर एक्सटेन्शन्स'चा ऑप्शन निवडून सर्च बारमध्ये मेल ट्रॅकर हा ऑप्शन टाईप करा. मेलट्रॅक फॉर जीमेल निवडा. 'अॅड टू क्रोम' निवडल्यानंतर हे एक्सटेन्शन क्रोममध्ये अॅड होईल. जीमेल अकाउंट ओपन करा. काळ्या रंगाच्या पट्टीवर मेलट्रॅकचा मेसेज दिसेल. 'अपडेट परमिशन्स' व 'अलाउ मेसेज'वर क्लिक करा. कंपोजमध्ये जाऊन मेल टाईप करून सेंड करा. सेंट मेलच्या ऑप्शनमध्ये जा. इथे रिसिव्हरने मेल वाचली की दोन टिकमार्क दिसतील.

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

## At a Glance

### १.१८ कोटी भाविकांनी घेतला लाभ

**प्रयागराज:** उत्तर प्रदेशातील प्रयागराजमधील त्रिवेणी संगमावर महाकुंभमेळा सुरू आहे. १३ जानेवारीपासून या महाकुंभ मेळ्याला प्रारंभ झाला. तेव्हापासून शनिवार, १५ फेब्रुवारीपर्यंत ५१.४७ कोटींहून अधिक लोकांनी पवित्र स्नान केले, या संदर्भातील माहिती उत्तर प्रदेश सरकारच्या माहिती आणि जनसंपर्क विभागाने दिल्याचे वृत्त आहे.

उ. प्रदेश सरकारच्या माहिती विभागानुसार, रविवार १६ फेब्रुवारीला दुपारी ४ वाजेपर्यंत १.१८ कोटी भाविकांनी त्रिवेणी संगमानात पवित्र स्थान केल्याचे देखील सांगितले. उत्तर प्रदेशातील प्रयागराजमधील गंगा, यमुना आणि गुप्त सरस्वती अशा पवित्र नद्यांच्या त्रिवेणी संगमावर महाकुंभमेळा सुरू आहे.

### मुंबईत कोळसा तंदूर भट्टींवर बंदी

**मुंबई :** मुंबईतील हॉटेल, रेस्टॉरंट आणि ढाब्यांना आता तंदूर रोटी बनवण्यासाठी तंदूर कोळसा भट्टीचा वापरण्यास बंदी घालण्यात आली आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर मुंबई महापालिकेने कोळसा भट्टी आणि लाकडी ओव्हनद्वारे स्वयंपाक करण्यास बंदी घातली आहे. महापालिकेने रितसर नोटी बजावून बंदीची माहिती हॉटेल, रेस्टॉरंट आणि ढाब्यांच्या व्यवस्थापनाला दिली आहे.

मुंबई महापालिकेने हॉटेल, रेस्टॉरंट आणि ढाबा चालकांना सात जुलै २०२५ पर्यंत कोळसा तंदूर भट्टींच्या जागेवर इलेक्ट्रिक उपकरणांचा वापर सुरू करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

# मणिपूरमध्ये १२ दहशतवादी अटकेत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली:** हिंसाचार आटोक्यात आणण्यात अपयशी ठरल्यानंतर केंद्र सरकारने मणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवट लागू केली आहे. या निर्णयानंतर दहशतवादी संघटनांच्या १२ नेत्यांना अटक करण्यात आली आहे. यातील सात कुकी नॅशनल आर्मीचे (केएनए) आहेत. या संघटनांनी सरकारसोबत सस्पेंशन ऑफ ऑपरेशन (एसओओ) करारही केला होता. मणिपूरमध्ये सुमारे ३२ दहशतवादी गट सक्रिय आहेत. त्यापैकी २५ जणांनी सरकारशी करार केला होता.

मणिपूर सरकारने ३ मे रोजी उसळलेल्या हिंसाचाराच्या दोन महिने आधी कुकी नॅशनल आर्मी आणि झोमी रिव्होल्युशनरी फ्रंटसोबतचा करार तोडला होता. बेकायदा जंगल ावर कब्जा करणाऱ्यांच्या समर्थनार्थ निदर्शने केल्याचा त्यांच्यावर आरोप होता. त्यानंतर त्यांच्यात झालेल्या कराराबाबत कोणतीही घोषणा करण्यात आली नाही. तर पहिला करार फेब्रुवारी २०२४ मध्ये संपुष्टात आला.

मणिपूर पोलीस आणि सुरक्षा दलांनी इतर अनेक ठिकाणांहून मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा जप्त केला आहे. यामध्ये एसएलआर आणि इन्सासचा समावेश आहे. भारत-म्यानमार सीमेवरील स्तंभ क्रमांक ७३ आणि ७४ मधूनही मोठ्या प्रमाणात शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. शनिवारी पोलिसांनी कांगलेपाक कम्युनिस्ट पार्टी पीपल्स वॉर ग्रुप या भूमिगत संघटनेशी संबंधित दोन महिला अतिरेक्यांना अटक केली. खंडणी आणि शस्त्रे पाठविण्यामध्ये त्यांचा सहभाग असल्याचे पोलिसांनी सांगितले.

#### शस्त्रास्त्रे जप्त

मणिपूर पोलिसांनी शनिवारी जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, केएनएच्या सात दहशतवाद्यांना अटक करण्यात आली आहे. याशिवाय जुना खौकुअल परिसरात गस्त घालण्यात येत आहे. शेखोगिन हाओखिव ऊर्फ गिगिन, नगमलेनांग मते ऊर्फ मंगनिओ, सेलेमांग, थांगलांग हाओकिप ऊर्फ मांगबोई, जमखोसेई ऊर्फ सेपू अशी या दहशतवाद्यांची नावे आहेत. त्यांच्याकडून एक एके-४७ रायफल, ७.६२ रायफल, तीन सिंगल बोर रायफल, १० एके-४७ मॅगझिन, ६५४ जिवंत काडतुसे असा मोठा दारुगोळा जप्त करण्यात आला आहे.

# ...तर उद्धव ठाकरेंना देश सोडावा लागेल!

## रामदास कदम यांचा हल्लाबोल



**रत्नागिरी :** ज्यादिवशी एकनाथ शिंदे तोंड उघडतील त्यावेळी उद्धव ठाकरेंना हा देश सोडून जावे लागेल, असे वक्तव्य शिवसेनेचे नेते रामदास कदम यांनी शनिवारी केले. रत्नागिरी येथे आयोजित उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आभार सभेत ते बोलत होते.

रामदास कदम म्हणाले की, "कोकण ही शिवसेना प्रमुखांची भूमी आहे. माझ्या कोकणी माणसांनी शिवसेना मोठी केली. आम्ही सबंध कोकण पिंजून काढून भगवामय केले. उद्याचा जिल्हा परिषदेचा अध्यक्ष एकनाथ शिंदे साहेबांचा असेल, हे मी सांगतो. एकनाथ शिंदेंनी निर्णय घेतला होता तेव्हा ४० पैकी एकाही आमदाराला निवडून येऊ देणार नाही, अशी शपथ उद्धव ठाकरेंनी घेतली होती. तेव्हा खोके-खोके असे म्हणून बाप बेटे थकले. पण ज्यादिवशी आम्ही एकनाथ शिंदे आणि रामदास कदम तोंड उघडू तेव्हा उद्धव ठाकरेंना हा देश सोडून जावे लागेल. आम्ही मातोश्रीमध्ये अनेक मिठाईचे खोके पोहोचवले. एकनाथ शिंदे साहेबांनी विकास कामांसाठी खोके दिले आणि पुन्हा ४० पैकी ४० आमदार निवडून आणले," असे ते म्हणाले.

> माझ्यासारख्या सर्वसामान्य माणसालाही त्यांनी नेता करून महत्व प्राप्त करून दिले. मात्र, शिवसेना प्रमुखांनी जे कमावले ते सगळे उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रीपद घेऊन गमावले. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले नसते तर शिवसेना फुटली नसती. मी हे जबाबदारीने बोलतोय. हे वास्तव आहे."
> — **रामदास कदम, शिवसेना नेते**

#### ...तर शिवसेना फुटली नसती!

उद्धव ठाकरे यांनी शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांना काळीमा फासली. त्यांचे विचार पायदळी तुडवण्याचे त्यांच्या पाठीत खंजीर खुपसण्याचे काम उद्धव ठाकरेंनी केले. शिवसेना प्रमुख मुख्यमंत्री होऊ शकले असते. पण त्यांनी नारायण राणे, मनोहर जोशी यांना मुख्यमंत्री बनवले, असे ते म्हणाले.

# अमेरिकेची खर्चात कपात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली:** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प पुन्हा सत्तेत आल्यापासून निर्णयाचा धडाका लावला आहे. ट्रम्प यांनी सरकारच्या बजेटमधील अनावश्यक खर्चात कपात करण्यासाठी डिपार्टमेंट ऑफ गव्हर्मेंट इफिशिएन्सी या विभागाची स्थापना केली आहे. या विभागाची जबाबदारी अब्जाधीश इलॉन मस्क यांच्याकडे आहे.

इलॉन मस्क यांच्या नेतृत्वाखालील या विभागाने आता अमेरिकेकडून अनेक देशांना दिला जाणारा निधी थांबवण्याचा निर्णय घेतला आहे. भारताला दिला जाणार २१ मिलियन डॉलर (जवळपास १ अब्ज ८२ कोटी रुपये) एवढा निधी रद्द करण्यात आल्याची माहिती दिली आहे. या निधीचा वापर भारतात लोकशाही पद्धतीने पार पडणाऱ्या निवडणुकीतील मतदान वाढवण्यासाठी होणार होता.

इलॉन मस्क हे अत्यंत बारकाईने संपूर्ण जगभरात अमेरिकेद्वारे दिल्या जाणाऱ्या निधीची तपासणी करत आहेत. तसेच, सरकारच्या धोरणांनुसार अनावश्यक खर्च रद्द करत आहे. 'अमेरिकी करदात्यांचा पैसा पुढील कारणांसाठी खर्च केला जाणार होता, परंतु यातील सर्व खर्च रद्द करण्यात आले आहेत.', अशी माहिती या विभागाने ट्विटरवर दिली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी अमेरिकेच्या दौऱ्यावरून परतल्यानंतर त्वरितच हा निर्णय घेण्यात आला आहे.

भारताला दिल्या जाणाऱ्या २१ मिलियन डॉलर निधीचा देखील उल्लेख आहे. हा निधी भारतातील मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी दिला जाणार होता. याशिवाय, या लिस्टमध्ये कंबोडिया, नेपाळ, माली, लायबेरिया, बांगलादेशसह अनेक देशांच्या नावाचा उल्लेख आहे. या देशांना दिला जाणार निधी देखील रोखण्यात आला आहे.

दरम्यान, या निधीबाबत माहिती समोर आल्यानंतर याबाबत राजकीय आरोप-प्रत्यारोप होण्याची शक्यता आहे. निधीच्या माध्यमातून भारतासह इतर देशांच्या राजकीय प्रक्रियेतील अमेरिकेच्या हस्तक्षेपाबाबत प्रश्न निर्माण होत आहेत.

# लव्ह जिहाद विरोधात कायदा : फडणवीस

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नागपूर :** राज्यात लवकरच लव्ह जिहाद विरोधात कायदा येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले आहे. त्यानुसार राज्याचे पोलीस महासंचालक यांच्या नेतृत्वाखाली सात जणांची समिती स्थापन करण्यात आली आहे. आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात लव्ह जिहाद विरोधात कायदा आणण्याचे कारण सांगितले आहे. फडणवीस हे नागपूरमध्ये पत्रकारांशी बोलताना त्यांनी लव्ह जिहाद विरोधात महायुती सरकार कडक कार्यवाही करणार असल्याचे जाहीर केले.

लव्ह जिहाद याची वास्तविकता सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयात आली आहे. केरळ उच्च न्यायालयानेही याचा उल्लेख केला आहे. एका धर्मातील व्यक्तीने दुसऱ्या धर्मातील व्यक्तीशी लग्न करण्यात गैर काही नाही. पण खोटे बोलून खोटी ओळख तयार करून फसवणूक करून लग्न करायचे आणि मुले जन्माला घालून सोडून द्यायचे, ही प्रवृत्ती समाजात पसरत असल्याचे फडणवीस यावेळी बोलताना म्हणाले. अशाप्रकारचा कायदा याआधी उत्तर प्रदेश आणि इतर काही राज्यात अस्तित्वात आलेला आहे.

# २०३० पर्यंत कापड निर्यात तीन पट वाढवणार : मोदी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी सांगितले की, भारताची कापड निर्यात तीन लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचली असून, २०३० पर्यंत ती ९ लाख कोटी रुपयांपर्यंत नेण्याचे लक्ष्य आहे. भारत टेक्स २०२५ मध्ये बोलताना ते बोलत होते. ते म्हणाले की, हा एक मेगा ग्लोबल टेक्सटाइल इव्हेंट म्हणून उदयास येत आहे.

ते म्हणाले की, आज, आपण जगातील सहाव्या क्रमांकाचा कापड निर्यातदार आहोत. आपली कापड निर्यात तीन लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे. आता, २०३० पर्यंत ती नऊ लाख कोटी रुपयांपर्यंत नेण्याचे आमचे लक्ष्य आहे... पण मी हे सांगू इच्छितो की लोकांचा उत्साह पाहून, मला वाटते की तुम्ही सर्वजण माझे लक्ष्य चुकीचे सिद्ध कराल आणि त्यापूर्वीच काम पूर्ण होईल, असा विश्वास राजधानी दिल्लीतील भारत मंडपम येथे आयोजित कार्यक्रमात त्यांनी व्यक्त केला.

भारत टेक्स आता एक मेगा ग्लोबल टेक्सटाइल इव्हेंट म्हणून उदयास येत आहे. यावेळी, मूल्य साखळीतील संपूर्ण स्पेक्ट्रम येथे एकत्रितपणे सहभागी होत आहे, ज्यामध्ये बारा विभाग सहभागी आहेत... भारत टेक्स जगभरातील धोरणकर्ते, सीईओ आणि उद्योग नेत्यांसाठी सहभाग, सहकार्य आणि भागीदारीसाठी एक मजबूत व्यासपीठ बनत आहे, असे ते म्हणाले. भारत हा जगातील सहावा सर्वात मोठा कापड आणि वस्त्र निर्यातदार देश म्हणून ओळखला जातो.

# सपकाळ यांच्या नियुक्तीने काँग्रेसमध्ये अस्वस्थता

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** काँग्रेसने माजी आमदार हर्षवर्धन सपकाळ यांची नियुक्ती केल्यानंतर महाराष्ट्र काँग्रेसमध्ये अस्वस्थता असल्याचे दिसून येत आहे. काँग्रेसमध्ये असलेल्या नेत्यांच्या तुलनेत अतिशय नवख्या नेत्याकडे अध्यक्षपदाची धुरा सोपविल्यामुळे अनेकांनी आश्चर्य व्यक्त केले आहे. यात माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांचाही समावेश आहे. विशेषतः नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला दारूण पराभवाला सामोरे जावे लागले. अशा या आव्हानात्मक टप्प्यावर काँग्रेस पक्षाला पुनरुज्जीवित करू शकेल, अशा आक्रमक नेत्याची निवड करायला हवी होती, असे अनेक नेत्यांचे म्हणणे आहे.

# स्थलांतरितांच्या मुद्द्यावरून राजकारण तापले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** अमेरिकेने कथित बेकायदेशीर भारतीय स्थलांतरितांना हद्दपार केल्यामुळे भारतातील राजकारण तापले आहे. काँग्रेसने याला केंद्र सरकारच्या परराष्ट्र नीतीची परीक्षा असल्याचे म्हणत आपले राजकीय हेतू स्पष्ट केले आहेत. माजी अर्थमंत्री पी. चिदंबरम यांच्यापासून ते काँग्रेस नेते शशी थरूरपर्यंत सर्वांनी यावर प्रश्न उपस्थित केले आहेत. तर अमृतसरमध्ये विमान उतरण्यावरुन मनीष तिवारी यांनी केंद्र सरकारवर हल्लाबोल केला आहे.

याबद्दल पी. चिदंबरम यांनी सर्वप्रथम 'एक्स'वर पोस्ट केली आहे. ते म्हणाले की, आज अमृतसरमध्ये उतरणाऱ्या अमेरिकन विमानावर सर्वांचे लक्ष असेल, जे कथित बेकायदेशीर भारतीय स्थलांतरितांना परत आणेल. त्यांना हातकड्या घालून त्यांचे पाय दोरीने बांधलेले असतील का? ही भारत सरकारच्या परराष्ट्र नीतीची परिक्षा असल्याचे ते म्हणाले.

दरम्यान, माजी मंत्री आणि काँग्रेस खासदार शशी थरूर यांनी बेकायदेशीर स्थलांतरितांना भारतात परत पाठवल्या जाण्याच्या पद्धतीवरुन सवाल केले आहेत. ते म्हणाले की, या पद्धतीवर लक्ष्य का देण्यात आले नाही? पंतप्रधान मोदींनी बंद दाराआड हा मुद्दा उपस्थित केला का? तर काँग्रेस खासदार मनीष तिवारी यांनी अमृतसरमध्ये अमेरिकन विमानाच्या उतरण्यावरुन प्रश्न उपस्थित केले.

# पाक झाला अस्वस्थ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** नुकतेच पंतप्रधान नरेंद्र मोदी अमेरिकेच्या दौऱ्यावर होते, तिथे त्यांनी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी चर्चा केली. या दरम्यान भारत आणि अमेरिका यांच्यातील संबंधांना नवी चमक आली आणि ट्रम्प यांनी अमेरिकेचे महान लढाऊ विमान एफ-३५ भारताला देऊ केले. पंतप्रधान मोदींना अमेरिकेत मिळालेला सन्मान पाहून पाकिस्तान आणि तेथील प्रसारमाध्यमे हादरली आहेत. पाकिस्तानची माध्यम संस्था 'द डॉन'ने संपादकीय लिहून म्हटले आहे की, भारत आपल्या आर्थिक शक्तीचा आणि संबंधांचा गैरफायदा घेत अमेरिकेत पाकिस्तानला दोष देत आहे. पाकिस्तानने शांत बसू नये.

रविवारी 'द डॉन'वर हे संपादकीय प्रसिद्ध झाले असून त्याचे शीर्षक 'संतुलन राखणे' असे आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या नेतृत्वाखालील अमेरिकेच्या नव्या प्रशासनाने त्या देशाच्या परराष्ट्र धोरणावर आपली पकड घट्ट केल्याने पाकिस्तान-अमेरिका संबंधांच्या अल्प ते मध्यम मुदतीच्या भवितव्याबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे. अलीकडच्या घडामोडी चिंतेचा विषय आहेत. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प आणि भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यात नुकत्याच झालेल्या बैठकीच्या परिणामांबद्दल पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयाला जाहीरपणे चिंता व्यक्त करणे भाग पडले आहे. भारताला एफ-३५ लढाऊ विमानांसारखे प्रगत लष्करी तंत्रज्ञान विकण्याच्या ट्रम्प यांच्या प्रस्तावामुळे पाकिस्तान चिंतेत आहे. याचा परिणाम पाकिस्तानच्या राष्ट्रीय संरक्षणावर होऊ शकतो, असेही यात म्हटले आहे.

पान १ वरून

# चेंगराचेंगरीचे १८ बळी



### कुंभमेळ्यासाठी रेल्वेकडून अचानक विशेष ट्रेनची घोषणा

● प्राथमिक माहितीनुसार, रेल्वेने प्रयागराजला कुंभमेळ्यासाठी मोठ्या प्रमाणात तिकिट विक्री होत असल्याचे समजताच विशेष गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला, परंतु गर्दी हाताळण्यासाठी पुरेशी व्यवस्था नव्हती. कुंभमेळ्याला जाणारी रेल्वे प्लॅटफॉर्म क्रमांक १४ वर होती. यावेळी तिथे आधीच मोठी गर्दी होती आणि इतर प्रवासीही तिथे पोहोचण्याचा प्रयत्न करत होते. रेल्वेने अचानक प्लॅटफॉर्म क्रमांक १६ वरून विशेष ट्रेनची घोषणा केली. जे प्रवासी आधीच प्लॅटफॉर्म १४ वर जाण्याचा प्रयत्न करत होते ते प्लॅटफॉर्म १६ कडेही धावू लागले, ज्यामुळे गोंधळ उडाला. गर्दी नियंत्रणाबाहेर गेली आणि लोक एकमेकांवर पडू लागले. हे चेंगराचेंगरीचे कारण बनले. अहवालात असेही म्हटले आहे की रेल्वे संरक्षण दलाच्या कर्मचाऱ्यांची बंदोबस्त व्यवस्थित नव्हाता, ज्यामुळे गर्दी नियंत्रित करण्यात अडचणी आल्या आणि परिस्थिती आणखी बिकट झाली.

### चौकशी समितीची स्थापना

● नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर झालेल्या चेंगराचेंगरीच्या चौकशीसाठी दोन सदस्यांची समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीमध्ये उत्तर रेल्वेचे प्रिन्सिपल चीफ कमर्शियल मॅनेजर नरसिंग देव आणि प्रिन्सिपल चीफ सेफ्टी कमिशनर पंकज गंगवार यांचा समावेश आहे, असे रेल्वेने रविवारी सांगितले. समितीने या घटनेची उच्चस्तरीय चौकशी (एचएजी) सुरू केली आहे, असे रेल्वेने सांगितले. चौकशीचा एक भाग म्हणून, समितीने चौकशीत मदत करण्यासाठी रेल्वे स्थानकावरून सर्व व्हिडिओ फुटेज सुरक्षित करण्याचे आदेश दिले आहेत.

### निष्काळजीपणाचे बळी

> नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर झालेल्या चेंगराचेंगरीत अनेक लोकांचा मृत्यू आणि अनेक जण जखमी झाल्याची बातमी अत्यंत दुःखद आणि वेदनादायक आहे. मी शोकाकुल कुटुंबांप्रती माझ्या मनापासून संवेदना व्यक्त करतो आणि जखमींच्या लवकर बरे होण्याची आशा करतो. या घटनेने पुन्हा एकदा रेल्वेचे अपयश आणि सरकारची असंवेदनशीलता अधोरेखित केली आहे. प्रयागराजला जाणाऱ्या भाविकांची मोठी संख्या लक्षात घेता, स्थानकावर चांगली व्यवस्था करायला हवी होती. गैरव्यवस्थापन आणि निष्काळजीपणामुळे कोणालाही आपला जीव गमवावा लागू नये याची काळजी सरकार आणि प्रशासनाने घ्यावी. — **राहुल गांधी, लोकसभा विरोधी पक्ष नेते.**

> या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी दोन सदस्यांची उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली असून, परिस्थिती नियंत्रणात आहे आणि प्रवाशांना विशेष ट्रेनने पाठवण्यात आले आहे. रेल्वे स्थानकावरील रेल्वे वाहतूक आता सामान्य आहे,"
> — **दिलीप कुमार, कार्यकारी संचालक, माहिती आणि प्रसिद्धी**

# राजिनाम्याबाबत धनंजय मुंडे यांनीच निर्णय घ्यावा

मागणी लावून धरली आहे. मुंडे यांना अजित पवार पाठीशी घालत असल्याचा आरोपही होत आहे. या पार्श्वभूमीवर अजित पवार यांचे विधान महत्त्वाचे ठरले आहे.

मी अनेक वर्षांपासून काम करतोय, मी अनेक महत्त्वाची खाती सांभाळली आहेत. मला अनेकदा बदनाम करण्याचा प्रयत्न झाला. माझी प्रतिमा जनमानसांतील प्रतिमा खराब करण्याचाही प्रयत्न झाला. सिंचन घोटाळ्यावेळी आरोप झाल्यावर मी राजीनामा दिला हे खरंय पण त्यावेळी मला पटले नाही म्हणून मी राजीनामा दिला. पण आताची परिस्थिती वेगळी आहे. आम्ही चौकशी करत आहोत, असंही अजित पवार यावेळी म्हणाले.

ते म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मी सांगितले आहे की, जी घटना बीडला घडली, ती अतिशय निंदनीय आहे. माणुसकीला काळं फासणारी घटना आहे त्यामुळे त्यात जे कोणी दोषी असतील त्यांना शासन केले जाईल. कुणालाही सोडले जाणार नाही. मुख्यमंत्र्यांनी त्वरित एसआयटी, सीआयडी नेमली आहे. न्यायालयीन चौकशी देखील सुरू आहे, असे ते म्हणाले.

# न्यू इंडिया बँकेचा १२२ कोटींचा घोटाळा

हजर केलं असता, न्यायालयानं आरोपी हितेश मेहताला २१ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँकेतील घोटाळा प्रकरणी दादर पोलीस ठाण्यात आरोपी हितेश मेहता विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. दादर, माझगाव या शाखेमध्ये १२२ कोटी रुपयाचा हितेश मेहता यानं घोटाळा केल्याचं समोर आलं. हितेश मेहतासोबत धर्मेश पौना याचाही हात असल्याचं समोर आलं. त्यामुळे या बँकेतील घोटाळा प्रकरणी धर्मेश पौनालाही २१ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली. याप्रकरणी अन्य कोणाचा सहभाग आहे का? किंवा आरोपी हितेश मेहता याच्यासोबत आणखी कुणाचे या घोटाळ्यात संबंध आहेत का? याचा पुढील तपास पोलीस करत आहेत, घोटाळा आणि गैरव्यवहार प्रकरण समोर आल्यानंतर रिझर्व बँक ऑफ इंडियानं न्यू इंडिया को ऑपरेटिव्ह बँकेवर निर्बंध लादले. या प्रकरणी बँकेला कायदेशीर नोटीस बजावली आणि बँकेत कोणतेही आर्थिक व्यवहार होणार नाहीत असं नमूद केलं. त्यामुळे ज्या गुंतवणूकदारांनी बँकेत ठेवी ठेवल्या, त्यांचे धाबे दणाणले. त्यामुळे पैसे काढण्यासाठी मागील दोन दिवसात बँकेबाहेर मोठ्या प्रमाणात गर्दी झाल्याचं पाहायला मिळालं. दुसरीकडं आपले पैसे बुडणार तर नाहीत ना? या काळजीत सध्या खातेदार आहेत. परंतु मागील दोन दिवसात आपल्या खात्यावरील पैसे काढण्यासाठी न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँकेच्या अनेक शाखाबाहेर मोठ्या प्रमाणात रांगा लागल्याचं चित्र दिसत आहे.

# डॉ. प्रदीप कुरुलकर विरोधात आरोप निश्चित

सुरू करण्यात आले आहेत. कुरुलकर हा पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणेच्या संपर्कात आला होता. समाज माध्यमातून झारा दासगुप्ता या महिलेच्या संपर्कात तो होता. त्याने भारतीय संरक्षण सिद्धतेविषयीची गोपनीय आणि संवेदनशील माहिती दासगुप्ताला पुरविली होती. दासगुप्ताच्या नावाने पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणेने समाजमाध्यमात बनावट खाते उघडले होते. प्रत्यक्षात दासगुप्ता ही पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणेतील महिला होती. त्याच्या हालचालींवर भारतीय लष्कराच्या गुप्तचर यंत्रणेने नजर ठेवली होती. त्याने पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणेला गोपनीय माहिती पाठविल्याचे उघड झाल्यानंतर त्याला एटीएसने ४ मे २०२३ रोजी अटक केली होती. त्याच्याकडून लॅपटॉप, मोबाइल संच, अन्य इलेक्ट्रॉनिक साधने जप्त करण्यात आली होती. संबंधित इलेक्ट्रॉनिक साहित्य न्यायवैद्यकीय प्रयोगशाळेत तांत्रिक विश्लेषणात पाठविण्यात आली होती. तांत्रिक विश्लेषणातून तो पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणेच्या संपर्कात असल्याचे उघड झाले होते.

त्याने दासगुप्ताला भारतीय लांब पल्ल्याच्या क्षेपणास्त्रांविषयी गोपनीय, संवेदनशील माहिती पुरविली होती. त्याने परदेशात जाऊन दासगुप्ता असे नाव सांगणाऱ्या महिलेची भेटही घेतली होती. त्याने पाकिस्तानी हेरांना संरक्षणविषयक माहिती कशी पुरविली, याची माहिती आरोपपत्राद्वारे देण्यात आली. त्यानंतर त्याच्याविरुद्ध आरोपपत्राचा मसुदा विशेष न्यायाधीश व्ही. आर. कचरे यांच्या न्यायालायत सादर करण्यात आला.

कुरुलकर सध्या येरवडा कारागृहात न्यायालयीन कोठडीत आहे. त्याने त्याच्या वकिलांमार्फत जामीन मिळवण्यासाठी अर्ज सादर केला होता. गेल्या वर्षी विशेष न्यायालयाने त्याचा जामीन अर्ज फेटाळून लावला.

कुरुलकरने देशाच्या सार्वभौमत्वाला बाधा पोहोचविणारे कृत्य केले आहे. त्याने संरक्षणविषयक गोपनीय आणि संवेदनशील माहिती पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणेला दिली आहे. या खटल्याचा निकाल लवकर लागावा, तसेच प्रत्यक्ष सुनावणीस सुरुवात व्हावी, या दृष्टीने सरकार पक्षाकडून आरोप निश्चितीचा मसुदा न्यायालयात सादर केला आहे. संबंधित मसुदा वगळावा (डिस्चार्ज), अशी मागणी कुरुलकरच्या वकिलांनी केली आहे, असे विशेष सरकारी वकील उज्ज्वला पवार यांनी नमूद केले. आरोप निश्चितीचा मसुदा सादर केल्यानंतर न्यायालयात प्रत्यक्ष सुनावणीस प्रारंभ होऊन या खटल्याचा निकाल लवकरात लवकर लावण्यासाठी सरकार पक्षाकडून प्रयत्न सुरू करण्यात आले आहेत.

# लाडकी बहिणीच्या अपात्रतेला प्राप्तीकराची 'चाळण'

आहेत, त्यांना इतरही योजनांचा लाभ मिळत आहे. परिणामी आता संजय गांधी निराधार योजना, नमो शक्ती योजना व स्वतःहून लाडकी बहीण योजनेचा लाभ नाकारणाऱ्या लाभार्थींची संख्या ५ लाख ४० हजारांपर्यंत पोहोचली आहे. सध्या ज्या लाभार्थी महिलांच्या नावे चारचाकी आहेत, त्याची पडताळणी देखील सुरू आहे. तसेच ज्या कुटुंबांचे उत्पन्न अडीच लाखांपेक्षा अधिक आहे, अशा कुटुंबातील लाभार्थी महिलांना या योजनेतून वगळण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे, अशी माहिती मिळाली आहे.

# कॉंग्रेसी नेत्याच्या पत्नीचे 'पाक' कनेक्शन

## तपासासाठी विशेष एसआयटीची स्थापना : आसामच्या सुरक्षेला किती धोका?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** लोकसभेतील काँग्रेसचे उपनेते गौरव गोगोई यांची ब्रिटिश पत्नी एलिझाबेथ कोलबर्न गोगोई यांचे पाकिस्तानच्या आयएसआयशी कनेक्शन असल्याच्या आरोपांची विशेष तपास पथक स्थापन करुन चौकशी केली जाण्याची शक्यता आहे. लग्नानंतर एलिझाबेथ कोलबर्न गोगोई या पाकिस्तानचे नागरिक असलेल्या किती लोकांच्या संपर्कात आहेत आणि ही मंडळी नेमकी कोणत्या स्वरुपाची कामं करतात ? यामुळे भारताच्या तसेच देशाच्या ईशान्य भागातील राज्यांच्या प्रामुख्याने आसामच्या सुरक्षेला किती धोका आहे याचाही तपास होण्याची शक्यता आहे.

आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी एक्स पोस्ट केली आहे. यात त्यांनी एलिझाबेथ कोलबर्न गोगोई लग्नानंतर पाकिस्तानमध्ये जाऊन आल्याची माहिती हाती आल्याचे सांगितले. या संदर्भात आणखी माहिती लवकरच हाती येईल, असे सूतोवाच आसामच्या मुख्यमंत्र्यांनी केले आहे. यामुळे एलिझाबेथ कोलबर्न गोगोई यांची चौकशी होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

गौरव गोगोई यांचे वडील तरुण गोगोई हे आसामचे मुख्यमंत्री होते. तरुण गोगोई हे मुख्यमंत्री असतानाच्या काळात पाकिस्तानच्या आयएसआयचे हात थेट मुख्यमंत्र्यांच्या टेबलपर्यंत पोहोचले होते का याचाही तपास होण्याची शक्यता आहे.



आयएसआयसोबत संबंध, ब्रेनवॉश करण्यासाठी आणि कट्टरपंथी बनवण्यासाठी तरुणांना पाकिस्तानी दुतावासात घेऊन जाणे, तसेच गेल्या १२ वर्षांपासून भारतीय नागरिकत्व स्विकारण्यास नकार देणे या प्रश्नांचं उत्तर मिळण्याची गरज आहे.
**-हिमंता बिस्वा सरमा,** आसामचे मुख्यमंत्री

**चीनबरोबर संबंध :** आसामचे मुख्यमंत्री हेमंत बिस्वा सरमा यांनी गोगोई आणि एलिझाबेथ कोलबर्न यांच्यावर प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यांनी नवी दिल्लीत पाकिस्तान उच्चायुक्त अब्दुल बासित यांची गौरव गोगोई यांनी घेतलेली भेट आणि त्यानंतर लोकसभेत विचारलेला प्रश्न? यावर शंका उपस्थित केली आहे. त्यानंतर काँग्रेसचा संबंध पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणा आयएसआय सोबत आहे आणि चीनसोबत त्यांचे संबंध असल्याचा आरोप भाजपने केला आहे.

### कोण आहेत एलिझाबेथ कोलबर्न गोगोई ?

● काँग्रेसच्या गौरव गोगोई आणि एलिझाबेथ कोलबर्न यांची भेट संयुक्त राष्ट्र सचिवालयात २०१० मध्ये झाली. पुढे २०१३ मध्ये गौरव गोगोई आणि एलिझाबेथ कोलबर्न यांनी प्रेमविवाह केला. आधी या लग्नाला गौरव गोगोई यांचे वडील आणि आसामचे त्यावेळचे मुख्यमंत्री तरुण गोगोई यांची संमती नव्हती. पण नंतर तरुण गोगोई यांनी गौरव गोगोई आणि एलिझाबेथ कोलबर्न यांच्या लग्नाला संमती दिली. हाती आलेल्या माहितीनुसार, एलिझाबेथ कोलबर्न लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये शिकल्या आहेत. त्यांनी प्रामुख्याने स्वयंसेवी संस्थांमध्ये काम केले. सध्या एलिझाबेथ कोलबर्न गोगोई या ऑक्सफर्ड पॉलिसी मॅनेजमेंट या संस्थेसाठी काम करतात. पर्यावरणाच्या क्षेत्रात ही संस्था कार्यरत आहे. याआधी एलिझाबेथ कोलबर्न या सीडीकेएन नावाच्या पर्यावरणाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थेत कार्यरत होत्या. याच संस्थेच्या माध्यमातून पाकिस्तानचे आयएसआय त्यांच्या पहिल्यांदा संपर्कात आल्याचे वृत्त आहे.


### ब्रिटिश नागरिक

● लग्न झाले आणि मागील १२ वर्षांपासून एलिझाबेथ कोलबर्न भारतात आहेत. पण त्यांनी अद्याप भारताचे नागरिकत्व स्वीकारलेले नाही. आजही त्या ब्रिटिश नागरिक आहेत. भारतात व्हिसा आहे म्हणून वास्तव्य करत आहेत; असे आरोप त्यांच्यावर होत आहेत. पर्यावरणाच्या क्षेत्रात काम करण्याच्या नावाखाली एलिझाबेथ कोलबर्न पाकिस्तानकरिता काम करतात भारतात देशविरोधी कामं करतात, असाही आरोप त्यांच्यावर होत आहे.

---

# तहव्वूर राणाला भारतात आणणार; एनआयएची तयारी पूर्ण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या घोषणेनंतर दुसऱ्याच दिवशी भारताच्या सुरक्षा यंत्रणा २६/११ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यात सहभागी असलेल्या तहव्वुर राणाला भारतात आणण्याच्या तयारीत आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, राष्ट्रीय तपास यंत्रणेच्या (एनआयए) पथकाला सज्ज राहण्यास सांगण्यात आले आहे. राणाला आणण्यासाठी ही टीम केव्हाही अमेरिकेत जाऊ शकते. या प्रक्रियेसाठी भारत सरकारने अमेरिकी प्रशासनाकडे कागदपत्रे सुपूर्द केली आहेत. 'सरेंडर वॉरंट' जारी करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आल्याचे अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे.

एनआयएच्या तीन सदस्यीय पथकात महानिरीक्षक दर्जाचा एक अधिकारी आणि उपमहानिरीक्षक दर्जाचा अधिकारी असेल, अशी माहिती सूत्रांनी दिली. अमेरिकी अधिकाऱ्यांकडून 'सरेंडर वॉरंट' मिळाल्यानंतर ते अमेरिकेला रवाना होतील. संघातील सदस्य विमानतळावर तहव्वुर राणाचा ताबा घेतील आणि ताबडतोब भारतात परततील.

तहव्वुर राणा हा मूळचा पाकिस्तानी आहे. सध्या तो लॉस एंजेलिसच्या तुरुंगात आहे. लष्कर-ए-तोयबाचा दहशतवादी डेव्हिड कोलमन हेडलीशी त्याचे संबंध आहेत. २००८ च्या मुंबई हल्ल्याचा तो मुख्य सूत्रधार होता. या हल्ल्यात १६६ जणांचा मृत्यू झाला होता.

प्रत्यार्पणाची प्रक्रिया जलद गतीने व्हावी, यासाठी अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने २१ जानेवारी रोजी राणाने दाखल केलेली पुनर्विचार याचिका पुन्हा फेटाळून लावली. त्यानंतर जानेवारीअखेर एनआयएचे पथक अमेरिकेत पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला होता, मात्र अमेरिकी अधिकाऱ्यांनी अतिरिक्त वेळ मागितला होता.

भारत सरकारकडून यापूर्वीच अनेक आश्वासनांची पत्रे पाठविण्यात आली होती, परंतु अमेरिकी अधिकाऱ्यांनी कारागृहातील अतिरिक्त सुरक्षा आणि सुविधांबाबत अधिक माहिती मागितली होती.

राणाच्या प्रत्यार्पणानंतर एनआयए दिल्लीतील मुख्यालयात त्याची चौकशी करेल आणि सुरक्षा व्यवस्था कडक केली जाईल, अशी माहिती सूत्रांनी दिली. कडक बंदोबस्तात त्याच्यावर नजर ठेवण्यासाठी तिहार तुरुंग प्रशासनाने त्यांच्या विभागात सुरक्षेचे मूल्यमापन सुरू केले आहे. राणा याला हाय सिक्युरिटी वॉर्डमध्ये ठेवण्यात येणार असून, त्यांच्या हालचालींवर २४ तास लक्ष ठेवण्यात येणार आहे.

## संघ हिंदूंना एकत्र आणतो; डॉ. भागवत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोलकाता :** सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी रविवारी कोलकात्यातील बर्दवान येथे स्वयंसेवकांना संबोधित केले. त्यांनी हिंदू समाजाला एकत्र करण्याचे महत्त्व अधोरेखित केले आणि म्हणाले, संघ संपूर्ण हिंदू समाजाला एकत्र करू इच्छितो. आपल्याला हिंदू समाजाला एकत्र करण्याची गरज का आहे? कारण या देशासाठी जबाबदार असलेला समाज हा हिंदू समाज आहे. सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी कार्यकर्त्यांना संबोधित केले. कोलकाता उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर सरसंघचालकांनी पश्चिम बंगाल येथे सभेला संबोधित केले. त्यापूर्वी, बंगाल पोलिसांनी त्यांना परवानगी दिली नव्हती.

डॉ. मोहन भागवत म्हणाले, आज काही विशे, दिवस नाही, तरीही सकाळपासून सर्वजण इतक्या उन्हात का बसले आहेत? संघाला काय करायचे आहे? या प्रश्नाचे उत्तर एका वाक्यात द्यायचे असेल, तर संघ संपूर्ण हिंदू समाजाला एकत्र करू इच्छितो. आपल्याला हिंदू समाजाला एकत्र करण्याची गरज का आहे? कारण या देशासाठी जबाबदार असलेला समाज हिंदू समाज आहे... भारताचा एक स्वभाव आहे आणि ज्यांना वाटले की ते त्या स्वभावासोबत राहू शकत नाहीत, त्यांनी स्वतःचा वेगळा देश निर्माण केला... हिंदू जगाच्या विविधतेचा स्वीकार करून पुढे जातात.

## आयकर विधेयकासाठी संसदीय समिती गठित

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी नवीन आयकर विधेयकासाठी ३१ सदस्यांची संसदीय समिती गठित केली आहे. ओडिशातील केंद्रपाडा येथील भाजपचे खासदार बैजयंत पांडा यांना समितीचे अध्यक्ष बनवण्यात आले आहे. समितीला पुढील अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी अहवाल सादर करावा लागेल. या समितीत महाराष्ट्रातील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या सुप्रिया सुळे, शिवसेना ठाकरे गटाचे अरविंद सावंत आणि काँग्रेसचे गोवाल पाडवी या खासदारांचा समावेश आहे.

चालू अर्थसंकल्पीय अधिवेशन ४ एप्रिल रोजी संपणार आहे. पावसाळी अधिवेशन जुलैच्या तिसऱ्या किंवा चौथ्या आठवड्यात सुरू होऊ शकते. समितीच्या सदस्यांमध्ये निशिकांत दुबे, जगदीश शेट्टर, पीपी चौधरी, सुधीर गुप्ता, नवीन जिंदाल, अनिल बलुनी, दीपेंद्र हुड्डा, महुआ मोइत्रा इत्यादींचा समावेश आहे. ही समिती नवीन आयकर विधेयकावर आपल्या शिफारसी देईल, त्यानंतर सरकार मंत्रिमंडळामार्फत निर्णय घेईल की या सुधारणांचा समावेश करायचा आहे की नाही. त्यानंतर हे विधेयक संसदेत परत मांडले जाईल आणि त्यानंतर सरकार त्याच्या अंमलबजावणीची तारीख ठरवेल.




### प्रस्तावित कायदा

● गेल्या अनेक वर्षांपासून सरकार आयकर कायदे सोपे करण्याचा प्रयत्न करत आहे. यासाठी २०१८ मध्ये एक टास्क फोर्स स्थापन करण्यात आला, ज्याने २०१९ मध्ये आपला अहवाल सादर केला. अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी १३ फेब्रुवारी २०२५ रोजी लोकसभेत हे नवीन आयकर विधेयक सादर केले. ६२२ पानांचे हे विधेयक सहा दशके जुन्या आयकर कायद्याची जागा घेईल. प्रस्तावित कायद्याला आयकर कायदा २०२५ असे म्हटले जाईल आणि ते एप्रिल २०२६ मध्ये लागू होण्याची अपेक्षा आहे. सध्याचा आयकर कायदा १९६१ मध्ये मंजूर झाला. जे १ एप्रिल १९६२ पासून लागू झाला. यामध्ये वित्त कायद्यांतर्गत ६५ वेळा ४ हजारांहून अधिक दुरुस्त्या करण्यात आल्या.

---


## मस्जिद बंदर येथील इमारतीला आग; २ जणांचा मृत्यू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबईतील मस्जिद बंदर येथील एका इमारतीला आग लागल्याची घटना घडली आहे. आज सकाळी ही घटना घडली असून यामध्ये २ जणांचा मृत्यू झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आज सकाळी ६ वाजून ११ मिनिटांच्या सुमारास राम मंदिराजवळील वडगडी येथील इस्साजी स्ट्रीटवर असलेल्या पन्न अली मॅन्शन या १२ मजली निवासी इमारतीत आग लागली. आगीची माहिती मिळताच घटनास्थळी अग्निशमन दलाचे पथक दाखल झाले. तातडीने बचावकार्य सुरु करण्यात आल्यामुळे आग विझवण्यात यश आले.

मात्र आगीच्या धुरामुळे दोन महिलांना आपला जीव गमवावा लागला. साजिया आलम शेख (३०) आणि सबिला खातून शेख (४२) असे दोन्ही मृत महिलांची नावे आहेत.



दरम्यान, पन्न अली मॅन्शन इमारतीमधील ग्राउंड फ्लोअरवरील कॉमन मीटर बॉक्स आणि पॅसेजमधील इलेक्ट्रिक वायरिंग याठिकाणी ही आग लागल्याची माहिती मिळत आहे.

## नव्या कॉरिडॉरचा युरोपला फायदा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची सोमवारी नवी दिल्लीत भेट झाली. यावेळी आशिया आणि युरोपला जोडणाऱ्या नव्या कॉरिडॉरच्या उभारणीवर चर्चा झाली. ते वेगाने पुढे नेण्याची गरज दोन्ही नेत्यांनी व्यक्त केली. परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी इस्रायलचे परराष्ट्रमंत्री गिदोन सार यांची भेट घेतली. यावेळी पश्चिम आशियातील परिस्थिती आणि मध्यपूर्वेतून इस्रायलमार्गे आशिया-युरोपला जोडणाऱ्या कॉरिडॉरवर चर्चा झाली. हा कॉरिडॉर अस्तित्वात येताच त्याचा सर्वाधिक फायदा युरोप आणि आशियातील देशांना होणार आहे.

**भारताला युरोपशी जोडणार :** पश्चिम आशियामार्गे भारताला युरोपशी जोडण्याचा प्रकल्प आहे. नवी दिल्ली येथे २०२३ मध्ये झालेल्या जी-२० परिषदेत या प्रकल्पाची घोषणा करण्यात आली. इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी हा इतिहासातील सर्वात मोठा सहकार्य प्रकल्प असल्याचे म्हटले होते आणि म्हटले होते की यामुळे मध्य पूर्व, इस्रायल बदलेल आणि संपूर्ण जगावर परिणाम होईल.



सुरक्षा-राजनैतिक बाबींवर चर्चा करण्यासाठी म्युनिक सिक्युरिटी कॉन्फरन्स या प्रमुख जागतिक व्यासपीठाच्या निमित्ताने जयशंकर आणि सार यांची शनिवारी भेट झाली. इस्रायलचे परराष्ट्रमंत्री गिदोन सार यांना भेटून आनंद होत आहे. पश्चिम आशियातील सद्यस्थितीवर चर्चा केली. आमच्या द्विपक्षीय भागीदारीचे सामर्थ्य आणि महत्त्व अधोरेखित केले. इस्रायलच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या कार्यालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सार यांनी जोर दिला की इस्रायल भारतासोबतच्या संबंधांना सामरिक महत्त्व देतो.

वॉशिंग्टनमध्ये गुरुवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासमवेत झालेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत ट्रम्प म्हणाले की, अमेरिका आणि भारत इतिहासातील सर्वात महान व्यापार मार्गांपैकी एक तयार करण्यासाठी एकत्र काम करण्यास सहमत आहेत. आहेत. हा मार्ग भारतातून इस्रायलपर्यंत, इटलीपर्यंत आणि नंतर अमेरिकेपर्यंत जाईल आणि आमच्या भागीदारांना बंदरे, रेल्वे आणि समुद्राखालील केबलशी जोडेल. ही एक मोठी घटना आहे, असे ते म्हणाले.

---

# भाकरी केव्हा फिरवणार?; नव्या भाजप पक्षाध्यक्षाची प्रतिक्षा

**नेमणूक**

**जेपी नड्डा हे गेल्या ६ वर्षांपासून सातत्याने भाजपचे अध्यक्ष आहेत. त्यांना लोकसभा निवडणुकीपर्यंत मुदतवाढ मिळाली, पण त्यानंतर महाराष्ट्र, हरयाणा सारख्या राज्यांच्या निवडणुकांमुळे नव्या अध्यक्षाची निवड लांबणीवर पडली. जानेवारी किंवा फेब्रुवारीपर्यंत भाजपला नवा अध्यक्ष मिळेल, अशी अपेक्षा होती, पण ती पुन्हा पुढे ढकलण्यात आली आहे.**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** आता मार्चमध्ये भाजपला जेपी नड्डा यांचा समर्थ पर्याय मिळेल, अशी चर्चा आहे. भाजपच्या घटनेनुसार किमान निम्म्या प्रदेशाध्यक्षांची निवड राष्ट्रीय अध्यक्ष निवडीपूर्वी व्हायला हवी. त्याचबरोबर प्रदेशाध्यक्ष निवडीपूर्वी जिल्हाध्यक्षांची निवड करण्यात यावी. आतापर्यंत अशी अनेक राज्ये आहेत, जिथे जिल्हाध्यक्षांची निवड झालेली नाही आणि त्यामुळे प्रदेशाध्यक्षांची निवडणूक रखडली आहे.

राष्ट्रीय अध्यक्षपदाची निवड लांबणीवर पडली असल्याचे एक कारण म्हणजे दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपने आपल्या संघटनेची संपूर्ण यंत्रणा उभी केली होती. त्यामुळे अनेक राज्यांमध्ये संघटनात्मक निवडणुका लांबणीवर पडल्या. भाजपने आतापर्यंत ३६ पैकी ११ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये प्रदेशाध्यक्षांची निवड केली आहे. अनेक राज्यांत निवडणुका सुरू असून काही ठिकाणी अध्यक्षांची पुनरावृत्ती होत आहे. आतापर्यंत आंध्र प्रदेश, बिहार आणि हिमाचल प्रदेश सारख्या राज्यांमध्ये निवडणुका झाल्या आहेत. पण उत्तराखंड, यूपीसह अनेक राज्यांमध्ये निवडणुका अजूनही रखडल्या आहेत. फेब्रुवारी किंवा मार्चच्या सुरुवातीलाच राज्यात निवडणुका होणे शक्य असल्याचे भाजप संघटनेतील लोकांचे म्हणणे आहे.

त्यामुळे मार्च अखेरपर्यंत भाजपला नवा अध्यक्ष मिळण्याची दाट शक्यता आहे. या दिरंगाईचे एक कारण म्हणजे लोकसभा निवडणुकीनंतरही राज्यांच्या निवडणुका सातत्याने सुरू होत्या. त्यानंतर दिल्ली विधानसभा निवडणूक आली. बिहार विधानसभा निवडणुकीला आता जवळपास ६ महिने शिल्लक आहेत.



### शानदार विजय

● भाजप अध्यक्षांचा कार्यकाळ केवळ तीन वर्षांचा आहे, पण जेपी नड्डा यांना यावेळी मुदतवाढ मिळाली. जेपी नड्डा हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सावलीत असले तरी त्यांचा कार्यकाळ अनेक राज्यांमध्ये शानदार विजय आणि सलग तिसऱ्यांदा केंद्रात सरकार स्थापन करण्यासाठी स्मरणात राहील. याच काळात ओडिशा, दिल्लीसारख्या राज्यांत भाजपने विजय मिळवला, तर महाराष्ट्र आणि हरयाणासारख्या राज्यांमध्येही भाजपने विजयाची हॅटट्रिक केली.

---

## छत्तीसगडमध्ये भाजपचा दणदणीत विजय

**नवी दिल्ली :** भाजपने छत्तीसगडमधील १० स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत दणदणीत विजय मिळवला. या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये काँग्रेसचा दारुण पराभव झाला. छत्तीसगडमधील रायगड नगर निगम महापौरपदाच्या निवडणुकीत भाजपच्या तिकिटावर उभा असलेला चहावाला विजयी झाला. चहावाला छत्तीसगडमधील रायगड नगर निगमचा महापौर झाला. आता चहाचा व्यवसाय सांभाळत नागरिकांचे प्रश्न सोडवणार, असे महापौर जीवर्धन चौहान म्हणाले. त्यांनी रायगड नगर निगममधील नागरिकांचे रोजचे जगणे सुसह्य करण्यासाठी आवश्यक त्या पायाभूत सुविधांचा विकास करण्याला सर्वोच्च प्राधान्य देणार असल्याचे जाहीर केले. रायगड नगर निगमच्या महापौरपदाच्या निवडणुकीत भाजपच्या जीवर्धन चौहान यांनी काँग्रेसच्या जानकी काटजू यांचा पराभव केला. जीवर्धन चौहान यांनी महापौरपदाची निवडणूक ३४ हजार ३६५ मतांनी जिंकली. जनतेने विकासाकरिता भाजपवर विश्वास दाखवला आहे. हा विश्वास सार्थ ठरवणार, असे जीवर्धन चौहान म्हणाले. रायगड नगर निगममध्ये भाजपने ३३ प्रभागांमध्ये (वॉर्ड) विजय मिळवला. काँग्रेस १२ प्रभागांपुरती मर्यादीत राहिली. बहुजन समाज पक्षाने एक आणि अपक्षांनी दोन प्रभाग जिंकले. प्रभागांच्या निवडणुकीसाठी १४४ तर महापौरपदाच्या निवडणुकीसाठी सात उमेदवार रिंगणात होते.

### पैकीच्या पैकी जागा

● भाजपने छत्तीसगडमध्ये सर्वच्या सर्व १० नगर निगम, ४९ पैकी ३५ नगरपालिका, ११४ पैकी ८१ नगर पंचायती जिंकल्या. याआधी विधानसभेच्या निवडणुकीत भाजपाने ९० पैकी ५४ आणि लोकसभेच्या निवडणुकीत ११ पैकी १० जागांवर विजय मिळवला होता.

## बंद पडलेल्या खासगी बसला ट्रॅव्हलरची धडक

**बाराबंकी (लखनौ) :** रविवारी पहाटे पूर्वांचल एक्सप्रेसवेवर बंद पडलेल्या खासगी बसला ट्रॅव्हलर बसनं पाठीमागून धडक दिली. या अपघातात महाराष्ट्रातून अयोध्येला ट्रॅव्हलरनं जाणाऱ्या चार भाविकांचा मृत्यू झाला. तर सहा जण गंभीर जखमी झाले. अपघातात ट्रॅव्हलरच्या (मिनी बस) पुढील भागाचं मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. घटनास्थळी आलेल्या पोलिसांनी मोठ्या परिश्रमानं गाडीमध्ये अडकलेल्या लोकांना बाहेर काढले. यानंतर त्यानंतर रुग्णालयात उपचाराकरिता पाठवण्यात आलं. छत्तीसगडहून अयोध्येला भाविकांना घेऊन जाणाऱ्या खासगी बसमध्ये बिघाड झाला. त्यामुळे ही बस पूर्वांचल एक्सप्रेस वेवर लोणी कटरा पोलीस स्टेशन हद्दीतील फुटा भवानीपूर गावाजवळ रस्त्यावर थांबविण्यात आली. पहाटे ५ वाजण्याच्या सुमाराला महाराष्ट्रातील भाविकांना घेऊन मिनीबस अयोध्येला जात होती. अचानक बंद पडलेली खासगी बस समोर दिसताच चालकानं वाहनावरील नियंत्रण गमाविलं. मिनी बस ही खासगी बसला मागून जोरदार धडकली.

## ऑस्ट्रियन शहर हादरले

**व्हिएन्ना :** दक्षिण ऑस्ट्रियातील व्हिलाच शहरात एका व्यक्तीने दिवसाढवळ्या सहा पादचाऱ्यांवर चाकूहल्ला करून १४ वर्षीय मुलाला ठार केले, तर यात अन्य पाच जण जखमी झाले. शहराची लोकसंख्या सुमारे ६० हजार असून रहिवाशांनी हल्ल्याच्या ठिकाणी मेणबत्त्या लावून श्रद्धांजली वाहिली. स्थानिक प्रसारमाध्यमांनी दिलेल्या वृत्तानुसार, शनिवारी झालेल्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या मुलाला ओळखणारे काही तरुण रविवारी सकाळी घटनास्थळी जमले आणि त्यांनी घटनेबद्दल शोक व्यक्त केला. चाकू हल्ल्यानंतर ताब्यात घेण्यात आलेला २३ वर्षीय संशयित हा सिरियन असून, त्याच्याकडे ऑस्ट्रियामध्ये राहण्याचा निवासी परवाना आहे.

## सेक्सटॉर्शनचा बळी

**नवी मुंबई :** सेक्सटॉर्शनला कंटाळून प्राथमिक शाळेच्या शिक्षकानं आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. संबधित शिक्षक हा अलिबाग तालुक्यातील कुर्डूस या गावातील रहिवासी होता. या प्रकरणी नवी मुंबई पोलीस अधिक तपास करत आहेत. अलिबागमधील कुर्डुस इथं राहणाऱ्या वैभव पिंगळे (४५) प्राथमिक शाळेच्या शिक्षकानं आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी घडली. सेक्सटॉर्शनला कंटाळून वैभव पिंगळे यांनी आत्महत्या केल्याची माहिती समोर आली आहे. गेल्या दिवसांपासून सायबर गुन्हेगारांच्या माध्यमातून वैभव हे सेक्सटॉर्शनच्या जाळ्यात अडकले होते. सायबर गुन्हेगार वैभव यांच्याकडून पैसे उकळत होते. पैसे न दिल्यास वैभव यांना विविध धमक्या हे सायबर गुन्हेगार देत होते, या प्रकाराला वैभव पिंगळे प्रचंड कंटाळून मानसिक ताणाखाली होते.

## माओवाद्यांच्या बालेकिल्ल्यात नवा तळ

**रायपूर :** छत्तीसगडच्या दक्षिण बस्तर भागात सीआरपीएफने मजबूत माओवादी कॉरिडॉरच्या मध्यभागी एक नवीन ऑपरेशन बेस उघडला आहे. विजापूर जिल्ह्यातील 'पुजारी कांकेर' येथे १९६ व्या आणि २०५ व्या कोबरा बटालियनने १३ फेब्रुवारी रोजी या भागात तैनात निमलष्करी दलाच्या इतर विविध तुकड्यांच्या मदतीने फॉरवर्ड ऑपरेटिंग बेसची स्थापना केली होती. ज्या दुर्गम भागात फॉरवर्ड ऑपरेटिंग बेस (एफओबी) उभारण्यात आला आहे, तो डोंगरांनी वेढलेला आहे आणि दक्षिण आणि पश्चिम बस्तर विभागातील माओवाद्यांचे प्रशिक्षण शिबिरे, शस्त्रास्त्रे आणि दारुगोळा डम्पिंग आणि रेशन युनिट्स आहेत, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

» Selected

## माजी सैनिकांना गुलाबपुष्प देवून व्हॅलेंटाईन डे साजरा



**सासवड :** १४ फेब्रुवारी हा व्हॅलेंटाईन दिवस म्हणुन सर्वत्र साजरा होत असताना, येथील एकनाथ काका जगताप प्रतिष्ठानच्या वतीने माजी सैनिकांना गुलाबपुष्प देवून तो साजरा करण्यात आला. १४ फेब्रुवारी २०१९ रोजी जम्मु श्रीनगर महामार्गावरील पुलवामा येथील अतिरेकी हल्ल्यात चाळीसहून अधिक भारतीय जवान शहीद झाले होते. त्यांच्याप्रती कृतज्ञता म्हणून या सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. सन १९७१ च्या युद्धात वापरलेल्या व सध्या सासवड नगर पालिकेच्या डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्यानातील टी ५५ या रणगाड्या समोर हा कार्यक्रम झाला. माजी सैनिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष नामदेव कुंभारकर, धनंजय जगताप, किरण पुरंदरे, राजेंद्र भोंगळे लक्ष्मण कुलकर्णी, दत्तात्रय कंचगार, चंद्रकांत कुंभार हे माजी सैनिक याप्रसंगी उपस्थित होते. प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष जगताप यांनी उपस्थितांचे स्वागत केले व आभार मानले तर प्रतिष्ठानचे सचिव हेमंत ताकवले यांनी प्रास्तविक केले. जेष्ठ पत्रकार सुधीरभाऊ गुरव, आनंदभय्या जगताप, मोहन ढगारे, संतोष कामथे महेश लेकावळे यांसह अन्य मान्यवर या प्रसंगी उपस्थित होते. किरण पुरंदरे यांनी सैनिक संघटनेच्या वतीने स्व एकनाथ काका जगताप प्रतिष्ठानचे मनोगतातून आभार मानले.

## इंदापूरात आज लोकशाही दिन

**इंदापूर :** जिल्हाधिकारी पुणे यांनी दिलेल्या निर्देशानुसार प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी तालुका लोकशाही दिवस आयोजित करण्याचे नियोजित आहे. त्या अनुषंगाने सोमवारी इंदापूर तालुका तहसील कार्यालय येथे लोकशाही दिवस आयोजित केला आहे. या कार्यक्रमासाठी जिल्हा स्तरावरून सनियंत्रण अधिकारी यांची देखील नेमणूक करण्यात आलेली आहे. सदर शिबिरामध्ये सर्व शासकीय कार्यालयाचे प्रमुख व त्यांचे कर्मचारी उपस्थित राहणार आहे. सर्व नागरिकांचे प्रलंबित विषय, अडी-अडचणी व समस्या यांचे निराकरण सदर शिबिरामध्ये संबंधित कार्यालयाकडून केले जाणार आहे. तरी सर्व नागरिकांनी येथे उपस्थित राहून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन इंदापूर तालुक्याचे तहसीलदार जीवन बनसोडे यांनी केले आहे.

## सरपंचपदी गुराप्पा पवार यांची निवड; भिगवण ग्रामपंचायत निवडणूक

**भिगवण :** भिगवण ग्रामपंचायत सरपंचपद रिक्त झाल्याने, सरपंचपदासाठी नुकतीच निवडणुक प्रक्रिया पार पडली. यामध्ये गुरप्पा गंगाराम पवार यांना बहुमत मिळवल्याने सरपंचपदी निवड करण्यात



आली. प्रतिस्पर्धी निर्मला हरिचंद्र पांढरे यांना ५ मते मिळाली. सत्ताधारी गटातील महिला सदस्य सरपंच पदासाठी इच्छुक राहिलेल्या निर्मला हरिश्चंद्र पांढरे यांनी मोठया धाडसी वृत्तीने गटातील निर्णयाला फाटा देत एकाधीकारशाहीला सुरुंग लावल्याचे बोलले जात आहे. सरपंचपदी गुराप्पा पवार यांची वर्णी लागल्याने स्वगृही लढ्यातून कडवे आव्हानानंतर विजय मिळवल्याने, गुलाल उधळत आनंद व्यक्त करण्यात आला. भिगवण ग्रामपंचायत निवडणूक २०२१ झालेले पंचवार्षिक निवडणूकी मध्ये श्रीनाथ पॅनल १६ तर भैरवनाथ पॅनल १ असे बहुमत मिळाले होते. परंतु सत्तेचा रिमोट कंट्रोल हातात ठेवुन नामधारी पदाधिकारी घेऊन काम करणाऱ्या नेत्यावर दीपिका तुषार क्षीरसागर यांनी ऑनलाईन टेंडर पध्दतीने बंदोबस्त करत गटातटाच्या राजकारणात न अडकता लोकांना सेवा देण्यावर अधिकचा भर दिला. ग्रामस्थांनी सांगितलेल्या समस्या फोनवर मार्गी लावत कामात सुसूत्रता आणली. कामगारांचे पगार वेळेत करत ग्रामपंचायत कर्जमुक्त केली. याच पद्धतीचा अवलंब करत नव्याने नियुक्त झालेले सरपंच गुराप्पा पवार हे संयमी व मीतभाषी नेतृत्व असल्याने ते ग्रामस्थांना चांगली लोकसेवा उपलब्ध करून देतील, अशी लोकांना आशा आहे. निवडीनंतर जयदीप जाधव, अशोकराव शिंदे तसेच संजय देहाडे यांनी शुभेच्छा दिल्या. निवडणूक प्रक्रियासाठी निवडणूक अधिकारी दीपक कोकरे, सहायक राहुल देवरे, ग्रामसेवक भगीरथ परदेशी यांनी कामकाज पाहिले.

## दुचाकी घसरुन पडल्याने ज्येष्ठाचा मृत्यू

**शिक्रापूर :** पाबळ (ता. शिरुर) येथील देवराम पिंगळे हे पिण्याचे पाणी आणण्यासाठी त्यांच्या दुचाकीहून पिंपळवाडी ते पाबळ रस्त्याने



चाललेले असताना देवराम यांचे दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने, ते दुचाकीसह रस्त्यावर पाडून गंभीर जखमी झाले. दरम्यान त्यांना उपचारासाठी पुणे येथे घेऊन जाताना उपचारापूर्वीच देवराम हरिभाऊ पिंगळे (८०, रा. माळतळे पाबळ ता. शिरुर) यांचा मृत्यू झाला. याबाबत राहुल दिलीप पिंगळे ( ३९, रा. माळतळे, पाबळ ता. शिरुर) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली आहे.

# गलांडवाडी बनले अधिकाऱ्यांचे गाव

## हमाल, वाहन चालक यांच्या मुलांनी घातली यशाला गवसणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**इंदापूर :** शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे याचा प्रत्यय इंदापूर तालुक्यातील मौजे गलांडवाडी नंबर एक येथील दोन युवती तसेच एक युवकाने सर्वांना दिला आहे. विशेष म्हणजे यातील दोन मुली या हमाली काम करणाऱ्या तर एक मुलगा वाहन चालक कुटुंबातील आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत केवळ जिद्द, चिकाटी, आत्मविश्वास तसेच मेहनतीच्या जोरावर या मुलांनी यशाला गवसणी घालत आपल्या कुटुंबा बरोबरच गावाचे देखील नाव मोठे केले आहे. आई वडील हे जिवंत तीर्थक्षेत्र असून त्यांचा आशीर्वाद पाठीशी असल्याने हे यश संपादन केले. त्यास समाजातील अनेक देव माणसांनी मदत व सहकार्य केल्याने आपली प्रगती झाली अशी भावना या यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये आहे.

पुणे सोलापूर राष्ट्रीय महामार्गालगत असलेले गलांडवाडी नंबर एक हे गाव हमाल, शेतमजूर व कामगारांचे गाव म्हणून ओळखले जात होते. येथील लोक खडीवरती, नाला बंधारे, ऊस तोडणी, वाहनचालक तसेच हमाली अशा प्रकारची कष्टाची कामे करत होती. कुटुंबाचा उदरनिर्वाह भागविताना शिक्षणाकडे कुणाचाही फारसा कल नव्हता. परंतु उजनी धरण झाल्यानंतर १९८० सालापासून उजनीचे पाणलोट क्षेत्र झाल्यानंतर तसेच त्यानंतर कर्मयोगी कारखाना व सोनाई दूध संघ झाल्यानंतर गावात सुबत्ता निर्माण होवू लागली. त्यानंतर या गावात हळूहळू सहा कृषी सहाय्यक, विविध अधिकारी झाल्यानंतर शिक्षणाचे महत्व गावास पटायला लागले. त्यानंतर सुशिक्षित पिढीने हे चित्र बदलण्यासाठी अपार मेहनत आणि कष्ट याच्या जोरावर गावा मध्ये कृषी क्षेत्रामध्ये जास्त तरुणांनी अधिकारी होवून अधिकाऱ्यांचे गाव म्हणून गावाची ओळख निर्माण केली. त्यांची प्रेरणा घेवून या गावाने शिक्षकांच्या मदतीने अ व्हिलेज गो टू स्कूल हा पथदर्शी प्रयोग गावात राबविला. त्याची नोंद पुणे आकाशवाणी तसेच विविध वर्तमान पत्र, चॅनल यांनी घेतल्यानंतर खऱ्या अर्थाने गावातील युवापिढीने स्पर्धा परीक्षा देण्यास सुरुवात केली. त्यातून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा देवून विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश संपादन केले. गावातील दोन हमाल आणि एक ड्रायव्हर यांच्या मुलांनी जिद्द, आत्मविश्वास व चिकाटीने इतिहास घडवत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. मोहन ज्ञानदेव गलांडे यांनी हमाली करून आपल्या मुलगी कू. पूजा हिला इन्कम टॅक्स ऑफिसर बनवले आहे, आप्पा सुखदेव शिंगटे यांनी देखील हमाली करून आपला मुलगा अक्षय याला इन्कमटॅक्स ऑफिसर बनवले आहे तसेच एक ड्रायव्हर म्हणून सोनाई दूध संघाच्या गाडीवरती काम करणारे विठ्ठल वाघमारे यांची कन्या अंजली ही देखील इन्कमटॅक्स ऑफिसर बनली आहे. कु. पूजा मोहन गलांडे, अक्षय आप्पा शिंगटे, अंजली विठ्ठल वाघमारे या तीनही नूतन अधिकाऱ्यांनी गलांडवाडी नंबर एक चे नाव मोठे केले असून आता ते देशसेवेसाठी सज्ज झाले आहेत. पूर्वी हे गाव उत्कृष्ट कबड्डी तसेच व्हॉलीबॉल खेळाडूंसाठी प्रसिद्ध होते. त्यानंतर व्यसनमुक्त युवक संघाचे संस्थापक बंडातात्या कराडकर यांचे संस्कार या गावावरती झाले.

जिल्ह्यात सर्वप्रथम छत्रपती संभाजी राजे यांचा पुतळा उभा करण्याचा बहुमान या गावाने पटकावला असून, त्यामुळे मुलांमध्ये छत्रपती बाणा रुजला आहे. आझादी बचाव आंदोलनाचे प्रणेते श्रद्धेय राजीवभाई दीक्षित यांचे देखील या गावावर खूप संस्कार आहेत. त्यामुळे आता हमाल, शेतमजुरांचे गाव हे अधिकाऱ्यांचे गाव म्हणून मान्यताप्राप्त झाले आहे. राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे, राष्ट्रीय सहकारी साखर महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, सोनाई दूध संघाचे संचालक प्रविण माने, कर्मयोगी कारखान्याचे उपाध्यक्ष भरत शहा, दूध गंगा दूध उत्पादक संघाचे अध्यक्ष उत्तमराव जाधव, इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव विधीज्ञ मनोहर चौधरी, युवा नेते दीपक जाधव, सामाजिक कार्यकर्ते सोमनाथ फलफले, भगवान महाडिक, योगेश गलांडे यांनी या नूतन अधिकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

# नीरा बाजारात कांद्याला विक्रमी भाव

## जवळच बाजारपेठ उपलब्ध झाल्यामुळे समाधान व्यक्त

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नीरा :** पुरंदर तालुक्यातील नीरा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य बाजारात शनिवारी झालेल्या लिलावामध्ये कांद्याला शेकडा ३,२६० असा विक्रमी भाव मिळाला आहे. शेतकऱ्यांना जवळच बाजारपेठ उपलब्ध झाल्यामुळे व चांगला भाव मिळाल्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे. तर नीरा कृषी उत्पन्न बाजार समितीच्यावतीने शेतकऱ्यांना दर शनिवारी नीरा येथे भरणाऱ्या लिलावाच्या वेळी आपला कांदा विक्रीस आणावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

गेली अनेक वर्षे बंद पडलेला नीरा येथील कांदा बाजार नीरा कृषी उत्पन्न बाजार समितीच्यावतीने पुन्हा सुरू करण्यात आला आहे. गेल्या वर्षी या बाजारात मोठ्या प्रमाणात कांद्याची विक्री झाली होती. यावर्षी देखील आता कांद्याची आवक नीरा कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सुरू झाली असून नीरा कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांना चांगला भाव मिळत आहे.

शनिवारी दुपारी एक वाजता नीरा कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये लिलाव पार पडले, यावेळी कांद्याला शेकडा ३,००० ते ३,२५० इतका भाव मिळाला, अशी माहिती नीरा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक विक्रम दगडे यांनी माध्यमांना दिली आहे. नीरा कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये २१० पिशवी कांद्याची आवक झाली होती.

### कांदा नायलॉनच्या पिशवीमध्ये आणू नका

● नीरा कृषी उत्पन्न बाजार समितीमधील व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांनी कांदा विक्रीसाठी आणताना तो नायलॉनच्या पिशवीमध्ये आणू नये असे आवाहन केले आहे. त्याऐवजी पारंपारिक सुतळीची नवीन पिशवी कांद्यासाठी वापरावी, असे आवाहन व्यापाऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे. तर सुतळीची पिशवी वापरल्याने कांदा चांगला राहतो, त्याची साल निघत नाही. त्यामुळे तो दिसायला चांगला दिसतो. याउलट नायलॉनच्या पिशवीमध्ये कांदा आणल्यास कांद्याची साल निघते त्यामुळे कांदा दिसायला खराब दिसतो परिणामी दरामध्ये फरक पडतो, असे व्यापाऱ्यांच्या वतीने सांगण्यात आले आहे.

### जामीनदार असलेल्या व्यक्तीच्या मालमत्तेवर ताबा

# विद्यार्थिनींचे सामान आले रस्त्यावर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** शहरातील एका पतसंस्थेच्या कर्जाला जामीनदार असलेल्या व्यक्तीच्या इमारतीचा ताबा घेण्याच्या प्रकरणात अनेक विद्यार्थिनींना अचानकच रस्त्यावर यावे लागले. शहरातील एका पंतसंस्थेच्या कर्ज प्रकरणास जामीनदार असलेल्या कर्जदाराच्या इमारतीचा ताबा घेण्याची प्रक्रिया बुधवारी (दि. १२) सकाळी सुरू झाली. या प्रकाराची माहिती या इमारतीत वास्तव्यास असलेल्या एका ॲकॅडमीच्या शंभराहून अधिक विद्यार्थिनींना नव्हती. अचानकच सामान खोलीतून काढण्यास प्रारंभ झाल्यानंतर तेथे गोंधळाचे वातावरण पसरले. अनेक विद्यार्थिनींना या प्रकाराने रडू कोसळले. विद्यार्थिनींचे सामान अक्षरशः रस्त्यावर आणून टाकण्यात आले.

या प्रकरणात मिळालेल्या माहितीनुसार, वर्षभरापूर्वी मुंबई उच्च न्यायालयात विहीत मुदतीत कर्जाची रक्कम भरतो, अशी ग्वाही संबंधित जामीनदाराने दिली होती, त्यानंतर न्यायालयाने ती मुदत टाकून जप्तीला स्थगिती दिली होती. मात्र, या मुदतीत ही रक्कम संबंधिताने भरली नाही. कालांतराने न्यायालयातून त्यांनी दावाही काढून घेतल्याने बुधवारी पतसंस्थेने कायदेशीररीत्या हा ताबा घेतला. ॲकॅडमीला संबंधित जामीनदाराने हा प्रकार का कळविला नाही? यामध्ये विद्यार्थिनींची काहीही चूक नसताना जो कमालीचा मनस्ताप झाला, त्याबद्दल पालकांनी संताप व्यक्त केला.

या वसतिगृहात इयत्ता बारावीच्या १२० विद्यार्थिनी होत्या, त्यांचा गुरुवारी (दि.१३) मराठीचा पेपर असल्याने मुलींच्या मनोधैर्यावरही याचा विपरीत परिणाम झाला. दरम्यान, ॲकॅडमी चालकांनी या विद्यार्थिनीची वास्तव्याची तात्पुरती सोय केली असून, एक दोन दिवसांत त्यांची नव्याने सोय करणार असल्याचे ॲकॅडमी चालकांनी सांगितले.

# रोहिंग्यांना जागा देणाऱ्यांवर कारवाई करा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती :** रांजणगाव औद्योगिक वसाहतीमध्ये मागील काही महिन्यांपूर्वी बांगलादेशी नागरिक मोठ्या प्रमाणामध्ये आढळले होते. ज्या ठिकाणी हे नागरिक काम करतात. असे काम देणाऱ्या नागरिकांवर, व त्यांना जागा विकत व भाड्याने देणाऱ्या मालकांवर कारवाई करावी, अशी मागणी विश्व हिंदू परिषद बजरंग दलाने रांजणगाव एमआयडीसी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे यांच्याकडे केली आहे

रांजणगाव एमआयडीसी परिसरामध्ये महाराष्ट्र राज्याबरोबर देशातील विविध प्रांतातील नागरिक या ठिकाणी राहत आहे त्याचबरोबर विदेशी नागरिक, रोहिंग्या हे देखील पंचक्रोशीत बेकायदेशीर रहात आणि काम करत आहेत. संबंधित नागरिकांकडून काही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी प्रशासन काम करतच आहे, मागील काही दिवसापूर्वी कारेगाव परिसरात पोलिसांनी बांगलादेशी नागरिक पकडले होते. या नागरिकांकडून देशाच्या सुरक्षेला बाधा ठरत असल्याचे देशभरात पहायला मिळत आहे. रांजणगाव औद्योगिक वसाहतीमध्ये आणि परिसरात विदेशी नागरिक रोहिंग्या हे हॉटेलमध्ये, कटिंग दुकानात, बांधकाम साईटवर, लेबर कॉन्ट्रॅक्ट इतर व्यवसायत कमी पगारात अनाधिकृतपणे याठिकाणी काम करत असल्याचे समजते आहे. तसेच है विदेशी नागरिक रोहिंग्यां पंचक्रोशीतील गावामध्ये वास्तव्यास आहेत भविष्यात काही अनुचित प्रकार घडला तर यासाठी जबाबदार कोण, असा प्रश्न उपस्थित होतो.

## निवेदन...

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



रांजणगाव गणपती | रांजणगाव एमआयडीसी पोलीस स्टेशनला निवेदन देताना बजरंग दलाचे पदाधिकारी.

### २५ रोजी सासवड येथील उपबाजारामध्ये होणार निवड

# नीरा बाजार समितीची निवडणूक प्रक्रिया जाहीर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नीरा :** नीरा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती आणि उपसभापती निवडीसाठी निवडणूक प्रक्रिया आता जाहीर करण्यात आली आहे. या संदर्भातील अधिसूचना जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था पुणे ग्रामीण यांच्यावतीने काढण्यात आली आहे.

यानुसार मंगळवारी (दि. 25) सासवड येथील उपबाजारामध्ये ही निवडणूक प्रक्रिया पार पाडणार आहे. त्यामुळे आता नीरा कृषी उत्पन्न बाजार समितीचा सभापती आणि उपसभापती कोण होणार, याकडे पुरंदर आणि बारामती येथील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

नीरा कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सध्या राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे संचालक मंडळ आहे. संचालक मंडळाची निवड ही राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार शरद पवार एकत्र असताना झाली होती.

यावेळी काँग्रेसचे ८ उमेदवार निवडून आले होते, तर राष्ट्रवादीचे १० उमेदवार निवडून आले होते. त्यामुळे अजित पवारांच्या नेतृत्वाखालील संचालक शरद जगताप यांना सभापती करण्यात आले होते. काँग्रेस आणि राष्ट्रवादीकडून कार्यकाळ वाटून घेण्यात आला होता. त्यामुळे सध्या तरी काँग्रेसचा सभापती होईल, असे म्हटले जात आहे. खरी स्पर्धा आहे ती उपसभापतिपदासाठी आहे.

नीरा कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सध्या महाविकास आघाडीचे प्राबल्य आहे. राष्ट्रवादीच्या फुटी नंतर अजित पवार यांच्याकडे सहा बाजार समितीचे संचालक आहेत. शरद पवार यांच्या राष्ट्रवादीकडे चार संचालक आहेत तर संजय जगताप यांच्याकडे आठ संचालक आहेत. एकंदरीत पाहता महाविकास आघाडीकडे एकूण १२ संचालक आहेत आणि त्यामुळे बाजार समितीच्या या निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीचे पारडे जड आहे.

### अजित पवारांविरोधात नाराजी?

● विधानसभेच्या निवडणुकीमध्ये अजित पवार यांनी ऐनवेळी संभाजी झेंडे यांना उमेदवारी देऊन संजय जगताप यांच्या विजयामध्ये अडचण निर्माण केली. अजित पवार यांनी संजय जगताप यांच्या विजयचा रथ दिवे घाटाच्या खालीच अडवला. त्यामुळे आता या सभापतिपदाच्या निवडणुकीमध्ये काँग्रेसकडून अजित पवार गटाला महत्त्व दिले जाईल का? हे देखील पाहणे महत्त्वाचे आहे. काँग्रेसमधून अजित पवार यांच्या विरोधात नाराजी असल्याचे पाहायला मिळते आहे. जर काँग्रेस आणि शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र आले तर अजित पवार यांचा उपसभापती होऊ शकणार नाही. त्यामुळे अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अस्वस्थता दिसून येत आहे. मात्र, असे असले तरी संजय जगताप अजित पवारांना वाकड्यात चालणार नाहीत, असे देखील काही संचालकांकडून बोलले जात आहे.

### यांची नावे चर्चेत?

● या वेळच्या सभापती पदाच्या निवडणुकीमध्ये हे सभापतिपद हे काँग्रेसकडे असणार हे निश्चित आहे. त्यामुळे काँग्रेसमधून सभापतिपदासाठी संदीप फडतरे, देविदास कामथे, अशोक निगडे यांची नावे पुढे येत आहेत. तर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून बाळासाहेब शिंदे, शरयू वाबळे यांची नावे आघाडीवर आहेत. शरद पवार गटाकडून देखील गणेश फुले यांचे नाव चर्चेत आहे. त्यामुळे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत उपसभापतिपदाच्या निवडीत चुरस निर्माण झाली आहे.

#रा

» Selected

## धामणी येथे कुस्त्या उत्साहात



धामणी (ता. आंबेगाव ) येथील कुस्तीच्या आखाड्यातील एक चित्तथरारक क्षण.

**लोणी-धामणी :** धामणी (ता. आंबेगाव ) येथे श्री म्हाळसाकांत खंडोबा यात्रेनिमित्त कुस्त्यांचा जंगी आखाडा भरविण्यात आला. या आखाड्यात १०१ ते ५००१ रुपयांपर्यंत पैलवानांना बक्षिसे देण्यात आली. या आखाड्यात मावळ, मुळशी, खेड, जुन्नर, शिरूर, पारनेर, भोसरी, संगमनेर, श्रीगोंदा येथील नामवंत पैलवानांनी हजेरी लावली. सुनिल दादा जाधव, भरत तांबे, शरद जाधव, संजीव गाढवे यांनी पंच म्हणून काम पाहिले. सरपंच रेश्मा बोऱ्हाडे, उपसरपंच अक्षय विधाटे, ग्रामपंचायत सदस्य सुरेखा रोडे, प्रतिक जाधव, डॉ. अशोक पगारीमा, माजी सरपंच सागर जाधव, अंकूश भूमकर, पहाडदऱ्याचे सरपंच मच्छिंद्र वाघ, ज्ञानेश्वर विधाटे, बापूसाहेब काचोळे, भगवान वाघ, वामन जाधव, रामदास जाधव, किसन वाघ, अविनाश बढेकर, अजित बोऱ्हाडे व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी महिला पैलवानांनी सुद्धा आखाड्यात आपली झलक दाखविली. यावेळी राष्ट्रीय ग्रामिण शिक्षण संस्थेच्या संचालिका पूर्वा दिलीप वळसे पाटील व भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे माजी चेअरमन देवदत निकम व संचालिका पुष्पलता जाधव यांनी आवर्जून कुस्ती आखाड्याला भेट दिली.

## चाकूने वार करून खून; विहिरीच्या पाण्यावरून वाद



**जेजुरी :** पुरंदर तालुक्यातील जेजुरी पोलीस स्टेशन हद्दीतील आंबळे जवळील जगताप वस्तीवर शेतातील विहिरीच्या पाण्याच्या पाळीवरून वाद होवून एका शेतकऱ्याचा चाकूने वार करून खून केल्याची घटना घडली असल्याचे जेजुरी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक वाकचौरे यांनी सांगितले. या घटनेत अविनाश मल्हारी जगताप (४०) यांचा खून झाला असून, आरोपी बाळूदास काळूराम जगताप (५५, रा. आंबळे ता पुरंदर) याला जेजुरी पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, आंबळे हद्दीतील जगताप वस्ती येथे अविनाश मल्हारी जगताप यांची गट क्रमांक ८४८ मध्ये शेतजमीन आहे. शनिवारी सकाळी या शेतीतील विहिरी मधील पाण्याच्या पाळीवरून वाद होवून आरोपी काळूदास याने चाकू काढून अविनाश जगताप यांच्यावर ४ ते ५ वार केले. यात अविनाश जगताप यांचा मृत्यू झाला. तसेच यावेळी या ठिकाणी उपस्थित असणारे अविनाश जगताप यांचे वडील मल्हारी जगताप, गणेश जगताप यांच्यावर आरोपीने चाकूने वार करून दोघांना गंभीर जखमी केले, अशी फिर्याद सौरभ दत्तात्रय जगताप यांनी जेजुरी पोलीस स्टेशन मध्ये दिली. पोलिसांनी तातडीने आरोपीला जेरबंद केले. जेजुरी पोलिसांनी आरोपी काळूदास जगताप यांच्या विरोधात खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.

# लोणी मॅरेथॉन मोठ्या उत्साहात साजरी

## पुनीत बालन ग्रुप प्रस्तुत, फ्री रनर्स ग्रुप आयोजित भव्य स्पर्धा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**लोणी-धामणी :** लोणी (ता. आंबेगाव) येथे पुनीत बालन ग्रुप प्रस्तुत फ्री रनर्स ग्रुप आयोजित आणि माजी विद्यार्थी विकास प्रबोधिनी लोणी संचलित भव्य मॅरेथॉन स्पर्धा संपन्न झाली.स्पर्धेचे हे तिसरे वर्ष होते. तीन किमी, पाच किमी दहा किमी आणि २१ किमी अशा चार प्रकारात ही स्पर्धा पार पडली. पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात पार पडलेली ही भव्य दिव्य स्पर्धा बहुतेक जिल्ह्यात पहिली असावी. या स्पर्धेसाठी साधारणपणे साडेतीन हजार स्पर्धकांनी आपला सहभाग नोंदवला. विशेष म्हणजे इथिओपिया या देशातील दोन स्पर्धक या स्पर्धे करता सहभागी झाले होते.

राजस्थान,हरियाणा,उत्तर प्रदेश या राज्यातील देखील स्पर्धक या स्पर्धेत सहभागी झाले होते. तसेच महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमधून स्पर्धेत स्पर्धक सहभागी झाले होते. पुनीत बालन ग्रुप पुणे,फ्री रनर्स पुणे आणि माजी विद्यार्थी विकास प्रबोधिनी,लोणी हे या स्पर्धेचे प्रायोजक होते. प्रत्येक सहभागी स्पर्धकाला टी-शर्ट, मेडल आणि प्रशस्तीपत्र देण्यात आले. बाहेरून येणाऱ्या स्पर्धकांसाठी राहण्याची व्यवस्था शाळेमध्ये माजी विद्यार्थी विकास प्रबोधिनीने केलेली होती. माणिकचंद ऑक्झरीच यांच्या वतीने सर्व स्पर्धकांना मोफत पाण्याची व्यवस्था करण्यात आली.

२२ किलोमीटर मॅरेथॉन स्पर्धेची सुरुवात सकाळी ५ वाजून ५५ मिनिटांनी करण्यात आली. त्यानंतर क्रमाक्रमाने इतर स्पर्धेतील स्पर्धकांना सोडण्यात आले. लहान मुलांपासून ९० वर्षाच्या वयोवृद्धापर्यंतच्या सर्व गटातील लोकांनी आकर्षक वेशभूषा करूनही सहभाग नोंदवला. स्पर्धकांचा तणाव हलका करण्यासाठी झुंबा नृत्याच्या माध्यमातून व्यायाम प्रकार करून घेण्यात आले. स्पर्धकांना प्रोत्साहन देण्यासाठी मराठी मालिका अभिनेते हार्दिक जोशी हे देखील आवर्जून उपस्थित होते. याप्रसंगी त्यांच्या गाजलेल्या "तुझ्यात जीव रंगला" या मालिकेतील संवादही त्यांनी प्रेक्षकांना म्हणून दाखवला.

बक्षीस वितरणासाठी माजी महसूल मंत्री आणि विधिमंडळातील ज्येष्ठ सदस्य दिलीप वळसे पाटील उपस्थित होते. त्यांच्यासमवेत गुजरात भाजपचे ज्येष्ठ नेते अतुल ब्रह्मभट आणि पुणे जिल्हा भाजपचे ज्येष्ठ नेते ताराचंद कराळे हे देखील उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते स्पर्धेतील सर्व विजेत्यांना रोख बक्षीस देण्यात आले. या कार्यक्रमासाठी निरंकार आर्ट्स पुणे, जनकल्याण पतसंस्था लोणी आणि आदित्य कन्स्ट्रक्शन पुणे यांच्यासह काही मान्यवरांनी अर्थसाह्य केले. स्पर्धेचे मुख्य स्पर्धा संयोजक राजेश वाळुंज यांनी नियोजनाची धुरा सांभाळली. यावेळी प्रबोधिनीचे अध्यक्ष उदयसिंह वाळुंज, खजिनदार बाळासाहेब गायकवाड तसेच मंत्रालयातील सहसचिव कैलास गायकवाड, सरपंच सावळाभाऊ नाईक, राष्ट्रपती पदक विजेते पोलीस अधिकारी किसन गायकवाड, मयूर लोखंडे, नवनीत सिनलकर, पांडुरंग वाळुंज, संतोष पडवळ, अविनाश वाळुंज, प्रकाश वाळुंज हे प्रबोधिनीचे सदस्य उपस्थित होते.

राष्ट्रप्रेमी युवक मंडळ लोणी तसेच लोणी गावातील विविध युवक मंडळांनी पूर्ण सहकार्य केले. अरुण साकोरे आणि पडवळ अकॅडमी यांनी देखील मोलाचे सहकार्य केले. या स्पर्धेसाठी विविध तालुक्यातील जवळपास ५० शाळांमधील विद्यार्थ्यांनी सहभागी नोंदवला. याप्रसंगी आंबेगाव तालुक्यातील विविध पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. तसेच पंचक्रोशीतील सर्व सरपंचांचा सन्मान करण्यात आला. यावेळी धामणी प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉ. बिरारी, लोणी गावातील डॉ. चंद्रकांत देशमुख, डॉ. रसिक काळे, डॉ. भास्कर भोसले, डॉ. संजय सिनलकर यांनी वैद्यकीय विभागाची जबाबदारी सांभाळली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.अविनाश वाळुंज आणि ऋतुजा इंगळे यांनी केले.

> ही मॅरेथॉन स्पर्धा लोणी गावाच्या लौकिकात आणि वैभवात भर घालणारी असून या स्पर्धेला आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त करून देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू तसेच या संदर्भात कोणत्याही अडचणी आल्या तर त्या सोडवण्यासाठी पूर्ण मदत केली जाईल.
>
> -दिलीप वळसे पाटील, माजी मंत्री

### विजयी स्पर्धक

**२१ किलोमीटर पुरुष**
- १. तुषार शिवाजी भिणारे नाशिक
- २. चैतन्य रुपनेकर सांगली
- ३. रसा अमन मोहम्मद इथोपिया

**२१ किलोमीटर महिला**
- १. राणी मुसंडे सांगली
- २. शीतल तांबे
- ३. ऐश्वर्या खरडकर

**१० किलोमीटर पुरुष**
- १. सुमंत तारकेश्वर
- २. मानो कुमार
- ३. अमोल अमुणे

**१० किलोमीटर महिला**
- १. दीक्षा भारसे नाशिक
- २. साक्षी भंडारे, आळकुटी
- ३. कीर्ती तांबे

**५ किलोमीटर पुरुष**
- १. करण हनुमंत वागळे
- २. गोरख विठोबा वावरे
- ३. आयन कदीर पठाण

**५ किलोमीटर महिला**
- १. साक्षी बोराटे
- २. नीतू सेन
- ३. पवन आंबट

**५ किलोमीटर मुले**
- १. अभिनंदन सूर्यवंशी
- २. दुर्गेश अहिरे
- ३. अजय आग्रा

### प्रमुख उपस्थिती...

- लोणी गावचे सरपंच सावळेराम नाईक, शरद सहकारी बँकेचे संचालक अशोक आदक पाटील, पुनीत बालन ग्रुपचे सदस्य चेतन लोखंडे, जनकल्याण पतसंस्थेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर वाळुंज पाटील, उपसरपंच स्वाती वाळुंज, माजी सरपंच उद्धव लंके, दिलीप वाळुंज, माजी उपसरपंच प्रकाश गायकवाड आणि सर्व ग्रामपंचायत सदस्य.

## आसखेड येथील घटना; २ जणांना अटक

# पत्नीशी अनैतिक संबंधाच्या संशयातून मेहुण्याचा खून

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चाकण :** खेड तालुक्यातील आसखेड येथे एका ४४ वर्षीय व्यक्तीचा खून करण्यात आला. पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह ओढ्यात नेऊन डोक्यात मोठा दगड घालण्यात आला. पोलिसांनी काही तांत्रिक तपासाच्या आधारे खून झालेल्या व्यक्तीच्या मेहुण्यासह दोघांना अटक केली आहे. पत्नीशी अनैतिक संबंध असल्याचा संशयातून मेहुण्याचा खून करण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.



आसखेड (ता. खेड) येथील खून प्रकरणी पोलिसांनी ताब्यात घेतलेले आरोपी. (छाया : अविनाश दुधवडे, चाकण)

अर्जुन गबाजी कावडे (वय ४४, सध्या रा. सगर कुटी संघ, ७ बंगला, अंधेरी वेस्ट, मुंबई, मुळ रा. कोळीये ता. खेड जि. पुणे) असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. या प्रकरणी पोलिसांनी मृत अर्जुनचा मेव्हणा गणेश धनाजी काळुंखे (वय ४०, रा. मुंबई) त्याचा मावस भाऊ विकास शांताराम मोदळे (वय ३०, रा. मालवणी, मुंबई ) अशा दोघांना अटक करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी आसखेड खुर्द (ता. खेड) गावच्या हददीतील चाकण वांद्रा रोडपासून कॅनॉल नजिक ओढ्यामध्ये अर्जुन कावडे याचा मृतदेह मिळून आला होता. कावडे यास मारहाण करुन त्यास ओढ्यामध्ये नेवून पुरावा नष्ट करण्याचे उददेशाने त्याचे चेह-यावर मोठा दगड घालून त्यांचा खुन करण्यात आला होता. महाळुंगे एमआयडीसी पोलिसांत या प्रकरणी खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचा समांतर तपास गुन्हे शाखा युनिट ३ यांच्याकडून सुरु होता. गुन्हे शाखेचे एक तपास पथक मुंबई येथे तपासकामी पाठवून व दुसरे तपास पथकाने खून झालेल्या अर्जुन याच्या गावामध्ये चौकशी करुन तपास केला. मुंबई येथे मिळुन आलेले सीसीटीव्ही फुटेज तपासुन सदर मृत्यू झालेल्या अर्जुनचा मेव्हणा गणेश काळुंखे याच्याकडे कसून चौकशी केली असता, सदरचा गुन्हा उघडकीस आला आहे. खून झालेल्या अर्जुन कावडे याचे संशयित आरोपी मेहुणा गणेश काळोखे याचे पत्नी सोबत अनैतिक संबंध होते.

## श्रीजानाईदेवी प्राणप्रतिष्ठापना सोहळ्याला प्रारंभ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या जेजुरीच्या खंडोबा देवाच्या जेजुरी नगरी ग्राम दैवता व श्रद्धास्थान जानाई देवी मंदिराची वास्तूशांत, नूतन मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना व कलशारोहण सोहळ्याला रविवार पासून सुरुवात झाली. जानाई देवीची नूतन मूर्ती आठ दिवस श्री खंडोबा पालखी सोहळा व ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष जालिंदर खोमणे यांच्या विहिरीतील पाण्यात ठेवण्यात आली होती.

आज सकाळी ही मूर्ती पाण्यातून काढून देवीला जलाभिषेक, दुग्धभिषेक करण्यात आला. त्यानंतर विधिवत पूजा व धार्मिक उपक्रम करून जाणाई देवीची मूर्ती शहरातील जाणाई मंदिरात आणण्यात आली. आज सायंकाळी शहरातून मिरवणूक काढून पाच दिवस धार्मिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी जानाई देवी मंदिर ट्रस्टचे सुधीर गोडसे, गणेश आगलावे, ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष जालिंदर खोमणे, कृष्णा कुदळे, तसेच गणेश गाढवे, छबन कुदळे, सतीश घाडगे, संदीप कुतवळ, देवसंस्थानचे विश्वस्त मंगेश घोणे आदी उपस्थित होते.

## सत्यशील शेरकर यांच्यासह दिग्गजांनी भरले उमेदवारी अर्ज

# विघ्नहरच्या निवडणुकीत ६८ अर्ज दाखल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



विघ्नहरच्या निवडणुकी दरम्यान सत्यशील शेरकर यांच्या पॅनलच्या २१ उमेदवारांनी अर्ज दाखल केले. यावेळी भाजप नेत्या आशाताई बुचके, बाजार समिती सभापती संजय काळे आदी उपस्थित होते. (छाया - सुरेश वाणी)

**नारायणगाव :** विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे होऊ घातलेल्या संचालक मंडळाच्या निवडणुकीदरम्यान उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या दिवशी संचालकांच्या २१ जागांसाठी ६८ उमेदवारी अर्ज दाखल झाले असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी गोविंद शिंदे यांनी दिली.

ते म्हणाले की, उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी ४६ अर्ज दाखल झाले. यामध्ये जुन्नर गटातील तीन जागांसाठी पाच उमेदवार दाखल झाले आहेत. यात देवराम लांडे, शिवम घोलप, अशोक घोलप, अविनाश पुंडे, देवेंद्र खिल्लारी यांच्या नावांचा समावेश आहे. तसेच शिरोली गटामधून तीन जागांसाठी दहा अर्ज दाखल झाले आहेत. यामध्ये विघ्नहरचे अध्यक्ष सत्यशील शेरकर यांनी तीन अर्ज दाखल केले आहेत. या गटामध्ये जालिंदर ढोमसे, प्रमोद खांडगे, विठ्ठल कदम, रहमान इनामदा, संतोष खैरे व सुधीर खोकराळे आणि प्रवीण ढेरे यांचा समावेश आहे.

ओतूर गटातील चार जागांसाठी सहा उमेदवार अर्ज दाखल झाले आहेत. संजय शेटे धनंजय डुंबरे, बाळासाहेब घुले, पंकज वामन, रामदास वेठेकर व मधुकर यंदे यांचा समावेश आहे. पिंपळवाडी गटामध्ये तीन जागांसाठी १७ जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. यामध्ये अंबादास हांडे, संभाजी पोखरकर, धनंजय लेंडे, संजय भुजबळ, मंगेश हांडे, प्रकाश डावखर, नंदकुमार हांडे, रमेश हांडे, बबन गुंजाळ, शरद चौधरी, अशोक हांडे, माणिक हांडे, विवेक काकडे, विलास दांगट, प्रकाश जाधव, जयवंत घोडके व नामदेव शिंदे यांचा समावेश आहे. घोडेगाव गटातील तीन जागांसाठी सहा उमेदवार अर्ज दाखल झाले आहेत. येथे नामदेव पोखरकर,मार्तंड टावरे, दत्तात्रय निघोट, यशराज काळे, नामदेव थोरात व दत्तात्रय थोरात यांच्या नावांचा समावेश आहे. अनुसूचित जाती जमाती गटामध्ये एका जागेसाठी देवराम लांडे, विलास रावते, प्रकाश सरोगदे, व चंद्रकांत तळपे यांनी उमेदवारी अर्ज दाखल आहेत. महिला राखीव प्रतिनिधी गटाच्या एका जागेसाठी पाच अर्ज दाखल झाले आहेत. यामध्ये सविता शिंदे,सुरेखा गांजाळे, नीलम तांबे, पल्लवी डोके,संगीता घोडके या नावांचा समावेश आहे. इतर मागासवर्गीय प्रतिनिधी गटामधून एका जागेसाठी तब्बल १२ अर्ज दाखल झाले आहेत. यामध्ये विजयकुमार आहेर, निलेश भुजबळ, भगवान घोलप, बाळासाहेब नलावडे, गणेश भुजबळ, गंगाराम लोखंडे, हर्षद हांडे, रमेश हांडे, रहमान इनामदार, रमेश भुजबळ, सुरेश गडगे, हेमंत कोल्हे या नावाचा समावेश आहे. भटक्या विमुक्त जाती व जमाती विशेष मागास प्रवर्गातील गटामधून एका जागेसाठी तीन अर्ज दाखल झाले आहेत. यामध्ये बाबाजी लोखंडे, संजय खेडकर शंकर साळवे यांच्या नावाचा समावेश आहे.

शेरकर यांच्या अर्जावेळी भाजप नेत्या आशाताई बुचके, जुन्नर बाजार समितीचे सभापती संजय काळे, कृषी विज्ञान केंद्राचे अध्यक्ष अनिल मेहेर या वेळी उपस्थित होते. सत्यशील शेरकर यांनी विघ्नहर कारखाना उत्तमरित्या चालविला असून सभासदांना चांगला न्याय देण्याचे काम त्यांच्याकडून होत आहे तसेच उसाला देखील चांगला बाजारभाव मिळत असल्याने आमचा सत्यशील शेरकर यांच्या पॅनेलला पाठिंबा असल्याचे आशाताई बुचके व संजय काळे यांनी सांगितले.

# कांदा, बटाट्याच्या आवकेत मोठी वाढ; एकूण उलाढाल ६ कोटी ९० लाख रुपये

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चाकण :** खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्ड मध्ये कांदा, बटाटा व टोमॅटोची मोठी आवक झाली. भुईमूग शेंगा व लसणाच्या भावात मोठी वाढ झाली. तसेच पालेभाज्यांची भरपूर आवक झाल्याने पालेभाज्यांच्या दरात घसरण झाली. एकूण उलाढाल ६ कोटी, ९० लाख रुपये झाली.

चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक ८,००० क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक ३,५०० क्विंटलने वाढून भावात ५०० रुपयांची उच्चांकी वाढ झाली. कांद्याचा कमाल भाव ३,००० रुपयांवरून ३ हजार ५०० रुपयांवर पोहोचला. बटाट्याची एकूण आवक १,६०० क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक १०० क्विंटलने वाढली मात्र भाव स्थिर राहिले. लसणाची एकूण आवक २५ क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक स्थिर राहून भावात एक हजार रुपयांची मोठी वाढ झाली. हिरव्या मिरचीची एकूण आवक ३२० क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला ३ हजार रुपयांपासून ते ४ हजार ५०० रुपयांपर्यंत भाव मिळाला. ओल्या भुईमुग शेंगांची एकूण आवक ३ क्विंटल झाली असून, या शेंगांना १० हजार रुपयापर्यंत कमाल भाव मिळाला.



चाकण बाजारात कांद्याची झालेली आवक. ( छाया : अविनाश दुधवडे, चाकण)

### शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढीलप्रमाणे :

- कांदा - एकूण आवक - ८,००० क्विंटल. भाव क्रमांक - १. ३,५०० रुपये, भाव क्रमांक २. २,००० रुपये, भाव क्रमांक ३. १,००० रुपये. बटाटा - एकूण आवक - १,६०० क्विंटल. भाव क्रमांक १. २,००० रुपये, भाव क्रमांक २. १,३०० रुपये, भाव क्रमांक ३. १,५०० रुपये.

**फळभाज्या :** फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक क्विंटलमध्ये व प्रतीदहा किलोंसाठी मालाला मिळालेले भाव कंसात पुढील प्रमाणे : टोमॅटो - ३७० क्विंटल ( ५०० ते १,००० रू. ), कोबी - २५५ क्विंटल ( ४०० ते ६०० रू.), फ्लॉवर - २४५ क्विंटल ( ६०० ते ९०० रु.), वांगी - ९० क्विंटल ( १,००० ते २,००० रु.), भेंडी - ८६ क्विंटल ( २,००० ते ४,००० रु.), दोडका - ६३ क्विंटल ( ३,००० ते ४,००० रु.), कारली - ७० क्विंटल ( २,५०० ते ३,५०० रु.), दुधीभोपळा - ६४ क्विंटल ( १,००० ते २,००० रु.), काकडी - १०४ क्विंटल ( १,००० ते २,००० रु.), फरशी - ६० क्विंटल ( २,००० ते ३,००० रु.), वालवड - ६२ क्विंटल ( २,००० ते ५,००० रुपये), ढोबळी मिरची - १७८ क्विंटल ( २,००० ते ४,००० रु.), चवळी - २८ क्विंटल ( २,००० ते ३,००० रु.), शेवगा - ३० क्विंटल ( ५,००० ते ६,००० रु.), गाजर - २४५ क्विंटल ( १,५०० ते २,००० रु.), गवार - ६६ क्विंटल ( ५,००० ते ७,००० ), वाटाणा - ५३० क्विंटल ( २,४०० ते २,७००), आले - १८५ क्विंटल ( २,००० ते ४,००० ).,



**पालेभाज्या :** चाकण येथील बाजारात पालेभाज्यांची एकूण आवक जुड्यांमध्ये व भाज्यांना मिळालेले भाव पुढीलप्रमाणे : मेथी - एकूण २३ हजार २५० जुड्या ( ६०० ते ८०० रुपये ), कोथिंबीर - एकूण २६ हजार ५०० जुड्या ( ६०० ते १,००० रुपये,), शेपू - एकूण ३ हजार ६०० जुड्या ( ५०० ते ९०० रुपये ), पालक - एकूण ३ हजार ४५० जुड्या ( ४०० ते ६०० रुपये)

**जनावरे :** चाकण येथील जनावरांच्या बाजारात विक्रीसाठी आलेल्या ४० जर्शी गाईपैकी २८ गाईची विक्री झाली.( १०,००० ते ४०,००० रु.), १०५ बैलांपैकी ७५ बैलांची विक्री झाली.( १०,००० ते ४०,००० रु.), १२० म्हशीपैकी ८५ म्हशींची विक्री झाली.( २०,००० ते ८०,००० रु.), ९ हजार १३० शेळ्या - मेंढ्यापैकी झाल्या ८,३३० शेळ्यांची विक्री झाली. ( २,००० ते १५,००० रु.),.






## विस्तार असावा असा

*विस्तार असा असावा*
*डोळे भारुन टाकणारा*

*शून्यातून निर्माण*
*होऊन*
*आभाळभर पसरणारा*

*असंख्य शाखांचा*
*डोलारा*
*मुळांनी हलके तोलावा*

*भक्कम आधार बनून*
*खोडाने पसारा सावरावा*

## इंग्रजी बोलण्यात दिल्लीकर आघाडीवर!

इंग्रजी बोला म्हटले, की आपली घाबरगुंडी होते किंवा मला इंग्रजी समजते; पण बोलता येत नाही, असाच काहीसा सूर असतो. त्यातही महानगर किंवा मेट्रो सिटीमध्ये इंग्रजी बोलण्याचे प्रमाण वाढले आहे. कॉर्पोरेट कंपन्यांमध्येही इंग्रजीत संभाषण ही सर्वसाधारण बाब झाल्याचे पाहायला मिळत आहे. इंग्रजी माध्यमांच्या शाळांचेही प्रमाण वाढले असून सध्याच्या पालकांची लहानपणापासूनच आपल्या मुलांना स्पष्ट आणि अस्खलित इंग्रजी बोलता यावे अशी इच्छा दिसून येते. त्यामुळे इंग्रजी माध्यमांच्या शाळेत पाल्यांना पाठवण्यात येत असल्याचे दिसते.

जगभरात सध्या इंग्रजी भाषेला अधिक महत्त्व आहे. कारण इंग्रजी ही आंतरराष्ट्रीय भाषा मानली जाते; मात्र अनेक देशांमध्ये इंग्रजीला अधिक महत्त्व न देता त्यांच्या राष्ट्रीय भाषेतच व्यवहार आणि अभ्यासक्रम आहेत. भारतात सद्यस्थितीत हिंदी, संस्कृतनंतर सर्वाधिक बोलली जाणारी भाषा इंग्रजी बनली आहे.




जगभरातील देशांचा विचार केल्यास भारत हा इंग्रजी भाषा बोलण्यात जागतिक सरासरीपेक्षा पुढे आहे. भारतात सर्वाधिक इंग्रजी बोलले जाणारे शहर हे दिल्ली आहे. दिल्लीनंतर राजस्थान आणि पंजाबमध्ये सर्वाधिक अस्खलित इंग्रजी बोलली जात असल्याचे एका सर्वेक्षणातून समोर आले. पियरसनच्या ग्लोबल इंग्लिश प्रोफिशिएन्सी अहवालानुसार ही माहिती समोर आली आहे. दिल्लीला इंग्रजी बोलण्यात ६३ गुण मिळाले असून राजस्थान ६० तर पंजाबला ५८ गुण मिळाले आहेत.

जगभरातील देशांमध्ये ब्रिटन म्हणजे इंग्लंडमध्ये इंग्रजी बोलणारे ९८.३ टक्के लोक आहेत. अमेरिकेत ९५ टक्के नागरिक इंग्रजीत संवाद साधतात. वर्ल्ड ऑफ स्टॅटिक्सच्या डेटानुसार सर्वाधिक इंग्रजी जिब्राल्टर लोक बोलतात. येथील १०० टक्के नागरिक अस्खलित इंग्रजी बोलतात; मात्र येथील लोकसंख्या केवळ ३२,६६९ एवढी आहे. तर, भारतात केवळ २० टक्के नागरिक अस्खलित इंग्रजी बोलतात; पण लोकसंख्येच्या दृष्टीने विचार केल्यास भारत इंग्रजी बोलणाऱ्या प्रमुख पाच देशांपैकी आहे. दरम्यान, चीनमध्ये सर्वात कमी इंग्रजी भाषा बोलली जाते. चीनमध्ये केवळ ०.९ टक्के लोक इंग्रजी बोलतात. येथील नागरिक चीनी भाषेचा सर्वाधिक वापर करतात. चीनमध्ये चीनी, मंगोलियाई, तिब्बती, उइघुर आणि झुआंग भाषा बोलल्या जातात.

## पोलिसाशी गैरवर्तन पडले महाग!

इंदूरच्या राजेंद्रनगर पोलिसांनी एक अनोखे पाऊल उचलत पोलिस कर्मचाऱ्यांशी गैरवर्तन करणाऱ्या आणि मारहाण करणाऱ्या हल्लेखोरांची धिंड काढली. ढोल-ताशांसह ही धिंड काढण्यात आली. नशेत असलेल्या आरोपींना रोखण्यासाठी पोलीस घटनास्थळी पोहोचल्यावर त्यांनी पोलिसांशी झटापट केली. आरोपींनी गैरवर्तन करत पोलिसांना मारहाण केली. हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. घटनेची गंभीर दखल घेत पोलिसांनी आरोपींना अटक करून धिंड काढली.




यावेळी परिसरातील नागरिकांनी पोलिसांवर पुष्पवृष्टी करून त्यांचे आभार मानले. राजेंद्रनगर पोलिस स्टेशनचे प्रभारी नीरज बिरथरे यांनी सांगितले, की दोन दिवसांपूर्वी आरोपी शुभम डांगी याने मित्रांसोबत वाढदिवसाची पार्टी साजरी करत असताना गोंधळ घातला होता. त्यामुळे सर्वसामान्यांचे हाल होत होते. माहिती मिळताच बीआयटीचे जवान तेथे पोहोचले. त्यांच्यासोबत आरोपींनी गैरवर्तन केले. सरकारी कामात अडथळा आणला. सरकारी मालमत्तेचे नुकसान केले आणि जवानांना मारहाण केली.

आरोपींची ओळख पटली असून सात आरोपींना अटक करण्यात आली. इंदूर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एका आरोपीकडून एक अवैध पिस्तूल आणि जिवंत काडतुसेही जप्त करण्यात आली.

## जगाला विनाशापासून वाचवण्यासाठी गाईची निर्मिती

जगाच्या विनाशाबद्दल लोक अनेक वर्षांपासून चर्चा करत आहेत. पृथ्वीच्या नाशाची वेगवेगळी कारणे लोक देतात. शास्त्रज्ञांचा असा विश्वास आहे, की पृथ्वीवर ज्या प्रकारे हवामान बदल होत आहेत, त्यामुळे आजपासून शेकडो वर्षांनी पृथ्वीवर जगणे कठीण होईल. या संदर्भात शास्त्रज्ञ गायीला पृथ्वीवरील हवामान बदलाचे एक कारण मानतात. याबाबत आता शास्त्रज्ञांनी जगाला विनाशापासून सावध करण्यासाठी एक अनोखी गाय तयार केली आहे.



गाईच्या दंशातून विषारी मिथेन वायू बाहेर पडतो, हा हरितगृह वायू आहे, जो पृथ्वीला तापवण्याचे सर्वात मोठे कारण मानले जाते. त्यामुळे पृथ्वी सतत गरम होत आहे. अशा स्थितीत स्कॉटलंडच्या शास्त्रज्ञांनी अशी गाय विकसित केली आहे, जी फार कमी वेळा ढेकर देईल आणि मिथेन वायू फारच कमी सोडेल. यामुळे जगात विनाश घडवून आणणारा काळ वाढवण्याचा प्रयत्न केला जाईल.

गायीचे वासरू भविष्यात जगाला विनाशापासून वाचवेल, अशी चर्चा आहे. अशा आणखी बछड्यांमध्ये बदल करण्याचा शास्त्रज्ञ विचार करत आहेत. हिल्डा नावाच्या या वासराला ग्रीन हाऊस इफेक्टविरोधी म्हटले जात आहे. एकीकडे जगभरातील गायी मिथेन वायूने पर्यावरणाची हानी करत असताना, हे वासरू हरितगृह परिणाम कमी करण्यास मदत करत आहे.

शास्त्रज्ञ अशा बदलांचा विचार करत आहेत, की त्यातून उत्सर्जित होणारा वायू पूर्णपणे शून्य होतो. जगाच्या हरितगृह वायू उत्सर्जनांपैकी सुमारे पाच टक्के गुरे तयार करतात, म्हणून संशोधक त्यांचा प्रभाव कमी करण्याचे मार्ग शोधण्यात व्यस्त होते. त्याअंतर्गत हिल्डा विकसित करण्यात आली.

## एकाचवेळी खाल्ली आठ किलो बिर्याणी!



समजा तुम्हाला खूप भूक लागली आहे आणि कोणीतरी तुमच्यासाठी गरमागरम बिर्याणी आणून तुमच्यासमोर ठेवली तर तुम्ही काय कराल? तुम्ही लगेच खाणार हे उघड आहे; पण तुम्ही एकाच वेळी किती बिर्याणी खाऊ शकता? अर्धा किलो, फारतर एक किलो! परंतु सोशल मीडियावर व्हायरल होत असलेला व्हिडीओ पाहिल्यानंतर मोठमोठे खादाडही गुडघे टेकतील. कारण व्हायरल झालेल्या व्हिडीओमध्ये एक व्यक्ती संपूर्ण आठ किलो बिर्याणी एकटाच खाताना दिसत आहे. या बिर्याणीमध्ये मटणाचाही समावेश असतो आणि व्यक्ती मटणाचा प्रत्येक तुकडा खाते. हा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. व्हिडीओमध्ये एक व्यक्ती हैदराबादी बिर्याणीचा आस्वाद घेतानाच दिसत नाही, तर अनेक वर्षांपासून त्याला कोणीही खायला दिले नसल्यासारखे अधाशीपणे खाताना दिसत आहे. ती व्यक्ती संपूर्ण आठ किलो बिर्याणी एकाच वेळी खातो.

या मुलाने कॅमेऱ्यासमोर एकट्याने संपूर्ण बिर्याणी खाल्ली आणि नंतर त्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला. व्हिडिओ पाहून लोक आश्चर्यचकित झाले. वापरकर्ते म्हणाले, की हा माणूस असू शकत नाही. सोशल मीडिया यूजरने लिहिले, हा रोबोट माणसाच्या रूपात कोणी पाठवला आहे का?

## अनोखं कुंड

भारतासह जगभरातच अनेक रहस्यमय कुंडं आहेत. काही कुंडांमधलं पाणी गरम असतं तर काही कुंडांमध्ये स्नान केल्याने त्वचारोग बरे होतात असंही म्हटलं जातं. मात्र या कुंडांमागचं रहस्य अजूनही उलगडलेलं नाही. असंच असं म्हणतात. एखाद्या भांड्यात उकळणाऱ्या पाण्यासारखं हे दृश्य असतं. दलाही कुंड या नावाने ते प्रसिद्ध आहे. हे कुंड सिमेंटच्या भिंतींनी वेढलं आहे. कुंडातलं पाणी उन्हाळ्यात थंड तर हिवाळ्यात गरम असतं. हा विरोधाभास का, याचाही थांग कोणाला लावता आलेला नाही.



एक चमत्कारी कुंड झारखंडमध्ये आहे. इथल्या बोकारो जिल्ह्यातल्या या कुंडाचं रहस्य भूगर्भशास्त्रज्ञांनाही उलगडता आलेलं नाही. या कुंडाजवळ उभं राहून जोरात टाळ्या वाजवल्या की त्यातलं पाणी आपोआप वर येऊ लागतं, या कुंडातल्या पाण्यामुळे चर्मरोग दूर होत असल्याचं लोकांचं म्हणणं आहे. या पाण्यात गंधक आणि हिलियम वायू असल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. दर संक्रांतीला इथे जत्रा भरते. या ठिकाणी लाखोंच्या संख्येने लोक उपस्थित असतात.

## २० रुपये चोरले म्हणून...

आपल्या देशात खटले वर्षानुवर्षं प्रलंबित असतात. म्हणूनच शहाण्याने न्यायालयाची पायरी चढू नये, असं म्हटलं जातं. खटला छोटा असो किंवा मोठा, आपल्या देशात न्याय मिळायला बराच वेळ लागतो. असंच काहीसं मध्य प्रदेशमधल्या ग्वाल्हेरमध्ये घडलं. अवघे २० रुपये चोरीचा हा खटला एक-दोन नाही तर तब्बल ४१ वर्षं सुरू होता. अखेर या खटल्याचा निकाल लागला. आरोपीला फक्त चार महिन्यांची शिक्षा झाली. इस्माइल खान या व्यक्तीवर १९७८ मध्ये २० रुपये चोरल्याचा आरोप ठेवण्यात आला. जिल्हा न्यायालयात याविरोधात खटला दाखल करण्यात आला होता. पुढची ४१ वर्षं या खटल्यावर सुनावणी सुरू होती. तारखांवर तारखा पडत होत्या. न्याय काही होत नव्हता. २००४ मध्ये इस्माइलने या खटल्याच्या सुनावणीला उपस्थित रहाणं बंद केलं. त्यानंतर १८ एप्रिल २०१९ या दिवशी पोलिसांनी त्याला ताब्यात घेतलं आणि तुरुंगात डांबलं. जामीन मिळवून देणारं कोणीच नसल्यामुळे त्याला चार महिने तुरुंगात घालवावे लागले. बाबूलाल यांनी इस्माइलविरोधात खटला दाखल केला होता. गेली ४१ वर्षं प्रलंबित असणाऱ्या या खटल्यात आरोपीने शिक्षा भोगली आहे. त्यामुळे हा खटला पुढे सुरू ठेवण्यात काहीच अर्थ नाही, असं न्यायमूर्तींनी त्याला पटवून दिलं. फिर्यादीनेही याला मान्यता दिली आणि इस्माईलच्या मागचा ४१ वर्षांचा ससेमिरा अखेर संपला.



## लाखोंची द्राक्षं



आपण हिरव्या आणि काळ्या द्राक्षांबद्दल ऐकलं आहे. द्राक्षं लालचुटुक असू शकतात यावर कोणाचाही विश्वास बसणार नाही. मात्र अशी द्राक्षं अस्तित्त्वात आहेत. विशेष म्हणजे त्यांची किंमतही लाखो रुपयांच्या घरात आहे. ही लाल द्राक्षं भारतात फारशी उपलब्ध नसतात; ती जपानमध्ये मिळतात. द्राक्षाचा छोटा घड खरेदी करण्यासाठी जपानी लोक मोजत असलेल्या किंमतीचं मूल्य भारतीय चलनात सुमारे ७.५० लाख रुपये आहे. रूबी रोमन असं या द्राक्षाच्या प्रजातीचं नाव आहे. काहीही असलं तरी द्राक्षाच्या छोट्याशा घडासाठी एवढी किंमत मोजणं कोणाच्याही जीवावर येईल. या प्रजातीच्या एका द्राक्षाचं वजन २० ग्रॅमच्या आसपास असतं. लाल द्राक्षांच्या एका घडाला २४ द्राक्षं लगडलेली असतात. प्रचंड किंमतीमुळे या द्राक्षांना श्रीमंतांचं फळ असं म्हटलं जातं. जपानमधल्या इशिकावा प्रांतातल्या सरकारने बारा वर्षांपूर्वी द्राक्षांच्या या प्रजातीचा शोध लावला होता. ही द्राक्षं खूप गोड असतात. त्यांचा थाट श्रीमंती फळांसारखा असतो. ही द्राक्षं शुभप्रसंगी भेट म्हणून दिली जातात. या देशातल्या कनाजावा इथल्या घाऊक बाजारपेठेत या द्राक्षांवर विक्रमी बोली लावण्यात आली. एका कंपनीने द्राक्षांच्या एका घडासाठी अकरा हजार डॉलर म्हणजे ७.५२ लाख रुपये मोजले.

## एक गूढ बेट

पाकिस्तानमध्ये मध्यंतरी एक विचित्र घटना घडली. इथलं एक बेट अचानक गायब झालं. एका रात्रीत बेट गायब झाल्यामुळे अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला. २०१३ मध्ये पाकिस्तानमध्ये आलेल्या प्रलयंकारी भूकंपानंतर हे बेट पहिल्यांदा समोर आलं होतं. मात्र आता सहा वर्षांनंतर ते पुन्हा गायब झालं आहे. अंड्याच्या आकाराचं हे बेट २९५ फूट लांब आणि १३० फूट रूंद होतं. समुद्रसपाटीपासून ते ६० फूट उंच होतं. इथले लोक या बेटाला जलजला कोह असं म्हणायचे. जलजला कोह म्हणजे भूकंपामुळे निर्माण झालेला पर्वत. भूकंपादरम्यान टेक्टोनिक प्लेट्सची टक्कर झाल्यामुळे या बेटाची निर्मिती झाल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. भूकंपानंतर हे बेट अचानक दिसू लागलं. यामुळे या परिसरातले लोक पुरते गोंधळून गेले. हे नेमकं काय आहे, हे कोणालाच कळत नव्हतं. मग काही लोक नावेने या बेटाजवळ पोहोचले. या ठिकाणी भरपूर चिखल, माती आणि दगड असल्याचं त्यांच्या लक्षात आलं. तसंच काही भागातून मिथेन वायूही बाहेर पडत असल्याचं दिसून आलं. नासाने या भागातले काही फोटो जारी केले आहेत. त्यात हे बेट कुठेच दिसत नाही. त्यामुळे हे बेट गायब झाल्याची चर्चा सुरू आहे. मात्र ६०-७० वर्षांपूर्वीही अशीच एक घटना घडल्याचं काही लोकांचं म्हणणं आहे. हे गूढ आता शास्त्रज्ञांनीच उलगडायला हवं.






## नका करू नासाडी

अनेकजण ताटात घेतलेलं अन्न वाया घालवतात. लग्न किंवा समारंभांमध्ये अन्नाची खूप नासाडी होते. जगभरातली बरीच मोठी लोकसंख्या एक वेळच्या अन्नापासून वंचित असताना होणारी अन्नाची ही नासाडी आपल्याला अस्वस्थ करून सोडते. ही नासाडी रोखण्याचे उपाय काहीजण करतात. अन्न टाकलं नाही तर काही टक्के सवलत देण्याच्या योजना राबवल्या जातात. लोकांना अन्नाचं महत्त्व कळावं यासाळी प्रयत्न होतात. असाच एक प्रयत्न राजस्थानमधल्या जोधपूरमध्ये करण्यात आला आहे. इथे विशेष थाळ्या बनवून घेण्यात आल्या आहेत. लोकांनी अन्न टाकू नये, यासाठी शहरात मोहीम राबवली जात आहे. केटरर्सनी आपल्या थाळ्यांवर ताटात अन्न टाकू नका असे शब्द कोरले आहेत. प्रत्येक थाळीवर हे शब्द कोरण्यात आले आहेत. त्यामुळे या थाळ्या हाती घेतल्यावरच अन्नाची नासाडी न करण्याचा संदेश लोकांपर्यंत पोहोचू शकेल. जोधपूरमध्ये या मोहिमेला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे अन्नाची नासाडी करू नका असे शब्द कोरलेल्या दोन टन स्टीलपासून जवळपास १० हजार थाळ्या तयार करून घेण्यात आल्या आहेत. सर्वात आधी कुंथूनाथ जैन मंदिरातल्या जयंतीलाल पारेख यांनी एक हजार थाळ्या तयार करून घेतल्या. त्यांनी महाराष्ट्रात अशा प्रकारच्या थाळ्या पाहिल्या होत्या. पारेख यांच्या प्रयत्नांनंतर आता परिसरातल्या विविध समाजांनीही अन्नाची नासाडी टाळण्यासाठी पुढाकार घेतला आहे.

# SPORTS



**राहुलला यष्टीरक्षक फलंदाज म्हणून पहिली पसंती : गौतम गंभीर**

चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी भारत रवाना होण्यापूर्वीच्या शेवटच्या पत्रकार परिषदेत गंभीरने पंतच्या जागी राहुल हा चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी पहिला पसंतीचा यष्टीरक्षक असल्याचे पुष्टी केली होती. तो म्हणाला होता, "व्यक्तिगतपणे बोलणे खूप कठीण आहे, पण मी एवढेच म्हणू शकतो की जर पंत संघाचा भाग असेल तर त्याला संधी मिळेल. सध्या केएल आमचा नंबर वन यष्टिरक्षक आहे. त्याने आमच्यासाठी चांगली कामगिरी केली आहे. जेव्हा तुमच्या संघात दोन यष्टिरक्षक असतात, तेव्हा तुम्ही दोघांनाही त्या गुणवत्तेने खेळवू शकत नाही. आशा आहे की पंतला जेव्हा संधी मिळेल तेव्हा तो त्यासाठी तयार असेल."

# दिल्लीचा रोमहर्षक विजय!

## शफालीचे आक्रमण अन् निकीचा फिनिशिंग टच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**वडोदरा :** महिला प्रीमियर लीग २०२५ मधील दुसऱ्या सामन्यात, दिल्ली कॅपिटल्सने शेवटच्या चेंडूपर्यंत चाललेल्या सामन्यात मुंबई इंडियन्सचा २ विकेट्सने पराभव केला. या सामन्यात मुंबईने प्रथम फलंदाजी करत १६४ धावा केल्या होत्या, प्रत्युत्तरात दिल्लीने शेवटच्या चेंडूवर दोन धावा करत २ विकेट्सनी विजयावर शिक्कामोर्तब केला आहे.

वडोदऱ्यातील कोटाम्बी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या सामन्यात दिल्लीने नाणेफेक जिंकून मुंबईला फलंदाजीसाठी आमंत्रित केले होते, ज्यामध्ये मुंबई इंडियन्सने प्रथम फलंदाजी करताना नॅट सिव्हर ब्रंटच्या नाबाद ८० धावा आणि कर्णधार हरमनप्रीत कौरच्या ४२ धावांच्या योगदानाच्या जोरावर १६४ धावां केल्या होत्या. या दोन फलंदाजांना व्यतिरिक्त मुंबईच्या आठ फलंदाजांना दुहेरी आकडाही गाठता आला नाही. दिल्लीकडून ॲना सदरलँडने सर्वाधिक ३ आणि शिखा पांडेनेही २ विकेट घेतल्या.

मुंबईने दिलेल्या १६५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या दिल्ली कॅपिटल्स संघाची सुरुवात खूप चांगली झाली. कर्णधार मेग लॅनिंग आणि शफाली वर्मा यांनी पॉवर प्लेमध्येच संघाची धावसंख्या ६० च्या पुढे नेले. लॅनिंग १५ धावा काढून बाद झाली, तर शफालीने फक्त १८ चेंडूत ७ चौकार आणि २ षटकारांसह ४३ धावा केल्या. मधल्या षटकांमध्ये दिल्ली विजयापासून दूर जात असल्याचे दिसत होते, पण निक्की प्रसादने ३३ चेंडूत ३५ धावांची संथ पण महत्त्वाची खेळी करत संघाला विजयाच्या जवळ पोहोचवले.

शेवटच्या षटकांमध्ये रनआऊटसाठी अनेक अपील झाले, पण दिल्लीच्या नशिबात विजय लिहिला गेला होता, त्यामुळे मुंबईला त्याचा फायदा झाला नाही. राधा यादवने १९ व्या षटकातील शेवटच्या चेंडूवर षटकार मारल्याने दिल्लीने सामन्यात पुनरागमन केले. यानंतर शेवटच्या षटकातील शेवटच्या चेंडूवर दिल्लीला २ धावांची आवश्यकता होती. अरुंधती रेड्डीने चेंडू मारला आणि राधा यादवसह दोन धावा घेतल्या. मात्र, दिल्लीसाठी चांगली गोष्ट म्हणजे अरुंधती रेड्डी दुसरी धाव घेताना वेळेत क्रीजमध्ये पोहोचली, ज्यामुळे रनआऊट होण्यापासून थोडक्यात वाचली आणि दिल्लीने विजयावर शिक्कामोर्तब केला. दरम्यान साराह ब्राइसने १० चेंडूत २१ धावांची महत्त्वपूर्ण खेळी साकारली.

## गझनफरच्या जागी मुजीब मुंबई संघात सामील

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** चॅम्पियन्स ट्रॉफीमधून बाहेर पडल्यानंतर, अफगाणिस्तानचा फिरकी गोलंदाज एएम गझनफर आयपीएल २०२५ मधूनही बाहेर पडला आहे. संघाने गझनफरच्या जागी अफगाणिस्तानचा ऑफस्पिनर मुजीब-उर-रहमानला संघात समाविष्ट केले आहे.

मुंबईने २४ वर्षीय मुजीबला २ कोटी रुपयांना संघात घेतले आहे. संघाने मेगा लिलावात १९ वर्षीय गझनफरला ४.८० कोटी रुपयांना खरेदी केले होते. मग मुजीबूर विकला गेला नाही. रिपोर्ट्सनुसार, आयपीएलचा सध्याचा हंगाम २२ मार्चपासून सुरू होत आहे. उद्घाटन सामना कोलकाता आणि बेंगळुरू यांच्यात खेळला जाईल.

गेल्या ४ वर्षांपासून मुजीब अनसोल्ड गेल्या चार वर्षांपासून मुजीबूर रहमानला कोणताही खरेदीदार सापडला नाही. गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये झालेल्या मेगा लिलावातही त्याला कोणत्याही संघात स्थान मिळाले नाही. मुजीब २०१८ ते २०२१ दरम्यान आयपीएलचा भाग होता.

## महाराष्ट्राच्या यशवंतराजे पवारचा मानांकित खेळाडूवर विजय





**पुणे :** महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना (एमएसएलटीए) यांच्या वतीने आयोजित १९व्या रमेश देसाई मेमोरियल राष्ट्रीय १२ वर्षाखालील टेनिस स्पर्धेत मुलांच्या गटात सातव्या मानांकित महाराष्ट्राच्या यशवंतराजे पवार याने दिल्लीच्या दुसऱ्या मानांकित अर्जुन दुआचा ६-४, ६-३ असा पराभव करून सनसनाटी निकालासह उपांत्य फेरीत प्रवेश केला. जीए रानडे टेनिस कोर्ट या ठिकाणी सुरू असलेल्या या स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरीत मुलांच्या गटात चौदाव्या मानांकित गुजरातच्या रियान नंदनकरने दहाव्या मानांकित दिल्लीच्या तेगवीर सिंगचा ६-२, ६-३ असा तर, दिल्लीच्या तिसऱ्या मानांकित नयन खत्रीने कर्नाटकाच्या पाचव्या मानांकित निहाल रेड्डीचा ६-२, ६-३ अशा सारख्याच फरकाने पराभव केला. चौथ्या मानांकित महाराष्ट्राच्या लक्ष्य त्रिपाठीने तामिळनाडूच्या सहाव्या मानांकित सेंथिल कुमार जेगनचे आव्हान ६-१, ६-३ असे मोडीत काढले. मुलींच्या गटात अव्वल मानांकित हरियाणाच्या आराधना तेहलन हिने सहाव्या मानांकित भृथी वेल्लादंडीला ६-४, ६-१ असे पराभूत केले. चौथ्या मानांकित महाराष्ट्राच्या मायरा शेख हिने पश्चिम बंगालच्या आठव्या मानांकित प्रियांगसी चॅटर्जीवर ६-१, ६ -२ असा विजय मिळवला. बाराव्या मानांकित महाराष्ट्राच्या त्रिशा भोसलेने आपलीच राज्य सहकारी चाहत ठाकूरला ६-४, ६-१ असे नमविले. सातव्या मानांकित तामिळनाडूच्या कनिष्का गोविंदनेकाल मानांकित खेळाडूवर विजय मिळवणाऱ्या उत्तराखंडच्या मीरा सिंगचा ६-१, ६-१ असा सहज पराभव करून उपांत्य फेरी गाठली.

## मुंबई इंडियन्सचा पहिलाच सामना चेन्नईशीशी!



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** हार्दिक पांड्याच्या मुंबई इंडियन्सचा संघ इंडियन प्रीमिअर लीग २०२५ मध्ये आपला दरारा दाखवण्यासाठी सज्ज झाला आहे. आयपीएलच्या लिलावापूर्वी फ्रँचायझीने हार्दिक, जसप्रीत बुमराह, रोहित शर्मा, सूर्यकुमार यादव व तिलक वर्मा या स्टार्सना संघात कायम राखले होते आणि त्यानंतर लिलावात आणखी तगडे साथीदार जोडले.

त्यामुळे यंदा मुंबईकडून चाहत्यांना चांगल्या कामगिरीची अपेक्षा आहे. मागील पर्वात हार्दिकच्या नेतृत्वाखाली प्रथमच खेळताना मुंबईला तालिकेत आठव्या क्रमांकावर राहावे लागले होते. हार्दिकला नेतृत्व दिल्याने भरपूर टीका झाली, चाहत्यांनी स्टेडियममध्ये हार्दिकला ट्रोल केले.

पण, फ्रँचायझी त्यांच्या निर्णयावर ठाम राहिली आणि याही पर्वात तोच मुंबईचा कर्णधार असणार आहे. मुंबई इंडियन्सला पहिल्याच सामन्यात कट्टर प्रतिस्पर्धी चेन्नई सुपर किंग्सचा सामना करावा लागणार आहे. २३ मार्चला चेन्नईच्या चेपॉकवर हा सामना होणार आहे.

## क्रिकेटपटू राहुल त्रिपाठी यांच्या उपस्थितीत सहाव्या 'सिंधी प्रीमिअर लीग'चे शानदार उद्घाटन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** 'सिंधी प्रीमिअर लीग'च्या सहाव्या पर्वाचे भारतीय क्रिकेटपटू राहुल त्रिपाठी याच्या उपस्थितीत शानदार उद्घाटन झाले. येत्या ९ मार्चपर्यंत चालणारी ही क्रिकेट स्पर्धा पिंपरीतील मृणाल क्रिकेट ग्राउंडवर होत आहे. उद्घाटन सोहळ्यावेळी उद्योजक डब्बू आसवानी, श्रीचंद आसवानी, संयोजक कन्वल खियानी, हितेश दादलानी, कमल जेठानी, अंकुश मुलचंदानी, नरेश नशा, करण अस्वाणी, अवि तेजवानी, अवि इसरानी, कुणाल गुडेला, पियुष जेठानी आदी उपस्थित होते.

राहुल त्रिपाठी म्हणाला, "क्रिकेट हा सर्वांना एकत्र आणणारा खेळ आहे. सर्व कुटुंबाना एकत्र आणून उत्साहाने ही स्पर्धा खेळली जात आहे. मानसिकदृष्ट्या ताजेतवाने आणि शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त राहण्यासाठी मैदानी खेळ खेळायला हवेत. सिंधी समाजाने घेतलेला हा पुढाकार कौतुकास्पद आहे. खेळाडूंबरोबर त्यांची मुले मैदानात आल्याने वातावरणात ऊर्जा संचारत आहे. समाजातील तरुणांमध्ये खेळभावना रुजवण्यासाठी ही लीग महत्वाची आहे. संघभावना आणि प्रामाणिकपणे या खेळाचा आनंद घ्यावा."

कन्वल खियानी म्हणाले, "सिंधी समाजातील तरुणांना खेळांसाठी प्रोत्साहन देण्यासह सिंधी संस्कृतीचे जतन आणि सामाजिक भावनेतून सेवाभावी संस्थांना मदत करण्याच्या उद्देशाने गेल्या सहा वर्षांपासून ही क्रिकेट स्पर्धा होत आहे. या स्पर्धेत पुरुष गटात एकूण १६, तर महिला गटात एकूण आठ संघ सहभागी झाले आहेत. पुरुषांच्या प्रत्येक संघाचे नाव सिंधी संस्कृतीशी, तर महिला संघांची नावे नद्यांशी निगडित आहेत. महिलांमध्ये ९०, तर पुरुषांमध्ये २५१ खेळाडूंनी सहभाग नोंदवला आहे."

या स्पर्धेतील पुरुष गटामध्ये मस्त कलंदर, सुलतान ऑफ सिंध, मोहेंजोदरो वॉरियर्स, सिंधफूल रेंजर्स, एसएसडी फाल्कन, इंडस डायनामॉस, दादा वासवानीज ब्रिगेड, झुलेलाल सुपरकिंग्ज, हेमू कलानी ग्लॅडिएटर्स, गुरुनानक नाइट्स, संत कंवरम रॉयल्स, आर्यन्स युनायटेड, जय बाबा स्ट्रायकर्स, सिंधी इंडियन्स, अजराक सुपरजायंट्स व पिंपरी योद्धाज, तर महिलांच्या संघात गंगा वॉरियर्स, गोदावरी जायंट्स, झेलम क्वीन्स, सिंधू स्टारलेट्स, यमुना स्ट्रायकर्स, नर्मदा टायटन्स, कृष्णा सुपरनोव्हाज आणि इंद्रायणी थंडरबोल्ट्स यांचा समावेश आहे.

उद्घाटनाचा सामना सिंधफूल रेंजर्स आणि सुलतान्स ऑफ सिंध यांच्यात रंगला. पहिल्याच लढतीत सुपर ओव्हरचा थरार पाहायला मिळाला. सुपर ओव्हरमध्ये सिंधफूल रेंजर्सने विजय मिळवला. तत्पूर्वी नाणेफेक जिंकून रेंजर्सने प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला.

## सीएसआर स्पोटर्स, एमबीबी, विजय क्रिकेट, एके स्पोटर्स संघ विजयी!







**पुणे :** ट्वेन्टीफोर स्पोटर्स मॅनेजमेंट तर्फे आयोजित 'रायझिंग स्टार करंडक' १० वर्षाखालील मुलांच्या आंतरक्लब क्रिकेट स्पर्धेत सीएसआर स्पोटर्स, एमबीबी, विजय क्रिकेट ॲकॅडमी आणि एके स्पोटर्स ॲकॅडमी या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून स्पर्धेत विजयी कामगिरी केली. सिंहगड रोड येथील कोद्रे फार्म्स क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत मयुर देसाई याने केलेल्या भेदक गोलंदाजीमुळे एके स्पोटर्स संघाने योगेश इलेव्हन ॲकॅडमीचा ३७ धावांनी सहज पराभव केला. सामन्यामध्ये मयुर देसाई याने दोन धावांमध्ये ४ गडी टिपले. अन्श चव्हाण याने केलेल्या अचूक गोलंदाजीमुळे सीएसआर स्पोटर्स संघाने एमबीबी संघाचा १७ धावांनी सहज पराभव केला. अन्श याने तीन धावांमध्ये ३ गडी बाद करून संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. सुरज पवार याने केलेल्या कामगिरीमुळे विजय क्रिकेट ॲकॅडमीने योगेश इलेव्हनचा १० गडी राखून सहज पराभव केला. अर्जुन डी. याने केलेल्या अचूक गोलंदाजीमुळे एमबीबी संघाने क्षेत्रम क्रिकेट ॲकॅडमीचा ८ गडी राखून पराभव केला. अर्जुन याने १८ धावांमध्ये २ गडी बाद केले.

## विश्वविजेता डी गुकेश तळाच्या स्थानी; स्पर्धेत एकही विजय नाही



**नवी दिल्ली :** विश्वविजेत्या गुकेशसाठी फ्री स्टाइल बुद्धिबळ ग्रँडस्लॅम स्पर्धा अतिशय निराशाजनक गेली. त्याला तळाचे आठवे स्थान मिळाले. सातव्या क्रमांकासाठी अलिझेरा फिरोज्जाकडून त्याला दुसऱ्या सामन्यातही पराभव स्वीकारावा लागला. या स्पर्धेतील गुकेशचे आव्हान संपुष्टात आले. त्याला संपूर्ण स्पर्धेत एकही विजय मिळाला नाही. पहिल्या सामन्यात बरोबरीवर समाधान मानावे लागल्यानंतर आजच्या दुसऱ्या डावात पांढरी मोहरी असल्यामुळे गुकेशला संधी होती; परंतु ३० चालीनंतर त्याचा पराभव झाला. या दुसऱ्या डावात गुकेशची कठीण परीक्षा डावाच्या मध्यावर सुरू झाली. वजीर आणि दोन पाद्यी शिल्लक असताना त्याने चूक केली. येथेच अलिझेरा फिरोउझिया संधी मिळाली आणि त्याने गुकेशचा पराभव निश्चित केला. दरम्यान, जर्मनीचा खेळाडू आणि फेव्हरिट समजल्या जाणाऱ्या विन्सेंट केमेरने या स्पर्धेत विजेतेपद मिळवले. डावाच्या सुरुवातीला त्याने हत्ती गमावला होता, तरीही त्याने आपले वर्चस्व कायम ठेवले.

## रूद्र वॉरीयर्स, नायर ईगल्स्, रिस्क्राईब, साची सुपरकिंग्ज् संघांचा उपांत्य फेरीत प्रवेश !

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क





**पुणे :** लायन्स् डिस्ट्रीक्ट ३२३४डी२ तर्फे आयोजित 'लायन्स् प्रीमियर लीग' २०२४-२५ टेव्टी-२० क्रिकेट स्पर्धेत रूद्र वॉरीयर्स, नायर ईगल्स्, रिस्क्राईब आणि साची सुपरकिंग्ज् या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून उपांत्य फेरीमध्ये प्रवेश केला.

हिंजेवाडी येथील फोर स्टार क्रिकेट मैदानावर झालेल्या या स्पर्धेत तुषार गुमफलवार याने केलेल्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर रूद्र वॉरीयर्स संघाने योगेश व्हिक्टर्सचा १६ धावांनी पराभव करून उपांत्य फेरी गाठली. पहिल्यांदा फलंदाजी करताना रूद्र वॉरीयर्सने १४२ धावांचे लक्ष्य उभे केले. अमित गणपुले याने ३२ धावांची तर, अर्थव तांदळे (२० धावा) आणि हृषीकेश आगाशे (२२ धावा) यांनी संघाचा डाव सावरला. या लक्ष्याचा पाठलाग करताना योगेश व्हिक्टर्सचा डाव १२६ धावांवर मर्यादित राहीला. तुषार गुमफलवार याने १७ धावांमध्ये ३ गडी बाद केले. याशिवाय संतोष पाटोळे आणि महेंद्र जगताप यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले.

संतोषकुमार सागळे याने फटकावलेल्या शतकी खेळीच्या जोरावर साची सुपरकिंग्ज्ने नायर ईगल्स्चा ६ गडी राखून पराभव करून उपांत्य फेरी गाठली.

पहिल्यांदा फलंदाजी करताना नायर ईगल्स्ने १७९ धावांचे लक्ष्य उभे केले. दिग्विजय मोहीते याने ८१ धावांची तर, विशाल बारने याने ५४ धावांची खेळी केली. हे लक्ष्य साची सुपरकिंग्ज् संघाने १९.३ षटकात व ४ गडी गमावून पूर्ण केले. या डावामध्ये संतोषकुमार सागळे याने ६४ चेंडूत १० चौकार व ४ षटकारांसह १०० धावांची खेळी केली. त्याला अनिल मांडके योन नाबाद ३५ धावांची खेळी करून योग्य साथ दिली. या दोघांनी संघाला सहज विजय मिळवून दिला.

## 'ऑस्ट्रेलियन ओपन' विजेता सिनरवर ३ महिन्यांची बंदी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** सलग दुसऱ्यांदा ऑस्ट्रेलियन ओपन ग्रँडस्लॅमवर आपलं नाव कोरणाऱ्या जागतिक क्रमवारीतील अग्रस्थानी असणारा



टेनिसपटू यानिक सिनर वर तीन महिन्यांची बंदी घालण्यात आली आहे. डोपिंग प्रकरणात त्याच्यावर ही कारवाई करण्यात आली आहे.

सिनरची बंदी घातलेल्या पदार्थासाठी चाचणी पॉझिटिव्ह आली होती. एप्रिल २०२५ मध्ये 'सीएएस'कडून या प्रकरणाची सुनावणी होण्याची अपेक्षा होती. या प्रकरणी आज (दि.१५ फेब्रुवारी) जागतिक उत्तेजक द्रव्य प्रतिबंधक संस्था (WADA) आणि सिन्नर यांच्यात एकमत झाले. बंदी घातलेल्या औषधांच्या चाचणीत पॉझिटिव्ह आल्यानंतर बंदीतून सुटलेल्या सिनरविरुद्ध वाडाने कोर्ट ऑफ आर्बिट्रेशन फॉर स्पोर्ट (CAS) मध्ये अपील केले होते. या प्रकरणाची सुनावणी एप्रिल २०२५ मध्ये होणार होती. 'वाडा' आणि सिन्नर यांनी तीन महिन्यांच्या बंदीसाठी तोडगा काढला आहे. सिनर हा ९ फेब्रुवारी २०२५ ते ४ मे २०२५ रोजी रात्री ११:५९ वाजेपर्यंत अपात्रतेचा कालावधी पूर्ण करतील," असे WADA ने एका निवेदनात म्हटले आहे.

## टेबल टेनिसमध्ये महाराष्ट्राला एक सुवर्ण, एक कांस्य!; दिया- स्वस्तिका जोडीला सुवर्ण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील टेबल टेनिसमध्ये महाराष्ट्राला एक सुवर्ण, एक कांस्यपदक मिळाले. दिया चितळे व स्वस्तिका घोष या जोडीने ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राला टेबल टेनिसमध्ये महिला दुहेरीचे सुवर्ण पदक जिंकून दिले. त्यानंतर महिला एकेरीच्या संघर्षपूर्ण अंतिम लढतीनंतर महाराष्ट्राच्या स्वस्तिका घोष हिला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले, तर पृथा वर्टीकरला कांस्यपदक मिळाले.

महिला दुहेरीत दिया चितळे व स्वस्तिका घोष या महाराष्ट्राच्या जोडीने निथाया श्री मनी व काव्य श्री बैस्सा या तामिळनाडूच्या चजोडीचा ३- २ (६-११, ८- ११, ११-९, ११- ७, ११- ६) असा पराभव करून सुवर्णपदकावर मोहर उमटवली.

महिला एकेरीच्या अंतिम लढतीत महाराष्ट्राच्या स्वस्तिका घोष हिने तमिळनाडूच्या सेलेना एस. कडवी लढत दिली. मात्र, टाळता येण्याजोग्या अनेक चुका केल्यामुळे स्वस्तिकाचा पराभव झाला. तमिळनाडूच्या सेलेनाने ही लढत ११-७, ११-२, ६-११, ७-११, ११-७, ११-९ अशी ४-३ ने जिंकून सुवर्ण पदकाला गवसणी घातली.

त्याआधी, महिला एकेरीच्या उपांत्य लढतीत महाराष्ट्राच्या पृथा वर्टीकरला तमिळनाडूच्या सेलेना एस. हिने ७- ११, १६- १४, ११- ७, ११- ९, ११- ६ असे ४- १ फरकाने हरविले.

### पाच सदस्यीय समिती स्थापन

## महाराष्ट्र केसरीतील राक्षे-मोहोळ लढतीची चौकशी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेच्या गादी विभागातील अंतिम लढतीमधील पंचाच्या चीतपटीच्या निर्णयावरून प्रचंड गदारोळ झाला होता. या निर्णयावर जनमानसातही उलटसुलट चर्चा झाल्या. यामुळे महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाने पाच सदस्यीय चौकशी समितीची नियुक्ती केली आहे. ही समिती 'महाराष्ट्र केसरी'ची गादी विभागातील शिवराज राक्षे आणि पृथ्वीराज मोहोळ यांच्यातील अंतिम लढतीची चौकशी करणार आहे.

अहिल्यानगरमध्ये २९ जानेवारी ते २ फेब्रुवारीदरम्यान ६७वी वरिष्ठ राज्य अजिंक्यपद आणि महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा पार पडल्या. स्पर्धेत महाराष्ट्र केसरी खुल्या गटातील गादी विभागाच्या अंतिम लढतीमध्ये पृथ्वीराज मोहोळ आणि शिवराज राक्षे यांच्यात कुस्ती झाली. या सामन्यास मुख्य पंच म्हणून छत्रपती संभाजीनगर येथील मॅच चेअरमन म्हणून आंतरराष्ट्रीय पंच नितीश काबिलिये, तर साइड पंच म्हणून शासकीय प्रशिक्षक दत्तात्रय माने व विवेक नाईकल यांची नेमणूक करण्यात आली होती.

यामध्ये शिवराज राक्षे याला पंचांनी चीतपट झाल्याचा निर्णय दिला. त्यामुळे मोहोळ महाराष्ट्र केसरी किताबाच्या लढतीसाठी दाखल झाला, तर राक्षे बाहेर पडला. या वेळी राक्षे याने मैदानावरच राडा घालत पंचांना मारहाण केली. कुस्तीगीर संघाने राक्षे याच्यावर कारवाईही केली. मात्र या निकालावरून जनमानसात नाराजी व्यक्त झाली. या उलटसुलट चर्चेचा विचार करीत महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाने पाच जणांची चौकशी समिती नेमली. समिती या चीतपट निर्णयाची सखोल चौकशी करून महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाकडे अहवाल सादर करणार आहे. २८ फेब्रुवारीपूर्वी चौकशी अहवाल सादर करावा, असे पत्रात म्हटले आहे. दरम्यान, निकालाविरुद्ध राक्षे याने अद्यापपर्यंत कोणतीही लेखी हरकत महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाकडे नोंदवलेली नाही.

#रा